

माणूस

# स्क्वाड्रन लीडर पी. अशोक यांनी सादर केलेला चाचणी उड्डाणांचा अहवाल का पुढे येत नाही ?

बुधवार
३० डिसेंबर १९७०
चाळीस पैसे

बुधवार, ३० डिसेंबर १९७०

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : अठ्ठेचाळिसावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशाची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार

□ आपल्या लोकप्रिय द्विसाप्ताहिकात विज्ञानविषयक लेख देण्याचा आपला उपक्रम स्तुत्य आहे यात शंका नाही. परंतु आपल्या दि. २१ ऑक्टोबरच्या अंकातील श्री. सुधाकर मालेगावकर यांचा "या पुढे अणुयुद्ध नको!" हा लेख मात्र आपल्या उपक्रमाचा विपर्यास करीत आहे असे वाटते. सदरहू लेख कित्येक चुका व भ्रममूलक विधानांनी भरलेला आहे. उदाहरणार्थ दोन तीन विधानेच देतो:
"अणुबाँबमध्ये मुख्यत: Trinitrotoluene (अंकांत Trinitrotolune असे चूक स्पेलिंग आहे) स्फोटक पदार्थ वापरतात."
"अठराव्या शतकाच्या शेवटी...प्रो. रोटेजन (प्रो. रॉंटजेन असे असावयास पाहिजे) यांनी एक्स रेचा शोध लावला." (वस्तुत: रॉंटजेन यांनी हा शोध १८९५ त म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी लावला); "गामा किरण फार प्रचंड शक्तीने किरण विसर्जन करतात"; "फ्रेंच शास्त्रज्ञ हेन्री पॉईन केअर आणि हेन्री बेक्वीयरेल यांनी किरणोत्सर्गिताचा शोध लावला" (हा शोध फक्त बेकरेल यांनीच लावला आहे); इ. इ. लेखकाने शास्त्रज्ञांच्या नावांचा उच्चारांशीही दुष्टता केली आहे. उदाहरणार्थ: पॉईनकेअर (प्वाँकारे), बेक्वीयरेल (बेक्रेल), क्युरे (क्यूरी) इ.
विज्ञान विषयक लेखातील मराठी भाषेच्या चुकांचो छापण्यापूर्वी संपादक या नात्याने आपण यापुढे दुरुस्ती करालच; पण लेखातील विषयप्रतिपादन तर चुकीचे नाही ना, याची खात्री एखाद्या शास्त्रज्ञाकडून करवून घेऊन मगच लेख छापावेत अशी नम्र सूचना आपणास करावीशी वाटते.

१८ डिसेंबर, १९७० — भा. गं. गोखले, लखनौ

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# बिहार । गुजराथ

अखेर बिहारमधील सत्तारूढ काँग्रेसचे दरोगा राय सरकार गडगडले. आणि त्या जागी आठ पक्ष मिळून बनलेल्या संयुक्त विधायक दलाचे सरकार आले. सत्तारूढ नव्या काँग्रेसने राय सरकार टिकवून धरण्याची शिकस्त केली. आणि एकदा सरकार पडल्यानंतर संयुक्त विधायक दलाचे सरकार न येऊ देण्यासाठी प्रयत्नांची शर्थ केली. पण व्यर्थ !

१९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर बिहारमध्ये आलेले हे आठवे सरकार. सर्व सरकारे संयुक्त होती. चार सरकारे १९६९ च्या मध्यावधी निवडणुकांच्या आधीची आणि चार नंतरची. ही सर्व सरकारे अल्पकाळ सत्तेवर होती. राज्य विधानसभेत कोणत्याही एका पक्षाला बहुमत नाही. अनेक पक्षांचे मोठे मोठे गट विधानसभेत निवडून आले आहेत. त्यामुळे सरकारे अस्थिर असतात. या सरकारला पाडा, त्या सरकारला खेचा अशा कारवाया सतत चालू असतात. राजकारणाच्या या धबडग्यात राज्याचा दैनंदिन व्यवहार कसा चालत असेल याची कल्पनाच केलेली बरी.

बिहार सरकारच्या गडगडण्याव्यतिरिक्त गेल्या पंधरवडयात गाजलेली घटना म्हणजे गुजरातच्या जुन्या काँग्रेसमधील बंडाळी. जुन्या काँग्रेसच्या दोन मंत्र्यांनी राजीनामे दिले आणि पक्षातील एक महत्वाचा गट फुटून निघाला. निमित्त होते अर्थातच पक्षाच्या राष्ट्रीय सभेने लखनौच्या अधिवेशनात केलेले ठराव. इतर पक्षांशी, विशेषत: जनसंघ आणि स्वतंत्र, यांच्याशी हातमिळवणी करण्याच्या प्रश्नावरून हे प्रकरण घडले. गुजरातच्या जुन्या काँग्रेसमधील मोठ्या गटाचा अजूनही या हातमिळवणीला सक्त विरोध आहे. गेल्या आठवडयात गुजरात प्रदेश काँग्रेसने चक्क एक ठराव करून गुजरात राज्यात या पक्षांशी हातमिळवणी करण्यास जोराचा विरोध दर्शविला आहे. अशाही परिस्थितीत पक्षाच्या राष्ट्रीय नेत्यांनी राष्ट्रीय पातळीवर इतर पक्षांशी युती करण्याचे प्रयत्न पुढे दामटलेच तर पक्षाचे आणखी तुकडे पडण्याची शक्यता आहे.

जाणकार गुजराती निरिक्षकांच्या मते मनुभाई शाह वगैरे जी मंडळी जुन्या काँग्रेसमधून बाहेर पडली त्याला महत्त्व देण्यात फारसा अर्थ नाही. कारण त्यांना पक्षातही फारसे महत्व नाही आणि बाहेरही वजन नाही. त्यांच्या जाण्यामुळे हितेंद्र देसाई यांच्या सरकारला काही धक्का पोचत नाही. मात्र सौराष्ट्रातील आमदारांमध्ये जी धुसफूस चालू आहे ती चिंतनीय आहे. सौराष्ट्रातील लोक फारसे खूष नाहीत. त्यांना आपल्या विभागाचे स्वतंत्र राज्य हवे आहे. थोडयाच अवधीत स्वतंत्र विदर्भाच्या मागणीसारखी स्वतंत्र सौराष्ट्राची मागणी पुढे आली तर त्याचे आश्चर्य वाटायला नको. □ □ □

अनिल अवचट

# विद्यार्थी शक्ती व विद्यार्थी सहभाग — एक परिसंवाद

'विद्यार्थी शक्ती व विद्यार्थी सहभाग' या विषयावर युवक क्रांती दलातर्फे एक परिसंवाद पुण्याच्या राज्यशिक्षण शास्त्र संस्थेत दि. २० डिसेंबर रोजी घेण्यात आला होता. विषय तसा आपल्याकडे नवीन आहे आणि दुसऱ्या अर्थाने तसा नवीन राहिलेलाही नाही. 'Student Power' हा पाश्चात्य देशातल्या विद्यार्थ्यांच्या जीवनाचा अर्थ शोधण्याच्या चळवळीतून पुढे आलेला शब्द आहे. त्यातून निर्माण झालेल्या तत्त्वज्ञानातून 'Student Participation' ची मागणी पुढे आली.

वेगळ्या अर्थाने भारतातही विद्यार्थी शक्ती अगदी वेगळ्या कारणातून जन्म-पावून येथेही विद्यार्थी सहभागाची मागणी पुढे येत आहे. पाश्चात्य देशातला व आपला संदर्भ वेगळा, कार्याची दिशा वेगळी आणि प्रत्यक्ष मागण्याही वेगळ्या असल्या तरी या सर्वांच्या गाभ्यात कुठेतरी एकपणा जाणवतो, हे उघड आहे.

या परिसंवादासाठी आम्ही पुण्यातील प्रत्येक कॉलेजमध्ये जाऊन विद्यार्थी, प्राध्यापक व प्राचार्यांना भेटायचे ठरविले. सभेला किती लोक येतात यापेक्षा प्रचाराच्या निमित्ताने आपण किती मंडळींना याविषयाची माहिती देऊ शकतो, किती जणांशी चर्चा करू शकतो यावरच यश जोखायचे ठरविले. कॉलेजमध्ये जात असू तेव्हा सकाळच्या उन्हात उभे असलेले कंपू असत. त्यांच्यात जाऊन सभेचे व विषयाचे बोलत असू. वरकरणी हीरो दिसणारे विद्यार्थीसुद्धा सिरिअसली ऐकून घेत. त्यापैकी सभेलाही बरेचसे आले.

पृष्ठ ५९ वर

गेल्या शनिवारच्या अंकात
इंडियन एअरलाइन्सच्या संपाबाबत
वैमानिकांची भूमिका मांडलेली आहे.
जी विमाने चालविण्यास वैमानिकांनी नकार दिला
त्या अव्हरोसंबंधी थोडी अधिक माहिती.

# अव्हरो राजकीय व तांत्रिक बाजू

**विजय वैद्य**

अव्हरो विमानांबाबत अजूनही सर्वत्र चर्चासत्र चालूच आहे. गेल्या आठवड्यात त्यासंबधी लिहिले होतेच. दरम्यान इंडियन एअरलाइन्सच्या संचालकांनीही त्यांच्या भूमिकेतील ताठरपणा थोडा कमी केला. भारतीय हवाई दलाचे वैमानिक मागे घेण्यात आले आणि ज्यांच्या उड्डाणाच्या कामगिरीबद्दल आय. ए. सी. च्या वैमानिकांची तक्रार आहे ती अव्हरो विमाने पुढील ४८ तास तळावर ठेवण्याचा निर्णय व्यवस्थापकांनी घेतला. वैमानिकांशी बोलणी करण्याच्या दृष्टीने वातावरण तयार करण्यासाठी इतरही काही निर्बंध मागे घेण्यात आले. पण अजूनही वाद मार्गी लागल्याचे दिसत नाही. त्या अव्हरो विमानासंबंधी अधिक माहिती :

भारतातील अव्हरो विमानांची निर्मिती हे माजी संरक्षणमंत्री मेनन यांचेच अपत्य होय. त्यांच्या ब्रिटनमधील वास्तव्यात विशेषत: भारताचे हाय कमिशनर असताना ब्रिटनमधील काही उद्योगसमूहांबाबत त्यांनी खूपच आस्था दाखवली होती. ब्रिटनमधील हॉकर सिडले विमानकंपनीबरोबरही त्यांचे संबंध होते. शिवाय ते संरक्षणमंत्री असताना आपले विमानदळ संपूर्णपणे ब्रिटिश बनावटींच्या विमानांचेच होते. (उदा. कॅनबेरा, हंटर इत्यादी) मेननसाहेबांनी हॉकर सिडले कंपनीने बनविलेल्या अव्हरो विमानाबाबत चांगलीच आस्था दाखविली आणि त्यांच्या सहाय्याने येथे त्या विमानांचे उत्पादन करण्यासाठी लायसन्स मिळविले.

जुनाट झालेल्या डाकोटा विमानांची जागा ही विमाने घेणार होती. रक्षामंत्रालयाने जणू काय हे विमान म्हणजे संरक्षणमंत्र्यांच्या प्रचंड बुद्धीमत्तेची देणगी आणि भारतीय तंत्रज्ञांची अजोड कामगिरी यांचे प्रतीक असलेले आश्चर्यकारक विमान अशी जबरदस्त जाहिरात केली. पण कॉकपिट सीट्स्‌सह सर्वच भाग ब्रिटनहून आणून ते येथे ब्रिटिश तंत्रज्ञांच्या मदतीने जोडले गेले आणि माजी प्रधानमंत्री नेहरू यांना ते दाखविण्यात आले. विज्ञानाची कास धरलेले पंडित नेहरूही या 'कामगिरी'ने दिपून गेले आणि त्यांनी 'मोलाची व अजोड कामगिरी' असे शिफारसपत्रही मेनन व भारतीय तंत्रज्ञांना देऊन टाकले. त्यानंतर ते दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडले. ज्या दिवशी येथे बांधलेल्या (व कै. नेहरूंनी पाहिलेल्या) अव्हरो विमानाच्या प्रात्याक्षिकांचे पत्रकारांना दर्शन घडविले जाणार होते त्याच दिवशी भारतावर चिनी हल्ला झाला आणि तो कार्यक्रम मागेच पडला. मेनन गेले तरीही संरक्षण खात्याने ही योजना पूर्ण करण्याचे ठरविले. पण ते त्या खात्याच्या अधिपत्याखालील कानपूर येथीऊ विमानदळाच्या मेंटेनन्स कारखान्याऐवजी संरक्षण उत्पादन खात्याच्या अधिकाराखाली येणाऱ्या 'हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड'च्या कानपूर येथे उभारल्या जाणाऱ्या कारखान्यात तयार करण्याचे ठरले.

भारतीय विमानदलासाठी बांधण्यात आलेली अव्हरो ('सध्या त्यांच्याकडे १४ अव्हरो विमाने आहेत) विमाने मालवाहतूक किंवा सैन्यवाहतूकीसाठी न वापरता ती राष्ट्रपती, प्रधानमंत्री, संरक्षणमंत्री, वायुसेना, नौसेना व भूसेना प्रमुख अशा व्ही. आय्. पी. ज्च्या जवळच्या दौऱ्यांसाठी (की जेथे रशियन बनावटीची टी. यू. १२४ विमाने छोटया धावपट्टीवर उतरु शकत नाहीत अशा ठिकाणांसाठी) वापरात आणावयाचे ठरले व आजमितीस ती विमाने त्याच कामगिरीवर असतात.

'इंडियन एअरलाइन्स'ने अव्हरो विमानांबाबत विशेष आस्था दाखविलेली नव्हती. पण सरकारी कारखान्यात तयार झालेली अव्हरो विमाने राष्ट्रीकृत 'इंडियन एअरलाइन्स'ला विकत घेणे सरकारला जवळ जवळ सक्तीनेच भाग पाडले (५८ साली 'इंडियन एअरलाइन्स'चे सरव्यवस्थापक असलेले व आताचे वायुसेनाध्यक्ष एअर चीफ मार्शल पी. सी. लाल यांनी तर ही विमाने आय्. ए. सी. साठी घेण्यास चक्क नकार दिला होता) १९६७ सालच्या उतरार्धात 'इंडियन एअरलाइन्स' ने अव्हरो विमाने आय्. ए. सी. च्या ताफ्यासाठी जवळच्या मार्गांवरील वाहतूकीसाठी वापरायला सुरुवात केली. 'हिन्दुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेडने' आग्नेय आशियात अव्हरो विमानांना गिऱ्हाईके मिळविण्याचा प्रयत्न केला पण आजपर्यंत तरी तो पूर्णतया अयशस्वी झालेला आहे. आपले अगदी जवळचे शेजारी म्हणजे नेपाळ व सिलोन यांच्याकडे प्रत्येकी एक अव्हरो आहे पण ते ब्रिटिश बनावटीचे आहे. जगात एकूण २३० ब्रिटिश बनावटीची अव्हरो विमाने वापरात

आहेत. भारतीय बनावटीच्या अव्हरो विमानात ४४ सीटस्‌ची सोय आहे तर इतर काही देशांनी त्याच आकाराच्या अव्हरो विमानात हेच प्रमाण ६० सीटस् पर्यंत ठेवल्याचे आढळते. मात्र हे सर्व हवामान व इतर काही बाबीवर ठरविले जाते.

दोन इंजिन्स असलेले टर्बो–प्रॉप अव्हरो विमान जगातील प्रथम दर्जाचे समजले जाते.

जुनाट झालेल्या डाकोटा विमानांची जागा घेण्याकरता १९५० सालच्या अखेरीस ब्रिटनच्या हॉकर-सिडले कंपनीने अव्हरो विमानांची बांधणी केली. पण विमान-सांगाड्यातील मूळ आराखड्यात काही उणीवा राहिल्याने आणि त्याची इंजिन्स बसविलेली जागा यामुळे विमानाच्या जास्तीत जास्त चांगल्या कामगिरीत दोष राहिले आणि विमान बाजारपेठेत यशस्वी होऊ शकले नाही. नागरिक वाहतूक कंपन्यांचे राहू द्याच पण ब्रिटनच्या शाही विमान दलानेही अव्हरो विमानाबाबत आस्था दाखविली नाही. शाही विमान दलालाही डाकोटा मोडीत काढायची होती.

पहिल्या मॉडेलमधील दोष काढून टाकण्यासाठी मग उत्पादकांनी पुढील मॉडेल-मध्ये रोल्स रॉइसची मार्क ६ ऐवजी मार्क ७ इंजिन्स बसविली तेव्हा शाही विमान-दलाने काही विमानांसाठी मागणी नोंदविली.

हे विमान मुलकी ह्याचप्रमाणे सैन्य, प्रवासी व मालवाहतूक यांच्या वापरासाठी आहे. पण नागरी वाहतूक आणि सैन्यासाठी वापर करताना सुरक्षिततेसाठी अस-णाऱ्या चाचण्या व नियम थोडे निराळे असतात. सैन्यासाठी वापरात येणारी विमाणे पूर्ण ओझ्यासह (फुल लोड) क्वचितच जातात तर मुलकी वाहतूकीतील विमाने जवळजवळ नेहमीच गच्च भरलेली असतात.

विमानातील ओझे आणि विमानाची कामगिरी, (Performance) विमानाचा आराखडा, इंजिनांची क्षमता व हवामान यावर आधारित असते. प्रथम आराखडा तयार करताना उत्पादक व आराखडा तयार करणारे इंजिनिअर्स ठरलेल्या सुर-क्षितता पातळीच्याही वर सुरक्षितता राहील यांची दक्षता घेतात. उड्डाण (Take off) ही विमान उड्डाणातील महत्त्वाची पायरी असते. वेळीप्रसंगी बाका-प्रसंग आलाच तर (दोन इंजिन्स असलेले विमान) एका इंजिनावर काम भागवून सुरक्षितपणे विमान उतरण्याइतकी राखीव शक्ती निर्माण करणारे इंजिन महत्त्वाचे असते. अव्हरोच्या बाबतीत उड्डाण करतानाचे वेळी जास्तीत जास्त ४४,५०० पौंड वजन घेण्याची मुभा आहे. पण विमान उतरण्याची पायरी अधिक महत्त्वाची अस-ल्याने जादा सामान असणे धोक्याचे म्हणून उतरण्याच्यावेळी त्या विमानात ४१,५०० पौंडापेक्षा जादा वजन चालत नाही. आता मधले ३००० पौंड कमी कसे करणार ? हे वजन हलके होते कारण विमानाला लागणारे पेट्रोल कमी झाल्याने, पण अव्हरो विमान तासाला १६ हजार पौंड पेट्रोल फस्त करते. म्हणजे पूर्ण वजना-

पृष्ठ ५५ वर

# राजकारणाचे ‘ खतखते ’

गोमंतकाच्या राजकारणाचे ‘ खतखते ’ झाले आहे.

खतखते हा गोयकारांच्या खास आवडीचा पदार्थ. उकडचा तांदुळाच्या पेजेबरोबर या खतखत्याची चव ‘अमृतातेही पैजा जिंके’ अशी असते. भोपळा, मुळा, पपई आणि सर्वप्रकारचे कंद व भाज्या यांचे, भरपूर नारळ खवून घातलेले, खास गोमंतकीय पद्धतीने बनविलेले खतखते, एकदा खाल्ले की त्याची चव मरणापर्यंत सोबत करते म्हणतात. या खतखतत्यात काही पदार्थ शिजून एकजीव होतात तर काही मात्र आपली अस्मिता टिकवून तसेच वेगळे रहातात आणि शेवटी मोजक्या अशा ताज्या खमंग त्रिफळांचं पाणी याच्यात टाकताच त्याचं रूप, रस, गंध सारंच बदलतं.

येथील राजकारणाचे असेच झाले आहे. गेल्या चार-सहा महिन्यातील घडामोडी या अशा उगाचच खतखतल्यासारख्या आवाज करीत आहेत. नुसताच, काही निष्पन्न न करणारा.

विधानसभेचा विश्वासाचा कौल घेऊनसुद्धा मुख्यमंत्री श्री. दयानंद बांदोडकरांना स्वतःचे मंत्रिमंडळ वाढविता येत नाही.

विलीनीकरण आणि मराठी भाषा यांच्यासाठी गदारोळ उठविणारे आणि महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाचे नेते श्री. बांदोडकर यांच्याविरुद्ध बंड पुकारणारे, प्रा. गोपाळ मयेकर यांच्यासारखे आमदार ‘ काँग्रेसवासी ’ होतात. तेसुद्धा कोकणी भाषा आणि घटकराज्याचा पुरस्कार करणाऱ्या नवकाँग्रेसच्या श्री. पुरुषोत्तम काकोडकरांसारख्या स्थानिक नेतृत्वासमोर लोटांगण घालून.

श्री. मयेकरांचा एकेकाळचा जवळचा मित्र मला म्हणाला, “ मयेकरांसारख्या मराठीच्या नावाने कंठशोष करणाऱ्या प्राध्यापकाकडून हे अपेक्षित नव्हतं. हे संधिसाधू राजकारण. तत्त्वभ्रष्टतेचं याहून मोठं दुसरं उदाहरण कोणतं असू शकणार ?”

रातोरात मते बदलणारं एक स्थानिक वृत्तपत्र सोडलं तर गोमंतकात जवळजवळ प्रत्येकाला हेच वाटतं. माजी मंत्री अन्थनी डिसूझा यांच्या मागोमाग श्री. मयेकर व श्री. गजानन पाटील या आणखी दोन आमदारांनी नवकाँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यामुळे बंडखोर म. गो. आमदारात फूट पडली हे उघडच झाले. कारण त्यांचेच एक सहकारी उपसभापती मंजू गावकर यांनी या नवकाँग्रेसवाल्यांच्या चिध्या केल्या. मयेकर, पाटील यांच्या काँग्रेसप्रवेशाचे स्वागत करणारे एक पत्रक म्हापशाच्या काही प्रमुख नागरिकांनी काढले. अर्थात हे सर्व एका ठराविक गटाचे आहेत एवढे सांगितल्यास पुरे. तसेच पत्रक काढणाऱ्यांपैकी कुणीही स्वतः काँग्रेसप्रवेश करत नाही. कारण ते त्यांना परवडणारे नाही. आणि पुन्हा उद्या बांदोडकर मजबूत झाल्यासारखे वाटले तर ‘ इदं न मम ’ म्हणणेही सोपे जावे.

याच्यामागोमाग आता स्वातंत्र्यवीर श्री. मोहन रानडे, श्री. तेल मस्कारेन्य व इतर अनेक मंडळी कॉंग्रेसप्रवेश करणार असल्याची घोषणाही करण्यात आली आहे. बहुधा क्षणभर असे म्हणता येईल की गर्भातच अंत झालेल्या गोवा-मुक्ती आघाडीचे बरेचसे सदस्य कॉंग्रेसप्रवेश करतील. याचाच अर्थ असा की बांदोडकरांना खाली खेचण्याचे एक राजकारण म्हणून या साऱ्या क्रिया होत असल्याचे स्पष्ट मत राजकीय पंडित व्यक्त करीत आहेत.

परंतु याचा दूरगामी परिणाम गोव्याच्या राजकारणावर काही होणार आहे का?

माझ्यामते नाही.

गेली आठ-दहा वर्षे गोव्यात चाललेले कॉंग्रेस राजकारण, लोकांच्या त्यावरील तीव्र प्रतिक्रिया आणि पुरुषोत्तम काकोडकरांसारखे नेतृत्व अशा परिस्थितीत गोव्यात कॉंग्रेस रुजली तर ते जगातले आठवे आश्चर्य मानावे लागेल आणि म्हणूनच श्री. दयानंद बांदोडकरांसारखा माणूस कॉंग्रेसची ध्येयधोरणे मान्य असूनसुद्धा कॉं. प्रवेश करण्याची टाळाटाळ करीत असावा हे उघड आहे.

'आणि काल-परवापर्यंत कॉंग्रेस, तिचे स्थानिक नेतृत्व यांच्याविरुद्ध शिवराळ प्रचार करणारी मयेकर, डिसूझांसारखी माणसे आणि पत्रकार तिला मिठ्या मारतात हे कशाचे द्योतक ?' या सामान्यांच्या प्रश्नाला आमच्याकडे उत्तर नाही.

'राजकीयदृष्ट्या या लोकांच्या कॉं. प्रवेशाने श्री. बांदोडकरांची परिस्थिती चांगली झाली. आणि मध्यंतरीपेक्षा चालू घटनांनी पुढील सार्वत्रिक निवडणुकीत बांदोडकरांचा विजय खूप सुरक्षित झाला. याच परिस्थितीचा फायदा त्यांना मिळेल' असे मत निरीक्षकांचे.

अशा एकूण पार्श्वभूमीवर उद्या श्री. कृ. बा. नाईक व त्यांचे सहकारी बंडखोर चार आमदार पुनश्च बांदोडकरांना जाऊन मिळाले तर त्याचे येथे कुणालाच आश्चर्य वाटणार नाही.

येथील बहुसंख्य विचारवंत नेते आज स्पष्टपणे म्हणतात की लोकशाहीची ही विटंबना थांबवा.

केंद्राने बांदोडकरांवरील आरोपांची जाहीर चौकशी करावी.

विधानसभा बरखास्त करून मंत्रिमंडळ बडतर्फ करावे.

मुदतपूर्व निवडणुका घ्याव्यात.

किंवा हे एवढे करावयाचे नसेल तर मंत्रिमंडळ विस्ताराची बांदोडकरांची न्याय्य मागणी तरी मंजूर करावी.

परंतु हे 'खतखते' खतखततंच आहे. काहीच होत नाही.

## जत्रा–उत्सव

गोव्यात सर्वत्र जत्रांचा मोसम सुरू झाला आणि तुंबून राहिलेली सामान्यांची उत्सवप्रियता ओसंडून वाहू लागली.

चार महिन्यांचा भरपूर पाऊस पिऊन तुडुंब भरल्यापोटानी सगळी शेतेभाते सुस्तावतात आणि तेव्हाच गोमंतकात 'जत्रा' भरते. दसऱ्याचं सीमोल्लंघन झालं की पहिल्यांदा दिसतो तो जत्रेचा तोंडवळा. आज मडकई तर उद्या कवळे. आज या देवळाकडे तर उद्या त्या मंदिरापाशी. माणसांचे तळे साचल्यागत वाटतं. दिवस संपतो-रात्र वाढते तशी जत्रा फुलत रहाते. फुगत जाते. आणि फुटलेले फुगे; भजी-खाजे खाऊन टाकलेले कागदाचे कपटे आणि इतर अनेक अखाद्य वस्तूंचा ढीग मागे टाकून ती संपते.

कार्तिकात उघडून जेष्ठात बंद होणाऱ्या या जत्रेच्या मोसमात खूप धमाल उडून रहाते. या काळासाठी दुकाने घेऊन जत्रेत फिरणारे फेरीवाले वेळापत्रके आखतात आणि त्याचबरोबर खेड्यापाड्यातील घराघरातून विसावलेला गोमंतकीय गांवडा आणि कुळवाडी कुणबी तसेच धनगर, जत्रेत खरेदी करावयाच्या वस्तू आणि कडोसरीचे पैसे यांचा मेळ बसवीत असतात.

कोणत्या कालात अथवा जत्रेत किती पैसे खर्च करायचे याचे अंदाजपत्रक त्या श्रमिकाने खोपटीत बसून तयार केलेले असते. आणि हाती पैसा नसला तर जत्रेची किमत त्याच्या लेखी शून्य. एखाद्या सगुणेला जत्रेला न गेल्याबद्दल शेजारणीनं छेडलं तर उत्तर ऐकू येते,

'किती करू बाये, जात्रे वतली म्हळचार चार आणे लेगीत ना.'

आणि तसं पाहिलं तर येथील जत्रा या खऱ्या श्रमिकांच्याच! कच्च्या लोखंडाच्या खाणीतील मातीने माखलेला, शेतात राबणारा, कुळागर कसणारा, हाच खरा जत्रेने अधिक सुखावतो. नाटक–सिनेमाची महागडी शहरी करमणूक त्याला परवडणारी नसते. तो नाटक पहातो, पण ते गावात गावकऱ्यांनी केलेलं. उघड्या मंडपातलं. तो रस घेतो इथेच.

या साऱ्या कोलाहलातून जत्रा उभी रहाते. लोकांच्या झुंडीच्या झुंडी जत्रेला लोटतात. रात्रीच्या वेळी काळोखात चूड पेटवून अथवा विजेरी घेऊन, कधी कंदिलाच्या प्रकाशात तर कधी पेट्रोमॅक्सच्या झगमगाटात. कुठे मेणबत्तीच्या मिणमिणत्या उजेडातही! मंदिरात मंडळी दर्शनासाठी तिष्ठत असतात. नवस फेडले जातात. पालखी अथवा रथाची मिरवणूक निघते.

या जत्रातून मीही वेड्यासारखा फिरतो. देवासमोरच्या ताटातील फुलांचा सुगंध, उदबत्त्यांचा घमघमाट, निर्माल्याचा वास आणि त्यातच कुणा पुरंध्रीनं धारण केलेल्या अत्तराचा अगर सौंदर्यप्रसाधनांचा सुखावणारा गंध वायुलहरीवर तरंगत येतो. नाकावाटे रंध्रारंध्रात शिरतो आणि मी चक्रावून जातो. क्वचित देवदर्शनाच्या जोडीनं होणारं एखाद्या सुंदरीचं मनोज्ञ दर्शन आणि पाठीमागून होणारा उभार छातीचा व पुढं ढकलु पहाणाऱ्या हातांचा स्पर्श यांनी मी थरारून जातो. माझे पाय तिथेच जडावतात. मुंग्यांची रांग पुढं सरकू लागते. □ □ □

सु. ल. सोमण

# मध्य पूर्व : आम्ही पॅलेस्टाईनमध्ये परतणारच !

" पॅलेस्टाईनबाबत काहीतरी आंतरराष्ट्रीय कट शिजतोय. त्याला आम्ही फसणार नाही. आम्ही पुन्हा पॅलेस्टाईनमध्ये पाय ठेवणारच; संपूर्ण पॅलेस्टाईन हेच आमचं उद्दिष्ट आहे !"

जॉर्डनच्या पश्चिम भागातल्या गनीम शासनाचं व उर्वरित जॉर्डनचं संघराज्य प्रस्थापित करून, पॅलेस्टॅनियन निर्वासितांचा प्रश्न सोडवला जावा असा प्रस्ताव मध्यंतरी मांडण्यात आला होता. प. विभागातील नॅब्लुस शहराचे माजी महापौर हमदी कन्नान ह्यांनी देखील नुकताच ह्या सूचनेचा पाठपुरावा केला. किंबहुना हा पर्याय बरंच मूळ धरू पाहात आहे; व संघराज्याचं प्रमुखत्व मिळाल्यास, पश्चिम विभागाला स्वायत्तता देण्यास जॉर्डनचे राजे हुसेन देखील विरोध करणार नाहीत असाच अंदाज पाश्चात्य वर्तुळातनं व्यक्तविला जात आहे. असं असलं तरी, पॅलेस्टाईन मुक्तिसंघटनेचे प्रमुख यासेर अराफत ह्यांनी मात्र पत्रकारांजवळ बोलताना वरीलप्रमाणे प्रतिक्रीया व्यक्त केली आहे तें पुढे म्हणाले, "...संघराज्याचं मधाचं बोट लावून, पॅलेस्टाईनचा प्रश्न ते निकालात काढू पाहात आहेत. उघडच, पॅलेस्टाईन निर्वासितांचा प्रश्न वाळीत टाकण्याचा हा प्रयत्न आहे. हे होऊ दिलं जाणार नाही. पॅलेस्टाईन–संपूर्णपणे घेतल्याशिवाय आता हे पाऊल मागे हटणार नाही....आमचं सामर्थ्य वाढलं आहे...आमची एकी अभंग आहे...क्रांतिकारी पॅलेस्टॅनियन अरब राष्ट्र ही वस्तुस्थिती आहे. आमचं अस्तित्त्वं सिद्ध करण्यासाठी कुठल्याही आकांडतांडवाची आम्हाला आज गरज नाही. ती वस्तुस्थिती आहे... आणि शेवटी विजय आमचाच आहे. "

आणि परिस्थिती ज्या प्रमाणात बदलत आहे ते पाहता, निर्वासित अरबांच्या स्वतंत्र, सार्वभौम राष्ट्राच्या मागणीला मान्यता न देणं फार काळ कुणालाच साध्य होणं शक्य वाटत नाही. खुद्द इस्रायली गोटातूनही ही जाणीव होत असल्याचं दिसून येत आहे. निर्वासित अरबांच्या स्वतंत्र राष्ट्राचं पिल्लू, नासेर-मृत्यूनंतर इस्रायलनंच उचलून धरलं होतं. तर आता, इस्रायलच्या सत्ताधारी लेबर पार्टीचे जनरल सेक्रेटरी ॲरी एलिआव्ह ह्यांनी म्हटलं आहे की, " बाल्यावस्थेतला पॅलेस्टॅनियन अरब राष्ट्रवाद आस्तित्त्वात आहे, हे प्रथम मान्य केलं पाहिजेच. त्यांना 'राष्ट्र' ही संज्ञा सार्थ ठरावी. "

इस्रायलच्या जन्मापासून, १९४७ पासून, वादग्रस्त ठरलेल्या ह्या छोटयाशा टापूत, दोन संस्कृतींचा सतत झगडा चालू आहे. १९४८ मध्ये, म्हणजे पहिल्या अरब-इस्रायली संघर्षापूर्वी, पॅलेस्टाईनमध्ये अंदाजे आठ लक्ष अरब तर साडेसहा लक्ष ज्यू होते; तर आज, मुळच्या पॅलेस्टाईनचा संपूर्ण भाग व बराचसा टापू इस्रायली अधिपत्याखाली असून ज्यूंची संख्या साडेतेवीस लाखांवर गेली आहे. अरब लोकसंख्या चार लाखांवर घसरली आहे. उर्वरित अरब-वस्ती, गनिमांच्या ताब्यातल्या जॉर्डनच्या पश्चिम भागात, इस्रायलनं व्यापलेल्या गाझा पट्टीत विखुरलेली आहे. ह्याखेरीज, जवळजवळ पंधरा लाख पॅलेस्टॅनियन अरब निर्वासित, जॉर्डन, सिरीया, लेबॅनॉन आदी शेजारी राष्ट्रातून विखुरले आहेत. ह्या निर्वासित अरबांचा प्रश्न सुटण्यावरच मध्य पूर्वेतली तंगी अवलबून आहे. त्यातनंच ह्या प्रदेशात शांतता प्रस्थापित होऊन, तिथल्या जनतेला, राष्ट्रांना विकास साधता येणं शक्य आहे आज ह्या गोष्टीची जाणीव दोन्ही पक्षांना होऊ लागलेली दिसत आहे. इस्रायलच्या संपूर्ण उच्चाटनाची भाषा म्हणूनच अलीकडे अरबांनी सोडली आहे. तर, अरब निर्वासितांचा प्रश्न सुटला पाहिजे, असं त्यांची वाढती ताकद व त्यांना मिळणारा पाठिंबा बघून का होईना, पण इस्रायलचे नेते म्हणू लागले आहेत. गुन्नार जारिंग ह्यांच्या मध्यस्थीनं शांतता वाटाघाटी सुरू होण्याची शक्यता, म्हणूनच पुन्हा बळावली आहे.

ह्या प्रश्नावर चार तडजोडीचे मार्गही सुचवले गेले असून, शांतता-चर्चा चालू झालीच तर ह्या सूचनांचाही प्रामुख्यानं विचार केला जाईलच. तडजोडीचे हे मार्ग असे —

१. सीमारेषा पुन्हा कशाही निश्चित केल्या गल्या तरी एक गोष्ट निश्चित की, १९६७ मधील सहा दिवसांच्या युद्धात जिंकलेला सपूर्ण भाग इस्रायल परत करणं शक्य नाही. निर्वासितांपैकी ज्यांना इच्छा असेल त्यांना ह्या इस्रायली राज्यात परतायची मुभा ठेवून, बाकीच्यांना नुकसान भरपाई इस्रायलनं द्यावी व त्यांनी अन्यत्र स्थायिक व्हावं. अरब नेत्यांच्या कल्पनेप्रमाणे दहा टक्केही निर्वासित अरब, इस्रायली राज्यातनं परतणार नाहीत; तर इस्रायलला भीती वाटते की अरब मोठ्या प्रमाणात परतले तर राज्ययंत्रणाच पोखरली जाऊन कोसळेल.

२. पॅलेस्टिनियन मुक्ती आघाडीन सुचवलं आहे की पॅलेस्टाईनमध्ये धर्मनिरपेक्ष लोकसत्ताक प्रशासन असावं व त्यामध्ये अरब वर्चस्वाचा आग्रह मुक्ती आघाडी धरणार नाही. ह्या राज्यात ज्यू, मुस्लिम सारे गुण्यागोविंदानं सहजीवन, लोकशाही तत्त्वांवर जगतील. अर्थातच ह्यामध्ये, इस्रायलचा सध्याचा ज्युईश पायाच उखडला जाण्याची भीती आहेच; व तेच नेमकं इस्रायलला नको आहे.

३. गाझा पट्टी व वेस्ट बँक ह्यांचं मिळून स्वतंत्र राष्ट्र अरब निर्वासितांसाठी निर्मावं. परंतु अशा राष्ट्राला सर्वच बाबतीत ज्यू इस्रायलवर अवलंबून राहावं लागणार आहे.

४. चौथी सूचना, वर सुचविल्याप्रमाणे वेस्ट बँक व जॉर्डन ह्यांचं संघराज्य निर्माण करण्याची आहे.

...मोशे दायान व राजे हुसेन ह्यांनी वाटाघाटींना संमती दर्शवली आहे. इजिप्त तयार होईलसं दिसतं. अराफतही वाटाघाटींना विरोध करीलसं दिसत नाही... मध्य आशियातल्या संघर्षाची गाठ सुटू लागेल का ??

## ब्राझील : दहशतवाद्यांची माघार ?

दक्षिण अमेरिकेतल्या ह्या राज्यात, प्रजासत्ताक राजवट उलथून टाकून सहा वर्षांपूर्वी सैन्यानी प्रशासनावर कब्जा केला. त्यावेळच्या अध्यक्ष जोॲओ गौलआर्ट राजवटीत ब्राझीलमध्ये अंदाधुंदी माजली होती. अर्थव्यवस्था कोलमडली होती साहजिकच अराजकसादृश परिस्थिती निर्माण होताच, सैन्यानं हस्तक्षेप करून सत्ता हस्तगत केली. गेल्या सहा वर्षातल्या सैनिकी राजवटीनं ब्राझीलची अर्थव्यवस्था सुधारली असून, निर्यात झपाट्यानं वाढली आहे. बेकारीचं प्रमाण खूपच कमी झालं असून. आर्थिक मंदीची आलेली लाट यशस्वीपणे परतवण्यात लष्करी प्रशासन यशस्वी झालं आहे. असं असलं तरी ब्राझीलपुढे आज असंख्य प्रश्न उभे आहेत.

ब्राझीलमध्ये नव्यानं आलेली आर्थिक सुबत्ता केवळ दहा टक्के ब्राझीलियनांमध्येच वाटली गेली आहे. तर सर्वसामान्य ब्राझीली नागरिक आजही कष्टप्रद जीणंच जगतो आहे. त्यातही अनेक बंधनं लष्करी प्रशासनानं जनतेवर लादलेली आहेत. ह्यातूनच ब्राझीलियन दहशतवाद्यांच्या जनताक्रांती आघाडीला जन्म मिळाला. दहशतवादी, सरकारी मालमत्ता, कचेऱ्या, सैनिकी केंद्र इत्यादींवर सातत्यानं हल्ले चढवतात. अलीकडेच त्यांनी ब्राझीलमधल्या पाश्चात देशांच्या प्रतिनिधींना पळवून नेण्याचे प्रकार घडले. मागच्याच आठवड्यात स्विझर्लंडचे प्रतिनिधी बुचर ह्यांना दहशतवाद्यांनी बंदुकीचा धाक दाखवून पळवून नेलं. तत्पूर्वी त्यांनी जपान, प. जर्मनी, अमेरिका आदी राष्ट्रांच्या प्रतिनिधींना ताब्यात घेतलं होतं. कैद्यांच्या बदल्यात ह्या दहशतवाद्यांनी ब्राझील शासनाच्या तुरुंगात अडकून पडलेल्या कैद्यांच्या मुक्ततेची मागणी केली आहे ! ह्या साऱ्यातनं राज्ययंत्रणेला तडे जावेत, सेनाधिकाऱ्यांनी अतिरेकी भूमिका घ्याव्यात व त्यातून अराजक माजून क्रांती घडून यावी असं साधं गणित दहशतवाद्यांनी मांडलं आहे. प्रशासनही ह्या गणिताला बळी पडताना दिसत आहे. प्रशानसानं घटना रद्द केली आहे; विधिमंडळ बरखास्त केलं आहे; हजारो ब्राझीलियन्सचं राजकीय स्वातंत्र्य छिनावून घेतलं आहे; दहशतवाद्यांचे अमानुष छळ चालवले आहेत...

प्रशासनाच्या ह्या साऱ्या कृत्यांनी जनतेत क्रांती आघाडी वास्तविक प्रिय होऊ पाहात होती. दहशतवाद्यांना आवश्यक ती पार्श्वभूमी तयार होऊ पाहात होती.

परंतु ह्याचवेळी दहशतवाद्यांनी राजकीय प्रतिनिधींच्या पळवापळवीचं सत्र सुरू केलं. शिवाय त्यांच्या काही अराजकी कृत्यांतनं पन्नासाहून अधिक निरपराध ब्राझीलियन्सचा बळी घेतला गेला. ह्या अलीकडच्या कृत्यांमुळे मिळवलेली सहानुभूती डळमळीत होऊ लागली होती. नि नेमक्या ह्याच सुमारास, ब्राझीलचे नवीन अध्यक्ष एमिलिओ गारास्त्झु मेडिसी ह्यांनी नवीन घोषणा करून दहशतवाद्यांच्या शिडातली हवाच काढून घेतली आहे. नवीन अध्यक्षांची मुदत १९७४ मध्ये संपते. तत्पूर्वी जनतेला निर्बंध विद्यापीठे, निर्बंध राजकीय पक्ष, खुल्या निवडणुका बहाल करून, राष्ट्राध्यक्षांच्या हुकूमशाही राजवटीचा शेवट केला जाईल असं अध्यक्ष मेडिसी ह्यांनी आश्वासन दिलं आहे. ब्राझीली जनतेच्या मतप्रदर्शनाचं दर्शन नुकतंच तिथल्या काहीशा मर्यादित निवडणुकात झालं; नि त्यात त्यांनी दहशतवाद्यांना साफ धुडकावून लावल्याचं दिसलं.

ब्राझीली जनता दहशतवाद्यांपासून अशी दूर जात असता, तिथलं सरकार मात्र शांतपणे त्यांच्याशी राजकीय प्रतिनिधींच्या सुटकेसाठी वाटाघाटी करीत आहे!

□ □ □

---

## पाच सेंट्सचा डॉलर

बेकारी......महागाई......भडकल्या किंमती......वाढतं जीवनमान... साहजिकच महागाईभत्त्यातील वाढीसाठी लढे......चलनवाढ.......पुन्हा बेकारी......महागाई......ह्या दुष्ट चक्रातनं भारतीय जनता सतत जात आहे. हातात अधिक पैसा येत असूनही भीषण महागाई त्रस्त करून सोडत आहे. रुपयाचं व्यावहारिक मूल्य पार घसरलं आहे.

...अशाच तऱ्हेच्या दुष्टचक्रानं आज अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्रालादेखील ग्रासलं आहे. नोकऱ्यांसाठी, अधिक चांगल्या राहणीमानासाठी. वेळीअवेळी अमेरिकेत येणाऱ्या परदेशीयांना तर नोकऱ्या मिळत नाहीतच, परंतु खुद्द अमेरिकनातलं बेकारीचं प्रमाण वाढत आहे. आजमितीला अमेरिकेत ४६ लक्षांवर (६%) बेकार आहेत, तर कित्येकांना ले.—ऑफ, कासाचे तास कमी करणे वगैरेंमुळे फार मोठी झळ सोसावी लागली आहे. लोकांना घराची वा गाड्यांची खरेदी रद्द करावी लागत आहे. तर विद्यार्थ्यांना त्यांचा कॉलेज प्रवेश पुढे ढकलावा लागत आहे. डॉलरचं व्यावहारिक मूल्य साफ घसरलं आहे; नि नवीन चिंता सर्वांना ग्रासू लागली आहे—

"सर्वांनी मिळून प्रयत्न केले तर ठीक. नाहीतर लौकरच पांच सेंट्सचा डॉलर वागवावा लागेल खिशात!"

---

# हे कलकत्ता !

सौ. तारा पंडित

## विरोधाभास

नक्षलवाद्यांनी बंगालला बरीच प्रसिद्धी मिळवून दिली आहे. एवढंच नाही, सगळ्या जगाच्या कुतूहलाचा आपण विषय आहोत याचाही त्यांना अभिमान वाटतो. अस्तित्वात असणाऱ्या गोष्टी नष्ट करणं हे त्यांचं आद्यकर्तव्य ! त्यातून नवनिर्मिती होईल तेव्हा होईल. त्यांच्याजवळ देवाधर्मालाही क्षमा नाही. उगाच का रामकृष्ण मिशनच्या सांस्कृतिक केंद्रावर त्यांनी हल्ला केला ?

सांगायचं म्हणजे, ज्या भूमीत आजचा तरुण धर्माचा मान राखायला राजी नाही त्याच भूमीत श्रद्धेने धर्माची जोपासना करणारी अगदी तरुण मनेही दिसून येतात. ही नवल करण्यासारखीच गोष्ट नव्हे काय ? याचं उदाहरण म्हणजे विश्वनाथ आणि अमरेंद्र ह्या दोन मुलांनी आखलेली योजना.

कलकत्त्याची ही दोन मुलं दक्षिणेश्वर येथे जाऊन गंगेच्या पाण्याने भरलेला कलश घेऊन कन्याकुमारीच्या प्रवासाला निघाली आहेत. तेथे गेल्यानंतर कलशातील पाणी विवेकानंदांच्या मूर्तीच्या चरणांवर ते ओतणार आहेत. प्रकृती चांगली राहिली तर कन्याकुमारीपासून विवेकानंद खडकापर्यंत सुमारे चारपाचशे यार्डांचे अंतर पोहून जाण्याचा त्यांचा विचार आहे. ह्या प्रवासाला त्यांनी 'विवेक यात्रा' असं नाव दिलं आहे. १८७५ मैल (सुमारे ३००० कि. मी.) अंतर ६० दिवसांच्या पदयात्रेत पूर्ण करण्याचा त्यांचा मानस आहे. प्रत्येकाने बरोबर फक्त ५ रु. आणि थोडे काजूकिसमिस घेतले असून कपड्यांचा एकेकच सेट व एकेक ब्लँकेट पाठीवर लटकवलेल्या बॅगेत भरून ते मार्ग चालत आहेत. सध्या त्यांचा प्रवास कटकपर्यंत झाला आहे. जवळची ओळखपत्रे त्यांनी लाल रंगाच्या कव्हरमध्ये ठेवली आहेत. ते म्हणाले, 'आमच्याजवळ Mao-Literature आहे असा आरोपही कोणी करण्याची शक्यता आहे.' आणि ते विनोदाने हसले.

'एक्स्प्लोअरर्स क्लब' चे अध्यक्ष श्री. मिहिर सेन म्हणाले, 'आजवर येथे अनेक प्रकारचे लोक आले– कुणी प्रेमिक, कुणी अस्वस्थ, कुणी बंडखोर . . . पण धार्मिक

भावना हृदयात बाळगणारे तरुण हे पहिलेच ! काळाच्या महान् प्रवाहात वाट चुकलेल्या वाटसरूंसाठी हे जणू दीपस्तंभच !'

आजच्या ह्या श्रद्धाळू आणि विध्वंसक अशा परस्परविरोधी मनोरचना असणाऱ्या तरुणांमध्ये एका बाबतीत फक्त समानता दिसून येते— ती म्हणजे दोघांच्याही अंतःकरणात तेवत असणारी पराक्रमाची आणि आत्मविश्वासाची ज्योत !

## वार्षिक परीक्षांबाबत

'या, या. किती दिवसांनी भेटताहात !'

'अहो, काय करणार ! वार्षिक परीक्षा जवळ आल्यात ना मुलांच्या ! मुलांपेक्षा आईबापांनाच काळजी जास्त !'

'हो ना. कशा बाई यंदा परीक्षा पार पडणार कोण जाणे ! साऱ्या शहरात हा धुमाकूळ अन् ऐन परीक्षांचे वेळी नेमके शाळांवर हल्ले ! काय करावं काही सुचत नाही !'

'अहो खरंच, तुम्ही ती बातमी वाचलीत का ?.... नक्षलबारी खेडं असलेल्या सिलीगुडी जिल्ह्यातली ?'

'नाही बाई. कसली बातमी सांगा तरी.'

'अहो, सिलीगुडी जिल्ह्यात पालकांची एक समिती स्थापन झालीय् म्हणे अन् चारु मुजुमदारची बायकोच तिचं नेतृत्व करतेय् !'

'अगबाई, खरं की काय ? अन् ही समिती करणार तरी काय आहे ?'

'हे पालक म्हणे आळीपाळीने परीक्षा केंद्रांवर पोलिसांबरोबर पहारा देणार आहेत. प्रत्येकाला आपल्या मुलाची काळजी असते ना ?'

'ही कल्पना छान आहे, बाई !'

'अहो, कल्पना काय घेऊन बसलात त्याचं प्रात्यक्षिक देखील सुरू झालंय्. अन् तुम्हाला आश्चर्य वाटेल, त्या लीलाबाई मुजुमदार (चारू मुजुमदारची बायको) स्वतः जातीने परीक्षा केंद्रावर हजर राहताहेत म्हणे ! त्यांची मुलं बसताहेत ना परीक्षेला.'

अगबाई, हो का ? नवलाचीच गोष्ट हं बाकी. आता ह्या लीलाबाईंना म्हणावं, 'नुसत्या सिलीगुडीलाच बसून राहू नका. जरा कलकत्त्यालाही येऊन बघा. अन् होऊन जाऊ द्या तसलाच प्रयोग इथेही !'

'हो ना. म्हणजे आमच्याही मुलांच्या परीक्षा सुखरूप पार पडतील आणि आमचीही काळजी मिटेल !'

३० डिसेंबर १९७०

## डबल भाषा ?

सी. पी. आय्. (एम्.)चे लोक सरकारने मध्यवर्ती राखीव पोलीस इथे आणून ठेवल्याबद्दल खूप टीका करतात. कलकत्त्याचे मेयर हे ह्याच पार्टीचे आहेत.

एक दिवस एक नक्षलवादी तरुण मेयरच्या मागे लागला. गृहस्थाला पळता भुई थोडी झाली.

वार्ताहरांना ही घटना कथन करून झाल्यावर मेयरसाहेब रागाने म्हणाले,

'इतके सारे राखीव पोलीस इथे आणून ठेऊन उपयोग काय ? मला तर एकही कुठे दिसला नाही !'

—आणि वार्ताहर एकमेकांकडे पाहून गालात हसले.

## तीन पुतळे

राजभवनापासून आकाशवाणी भवनपर्यंत चालत आलं की एका रेषेत थोड्या थोड्या अंतरावर असलेले तीन पुतळे दिसतात. पैकी एक आहे नेताजी सुभाषचंद्रांचा. नक्षलवाद्यांनी गांधींच्या पुतळ्यावर हल्ला करायचा प्रयत्न केला असला तरी सुभाषचंद्रांकडे अजून तरी त्यांची वक्रदृष्टी वळली नाही. तसा जनरल बंगाली माणसाला सुभाषचंद्रांबद्दल भलताच आदर आहे. शिवाय कपाळावर कोणत्याच पार्टीचं लेबल नसल्यामुळे कदाचित् सुभाषचंद्र प्रत्येकालाच 'आपोनजन' (आपला माणूस) वाटत असावा. काही का असेना, कलकत्त्याच्या धुमश्चक्रीत सुभाषबाबू अजूनही आपल्या जागी निर्धाराने जसेच्या तसे उभे आहेत.

आणखी पुढे काही अंतरावर लोकमान्य टिळकांचा पुतळा आहे. लोकमान्यांच्या कर्तृत्वाबद्दल फार कमी लोकांना माहिती आहे. तरुण पिढीला तर माहितीच नाही म्हटलं तरी चालेल. ती मिळवण्याच्या भानगडीतही ते पडत नाहीत. वेळच कुठे आहे ? हा कुणी तरी थोर पुरुष होता एवढं ऐकून माहीत आहे. कदाचित् लोकमान्यांच्या नावाचाही काही प्रभाव असावा. 'लोकमान्य' आहेत तेव्हा सगळ्याच लोकांनी त्यांना मानायला हवं अशीही समजूत असावी. कारण काहीही असो, टिळकांच्या पुतळ्याकडे विध्वंसकांनी आजवर कानाडोळाच केलेला आहे. लोकमान्य आपली काठी धरून सुभाषचंद्रांसारखेच निर्धाराने उभे आहेत. शिवाय सायंकाळचे वेळी तिथे एक निराळंच दृश्य दिसतं. त्यांच्या पायथ्याशी बसून काही बिहारी लोक मोडक्या तोडक्या भाषेत चालणारं रामायण किंवा तत्सम प्रवचन ऐकण्यात तल्लीन झालेले दिसतात. लोकमान्यांशी त्यांना काही कर्तव्य नाही. त्यांना आपली तीच जागा सोयीची वाटते एकत्र येण्यासाठी. एका दृष्टीने त्यांनी लोकमान्यांना

अधिक उंच केलं आहे असं म्हणायला हरकत नाही.

आणखी पुढे गेलं की तिसरा पुतळा दिसतो तो चित्तरंजन दास ह्यांचा. आता परवापरवाच त्यांच्या जन्मशताब्दीला त्या पुतळ्याचा अनावरण समारंभ झाला. ह्या पुतळ्याजवळ मात्र निराळंच दृश्य दिसतं–काही हत्यारबंद पोलीस पायथ्याशी पहारा देत असलेले दिसतात. दासबाबूंच्या सुरक्षिततेला धोका आहे काय ? हा विचार मनात मागच्या दाराने प्रवेश करतो. मग असं का ? हे प्रश्नचिन्ह पाठोपाठ उमटतं. वास्तविक शिल्पकाराने दूरदृष्टी ठेऊन माणसाच्या उंचीच्या मानाने खूप उंच असलेल्या बैठकीवरच तो भव्य पुतळा उभारला आहे. तरीदेखील सरकार दासबाबूंच्या सुरक्षिततेविषयी साशंक आहे. म्हणून तर हा खटाटोप !

सामान्य माणसाच्या मनात तिथून चालत जाताना एकच विचार येतो–हे नेताजी अन् हे लोकमान्य ह्यांना संरक्षणाची गरज नाही; त्यांच्याच शेजारी उभ्या असलेल्या चित्तरंजन दासना मात्र पोलीस संरक्षणाची आवश्यकता का निर्माण व्हावी ? त्यासाठी हा व्यर्थ खर्च होत राहावा ? बंगालमध्येच बंगाली माणसाच्या पुतळ्याला धोका निर्माण व्हावा ही नवलाचीच गोष्ट !

.. ह्याच संदर्भात एक गोष्ट आठवली. एकदा एका विद्यार्थ्याला विचारण्यात आलं– ' चित्तरंजन दास कोण होते सांग बघू. '

तो पटकन् म्हणाला, ' देशातले पहिले इंजिनिअर, ज्यांनी प्रथम रेल्वेचा कारखाना सुरू केला. '

' अरे, हे बरोबर नाही. ' असं म्हणताच तो विद्यार्थी उलट विचारू लागला–

" मग ते ' चित्तरंजन लोकोमोटिव्ह ' कसं झालं ?" –आता विचारणारेच निरुत्तर झाले.

आजच्या तरुण पिढीला जुन्या पिढीतल्या कर्तृत्ववान व्यक्तींमध्ये इंटरेस्टच नाही की काय ?

□ □ □

हंसा वाडकर यांचे आत्मकथन

**सांगत्ये ऐका**

**सांगत्ये ऐका**

मूल्य आठ रुपये

राजहंस प्रकाशन

वा. दा. रानडे

छोट्या पक्षाच्या तालाने नाचणाऱ्या

# अस्थिर
# बिहारची शोकान्तिका

उत्तर प्रदेशामागोमाग बिहार मधील सत्ता गेल्याने पंतप्रधान इंदिरा गांधींच्या काँग्रेसला मोठा हादरा बसला आहे. वर्षाच्या सुरुवातीला या दोन्ही राज्यात आपल्याला अनुकूल सरकारे अधिकारावर आणून इंदिरा गांधींनी सिंडिकेटवर मात केली होती पण आता सिंडिकेटने डाव उलटविला आहे. निवडणुकीपूर्वी या दोन राज्यातील सत्ता गेल्याने लोकसभेत हुकमी बहुमत मिळविणे इंदिरा गांधींना अधिकच कठीण जाईल.

इंडिकेट काँग्रेसच्या नेत्यांनी आपल्या चुकीच्या डावपेचांमुळे ही परिस्थिती स्वत:च ओढवून घेतली. उत्तर प्रदेशात चरणसिंगांच्या पक्षाशी केलेली युती मोडण्यात त्यांनी घाई केली. तर बिहारमध्ये अयोग्य नेतृत्व बदलण्यात दिरंगाई केली. एकीकडे घाई आणि दुसरीकडे दिरंगाई अशा या दोन प्रकारच्या दोन चुकांनी इंदिरा गांधींच्या पक्षाने दोन राज्ये गमावली.

दरोगाप्रसाद राय यांचे सरकार दहा महिने तरी अधिकारावर राहिले हेच आश्चर्य आणि या दहा महिन्यातील सारे दिवस सत्ता कशी टिकवायची याच्या कारवाया करण्यात, त्यासाठी निरनिराळ्या गटांना खूष करण्यात गेले. अधिकारपद स्वीकारताना संयुक्त आघाडीने जाहीर केलेल्या कार्यक्रमापैकी एकही कार्यक्रम या दहा महिन्यात दरोगाप्रसाद सरकारने पार पाडला नाही.

राय यांचे सरकार सुरुवातीस सहा पक्षांच्या आघाडीचे बनलेले होते. इंदिरा गटाची काँग्रेस, उजवे कम्युनिस्ट, प्रजासमाजवादी, भारतीय क्रांती दल, झारखंड,

झुल झारखंड हे सहा पक्ष सुरुवातीस या आघाडीत होते. शोषित दल व लोकतांत्रिक कॉंग्रेस त्यात नंतर सामील झाले. कम्युनिस्ट व प्रजासमाजवादी पक्षांनी सरकारमध्ये सामील न होता बाहेरून पाठिंबा दिला होता. कोणत्याच पक्षास निर्णायक बहुमत नसले की छोटया पक्षांना महत्त्व येते तसे बिहारमध्ये भारतीय क्रांतिदल, झारखंड, झुल झारखंड आणि शोषित दल या चार छोटया पक्षांना महत्त्व आले. अधिकारपदे व मंत्रिपदे मिळविण्यासाठी त्याचा त्यांनी भरपूर उपयोग करून घेतला. त्यांचे धोरण व राजकारण उघड उघड संधिसाधुपणाचे होते. दुसरीकडे अधिक फायदा होत आहे असे वाटले की पहिल्या सरकारमधून फुटून ते सरकार पाडावयाचे व दुसऱ्या आघाडीचे सरकारमध्ये सामील व्हायचे. हेच राजकारण हे पक्ष सतत खेळत आलेले आहेत. बिहारमध्ये चौथ्या निवडणुकीनंतर चार वर्षात सहा मंत्रिमंडळे गडगडली ती या पक्षांच्या कारवायांमुळेच. मुदतपूर्व निवडणुकीनंतर ही अस्थिरता दूर होईल असे वाटत होते पण निवडणुकीत कोणत्याही एका पक्षास निर्णायक बहुमत न मिळाल्याने संधिसाधू आघाड्यांचे राजकारण चालूच राहिले. मुदतपूर्व निवडणुकीनंतर हरिहरसिंग यांनी याच चार पक्षांच्या पाठिंब्याने सरकार बनविले होते. ते चार महिने टिकले व या पक्षांनी पाठिंबा काढून घेताच गडगडले. बिहारमध्ये दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष राजवट आली. दरम्यान कॉंग्रेसमध्ये फूट पडली. दोन्ही कॉंग्रेस पक्षांना सत्तेवर येण्यासाठी केवळ छोटया पक्षांशीच नव्हे तर मोठ्या पक्षांशी युती करणे भाग पडले. कम्युनिस्ट व प्रजासमाजवादी हे मोठे पक्ष आणि बाकी छोटया पक्षांच्या पाठिंब्याने अखेर दरोगाप्रसाद राय यांनी मंत्रिमंडळ बनविले. पण छोटे पक्ष आघाडीतून फुटताच ते गडगडले. चार छोटया पक्षांचे मिळून पक्षबळ पंचवीस होते. पण सत्तेचे पारडे वरखाली करण्यास एवढे बळ पुरेसे होते.

याच्या जोडीला दरोगाप्रसाद राय यांच्या कॉंग्रेसपक्षातच एक असंतुष्ट गट निर्माण झाला होता. राय यांना नेतेपदावरून दूर करावे अशी या गटाची मागणी होती. गेले दोन महिने त्यांनी या मागणीचा जोर धरला होता. वरिष्ठ नेत्यांनी दोन्ही गटात समझोता घडवून आणण्याचे प्रयत्न केले पण त्यांना यश आले नाही. बंडखोर गटाच्या चार सभासदांनी अविश्वास ठरावावरील मतदानात सरकारविरुद्ध मतदान केले. पण केवळ या चार सभासदांमुळे काही सरकार गडगडले नसते त्याचा पराभव झाला तो मुख्यतः चार छोटया पक्षांनी पाठिंबा काढून घेतल्याने.

पूर्वीच्या अखंड कॉंग्रेसला पुरोगामी समाजवादी कार्यक्रम अमलात आणण्यात प्रतिगामी सिंडिकेट गटाचा अडथळा येत असे. या गटाचा आता वेगळा पक्ष झाल्याने आमची कॉंग्रेस आता समाजवादी कार्यक्रम धडाडीने अंमलात आणील अशी आश्वासने इंदिरा गटाच्या कॉंग्रेसचे नेते देत होते. पण प्रत्यक्षात दरोगाप्रसाद सरकारच्या

कारभाराचे जे चित्र गल्या दहा महिन्यात दिसले ते पूर्वीच्या हरिहरसिंग सरकारच्या कारभारापेक्षा मुळीच निराळे नव्हते. निरनिराळ्या जातीय गटांची स्पर्धा व वैयक्तिक हेव्यादाव्यांनी पक्ष पोखरलेला होता. पूर्वीच्या दोन बिगर कॉंग्रेस मंत्रिमंडळांचा मुख्यमंत्री मागासलेल्या जमाती किंवा हरिजन यांच्यातील होता तेव्हा आपला मुख्यमंत्रीही याच वर्गापैकी असला पाहिजे याच उद्देशाने दरोगाप्रसाद रॉय यांची नेतेपदी निवड करण्यात आली होती. निवड बाह्यत: अविरोध झाली पण पक्षातील ब्राह्मण गटाचे नेते एल्. एन. झा यांचाही मुख्यमंत्रिपद मिळविण्याचा प्रयत्न होता. त्यांचे मन वळवून श्रेष्ठींनी त्यांना खाली बसविले. तीन महिन्यांनी विधान परिषदेसाठी झा उभे राहिले व पराभूत झाले. त्यामुळे पक्षाच्या उपनेतेपदाचा त्यांना राजिनामा द्यावा लागला. रॉय यांनीच आपला पराभव केला असा त्यांचा आरोप होता. जुन्या अविभक्त कॉंग्रेसमधील गटबाजी व हेवेदावे इंदिरागटाच्या कॉंग्रेसमध्येही चालूच राहिले असाच याचा अर्थ आहे.

रॉय यांचे दुसरे प्रतिस्पर्धी राम लखन यादव. १९६७ पूर्वीच्या कॉंग्रेस मंत्रिमंडळात ते मंत्री होते. गैरकारभाराचे गंभीर आरोप त्यांच्याविरुद्ध करण्यात आले होते व ते खरे असल्याचा निष्कर्ष चौकशी कमिशनने काढला होता. सेंट्रल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशनच्या अधिकाऱ्यांनी अनेक तास त्यांच्या घराची झडती घेतली होती. रॉय यांच्या संमतीनेच या झडत्या झाल्या असे यादव यांना वाटले. रॉय यांना नेतेपदावरून दूर करावे अशी मागणी करणाऱ्या गटाचे पडद्यामागचे सूत्रधार यादवच होते. केंद्रीयमंत्री जगजीवनराम, बळीराम भगत व एल. एन. मिश्रा बिहारचेच आहेत पण त्यांच्यापैकी कोणीही पक्षातील ही गटबाजी व भांडणे नष्ट करू शकले नाही कारण हे नेते स्वत: गटबाजीपासून अलिप्त नसून यापैकी कोणत्या तरी एका गटाचे आहेत.

पुढील निवडणुकात आपणास सत्ता मिळवायची असेल तर छोट्या पक्षांच्या पाठिंब्यावर विसंबून चालणार नाही. केरळमध्ये जशी उजव्या कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालील आघाडीशी युती केली तशी बिहारमध्ये उजवे कम्युनिस्ट व प्रजासमाजवादी पक्ष यांच्याशी करावी लागेल. याची इंदिरा गांधींना कल्पना आहे. पण हे धोरण स्थानिक कार्यकर्त्यांच्या गळी उतरविणे सोपे नाही कारण प्रदेश कॉंग्रेसमधील एका गटाने कम्युनिस्ट विरोधाची भूमिका घेतलेली आहे. दरोगा रॉय मंत्रिमंडळावर कम्युनिस्टांचे वर्चस्व आहे. अशी टीका प्रदेश कॉंग्रेस कार्यकारिणीच्या ऑक्टोबरमध्ये झालेल्या बैठकीत करण्यात आली. कम्युनिस्टांच्या एका जमीन बळकावा चळवळीच्या मेळाव्यात मुख्यमंत्र्यांनी भाषण का केले असेही प्रश्न विचारण्यात आले. अविश्वास ठरावावरील मतदानाच्या वेळी चार सभासद फुटले तेव्हा रॉय यांच्या कम्युनिस्टांशी मिळते घेण्याच्या धोरणाला आपला विरोध आहे

**पृष्ठ ५३ वर**

# बालवीर चळवळीचा पुनर्विचार व्हायला हवा

**वरुण भिडे**

काही दिवसांपूर्वी गळ्याला रुमाला बांधलेली मुलेमुली घरोघरी फिरून कामे करीत होती. प्रत्येक ठिकाणी ठरलेली प्रश्नोत्तरे...

'आपल्या घरी काही कामे आहेत का ?'...

'स्काऊट का ?'...

'हो '...

'काम नाही बुवा काहीच '...

सर्वसाधारण कोणत्याही माणसाला स्काऊट म्हणजे काय विचारले तर त्याला फक्त मुले काम करतात हीच गोष्ट माहीत असते. कोणी त्याच्याविषयी कुतूहल दाखवीत नाही. कोणाला त्याचा रागही येत नाही. ज्या योजनेचे अस्तित्व केवळ नावापुरतेच असते आणि ज्याचे स्वरूप अत्यंत निर्गुण, निराकार, निरुपद्रवी असते त्याच्याविषयी कोणी कुतूहल दाखवले नाही तर त्याबद्दल त्याला फारसा दोष देण्यातही अर्थ नाही.

श्रीमंत लोकांची मुले कुठेतरी रोझरी विशप अशा शाळात जातात. तिथे त्यांना ठोकून ठाकून रुबाबदार, ॲक्टिव निर्भय बनवतात. ही मुले समाजात महत्त्वाचे नागरीक बनतात. कलेक्टर, सैन्यात अधिकारी, कंपन्यात अधिकारी बनतात. गरिबांची मुले मुनशीपाल्टीत जातात. तिथे त्यांना त्यांच्या अस्तित्वासाठी झगडावे लागते. त्यांना मारामाऱ्या करता येतात. चांगल्याचांगल्या शिव्या देता येतात. त्यामुळे मोठे झाल्यावर समाजात वावरताना ते निर्भयपणे वावरतात. राहता राहीले मध्यमवर्गीय. सर्व समाज सुधारण्याची जबाबदारी आपल्या शिरावर आहे आणि त्यासाठी उत्तम नागरिक बनवणे आपले कर्तव्य आहे, अशा अभिनिवेशात आपल्या मुलांना, स्काऊटमध्ये घालतात. त्यात दुसरा उद्देशही असतो तो म्हणजे 'संध्याकाळी बाहेर असले म्हणजे कटकट कमी '...लहान मुलांना काय आई-वडील पाठवतात म्हणून बिचारी

जातात, त्या चाकोरीत फिरायला लागतात आणि मॅट्रीक नंतर स्काऊट सोडतात ते पुन्हा कधीही तोंड न पाहण्यासाठी. त्या मुलांना दोष देण्यात काहीही अर्थ नाही. स्काऊटिंगचा कार्यक्रमच इतका कंटाळवाणा असतो की कोणीही सूज्ञ मनुष्य तिथे राहणार नाही.

स्काऊटमध्ये काही वर्षे जाणारा विद्यार्थी पुन्हा कधीही का जात नाही याविषयी मला फार कुतूहल होते. परंतु जसजशी मी या संघटनेविषयी माहिती मिळवत गेलो तसे माझे कुतूहल नष्ट झाले. जी योजना आपल्याला काहीही देत नाही किंवा आपला काहीही फायदा होत नाही तिथे जाण्यात अर्थ नाही. अशाच विचाराने अनेक माजी स्काऊटस्नी स्काऊटिंगचा नाद सोडला आहे...

बेडेन पॉवेल या इंग्रज गृहस्थांनी प्रथम स्काऊट ही चळवळ सुरू केली. या चळवळीचा उगम दक्षिण आफ्रिकेतील युद्धात झाला. अल्पवयी मुलांकडून युद्धात मदतीची कामे करवून घेणे असा उद्देश असणारी योजना पुढे शांतता काळातही चालू ठेवली गेली. या संस्थेच्या सभासदांपुढे आदर्श होता ऑर्थरच्या शिलेदारांचा. या चळवळीचा कार्यक्रम व स्वरूप पाहता इंग्लंडसारख्या वातावरणाला तो योग्य आहे. परंतु भारतासारख्या सर्व परिस्थिती भिन्न असणाऱ्या देशात गेली कित्येक वर्षे तोच कार्यक्रम राबवला जातो आहे. हा सर्व जुना, आपल्या परिस्थितीला मळीच अनुकूल नसणारा कार्यक्रम अमलात आणल्याने केवळ बावळटांची फौज तयार करण्यापलीकडे काहीही साध्य होत नाही.

स्काऊट चळवळ ज्यावेळी भारतात आणली गेली तो काळ पारतंत्र्याचा होता. त्या काळातील भारतीय लोकांची एक दृढमूल भावना होती की...'साहेब करेल ती प्रत्येक गोष्ट श्रेष्ठ असली पाहिजे'...या भावनेतूनच अनेक गोष्टी आयात केल्या गेल्या. त्यापैकीच स्काऊट ही एक निरर्थक गोष्ट आहे. त्या काळात जरी ही गोष्ट स्वीकारली गेली असली तरी आता त्याच्या सर्व कार्यक्रमाचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे. आज या परिस्थितीत जरी स्काऊट निरर्थक असले तरी योजना चांगल्या आखल्या गेल्या तर पाच लाख विद्यार्थ्यांना चांगली दिशा दाखवली जाईल आणि चांगले नागरिक बनविण्याचे स्काऊटिंगचे उद्दिष्ट काही अंशी तरी पार पडेल.

आज स्काऊटिंगचे स्वरूप इतके चौकटीत अडकून बसले आहे आणि नियमांच्या गुंताड्यात सापडले आहे की चळवळीसाठी नियम अशी परिस्थिती असण्याऐवजी नियमांसाठी चळवळ असे घाणेरडे स्वरूप आले आहे. स्काऊटविषयी माहिती पाहिजे होती म्हणून मी स्काऊटच्या कचेरीत गेलो. त्या ठिकाणी बसलेल्या व्यक्तीला भेटून सांगितले,

'मला स्काऊटची माहिती हवी आहे'

'हूं'

'त्यासाठी काही पत्रक, पुस्तक असं मिळालं तर...'

'...'...हा लेकाचा मख्खच.

'मिळेल का ?'
'नाही'
'मला इथेच वाचायला दिल तरी चालेल'
'नाही'
'कोणाला भेटलं तर...'
'नाही'

ही यांची परिस्थिती. एखादा कुतूहलाने माहिती विचारायला गेला आणि त्याला तसेच परत पाठवले तर चळवळ वाढणार कशी आणि प्रगती तरी होणार कशी ? एखादा नवीन विद्यार्थी स्काऊटमध्ये गेला तर त्याला काहीही फायदा मिळत नाही. त्याची कोणचीही प्रगती होत नाही.

स्काऊटमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांची परिस्थिती पुढील प्रमाणे असते. आई-वडील पाठवतात म्हणून तो जातो. गेल्यावर एखाद्या पथकात त्याचे नाव दाखल केले जाते. रोज संध्याकाळी तो लगोरी अथवा चकारी असले बालीश खेळ खेळतो. काही दिवसानंतर त्याच्याकडून बालवीराचे दहा नियम पाठ करून घेतले जातात. प्रतिज्ञा पाठ करून घेतली जाते आणि एके दिवशी त्याला अधिकृतपणे स्काऊट करून घेतले जाते–आणि मग त्याला अनेक निरर्थक गोष्टी शिकवण्यात येतात.

**स्काऊटच्या आरोळ्या**...या आरोळ्यांपासून उत्साह स्फूर्ती मिळते म्हणतात–
'एन गॉनयामा गॉनयामा...'
'इन व्हू बू याबो याबो...'

या आरोळीपासून किंवा 'झिग ए बॉम झिग ए बॉम' असल्या आरोळ्यांपासून काय स्फूर्ती मिळणार ? जर स्फूर्ती यायला हवी असेल तर भावना चेतवणाऱ्या आरोळ्या नकोत का ? जय बजरंग, हर हर महादेव, शिवाजी महाराज की जय अशा आरोळ्यांपासून आम्ही लहानपणी उत्तेजित होत असू. स्काऊटच्या आरोळ्यांमुळे मला कधीही स्फूर्ती आलेली नाही पण आमचे स्काऊट शिक्षक मात्र त्याच आरोळ्या शिकवीत होते. जर कोणी तसे सुचवण्याचे धाडस केले तरीही उपयोग नसे. कारण ते बेडेन पॉवेलनी दिलेल्या आराखड्याबाहेर कधीच जात नसत.

**दोराच्या गाठी** : हा एक अत्यंत बोअर प्रकार. सुकर गाठ, शीड गाठ, चौर आढी नावाच्या अनेक तऱ्हांच्या गाठी शिकवल्या जातात. त्याचे प्रकार घटवून घेतले जातात. स्काऊटच्या निरनिराळ्या परीक्षांना या गाठी सक्तीच्या असतात. त्यांचा पुढे आयुष्यात कधीच उपयोग होत नाही. फक्त एकच गाठ उपयोगी पडते ती म्हणजे !

**शेकोटी** : इंग्लंडमध्ये थंडी असल्यामुळे शेकोटी हा प्रकार तिथे नेहेमीचा आहे. इंग्लिश स्काऊट शेकोटी करतात म्हणून आपल्याकडे उष्ण प्रदेशातही शेकोटी केली जाते. आणि तो एक करमणुकीचा प्रकार मानला जातो. शेकोटीभोवती जमलेली मुले काहीतरी विविध गुणदर्शनाचे प्रकार करतात. त्या वेळी नेहेमीचेच

अस्वलाची शिकार वगैरे सारखे चोथट खेळ केले जातात आणि या बोअत प्रकाराने करमणूक झाली असे मानण्यात येते. शेकोटीच्या भोवती म्हणण्यार येणारी गाणी बहुधा निरर्थकच असतात. या गाण्यांपासून करमणूक झाली असे मला माझ्या स्काऊट जीवनात वाटले नाही.

हिरवेपिवळे लाल लाल टॉमॅटो
कचेलुचे खातो काय पोटॅटो
होनोलिलु लाल लिलु झोपॅटो

असली गाणी म्हणून शेकोटीचे श्राद्ध उरकले जाते.

**वननिवास :** स्काऊट शिक्षणात अंतर्भाव आहे म्हणून कुठेतरी रहाती सहल काढायची. तिथे स्वत: स्वैपाक करून जेवायचे आणि परत यायचे असा एक कार्यक्रम असतो. लळतलोंबत पथक कुठेतरी जाते काहीतरी करते. त्यात 'थ्रील' आहे असे त्यांना वाटायला लावले जाते. यातही काहीही शिक्षण मिळत नाही.

**खरी कमाई :** या निरूपद्रवी चळवळीचा बाह्य जगाशी येणारा इतकाच संबंध. खरी कमाई सप्ताहात मुले-मुली घरोघरी जाऊन काम करून पैसे मिळवतात आणि ते संघटनेला मदत म्हणून देतात. सर्वसाधारणपणे त्यांना तांदूळ निवडा, खोली झाडा अशी कामे सांगितली जातात. मुलांच्या कौतुकाचा भाग असतो त्यात ही गोष्ट सत्य आहेच, पण काही वेळा ज्या प्रकारची कामे सांगितली जातात ती अक्षरश: कल्पनातीत असतात. एका मुलीला एका वस्तीत संडास धुवायला सांगितले होते. त्या बिचाऱ्या मुलीने संडास धुतले. तिला काम करताना पहायला भली मोठी गर्दी झाली होती. हे काम झाल्यानंतर त्या भागातून जाता येता... 'संडासवाली'...म्हणून लहानमोठे हाका मारत. दुर्दैवाने दोनच वर्षात तिला एका दुर्धर रोगाने मृत्यू आला आणि ती या कचाटयातून सुटली. परंतु दोन वर्षे तिचे अक्षरश: हाल झाले. खरी कमाई हा प्रकार थोडासा स्पर्धेचा होत असल्याने मिळेल त्या कामाचे पैसे मिळवण्याचा प्रकार होतो. शिवाय कोणी किती पैसे मिळवले हे जाहीर केले जाते. त्यामुळे इतरांच्या मनात न्यूनगंड निर्माण होतो. एरंडवण्याच्या भागात रहाणाऱ्या स्काऊटरला पंचवीस रुपये मिळवणे सोपे जाते. शनवार पेठेत रहाणाऱ्याला त्याच कामांबद्दल आठ आणे मिळतात. केवळ या प्रकारात मागे पडल्याने अनेकांनी स्काऊटचा धसका घेतला आहे. खरी कमाईत निर्माण झालेला न्यूनगंड अनेक वर्षे माझ्या मनात घर करून होता.

आपल्या देशातून प्रथम हाकलून देण्याच्या गोष्टीत इंग्रजी भाषा, क्रिकेट या बरोबरीने स्काऊटचीही गणना केली पाहिजे. हिप्पी संप्रदाय, बीटल्स्, जाझ हे जसे 'इंपोर्टेट' आहेत तसा हा प्रकार आहे. हे सर्व लिहिण्याचा प्रपंच अशासाठी की स्काऊटची सहावी जांबोरी भरत आहे. या जांबोरीत तरी चळवळीच्या कार्यक्रमाचा पुनर्विचार व्हायला हवा. नाहीतर लक्षावधी स्काऊटसना शिक्षण देऊनही फळ शून्य आणि त्यांचीदेखील सहानुभूती नाही अशीच परिस्थिती कायम रहावयाची. ◻ ◻ ◻

# एका नक्षलवाद्याचा जन्म

रमेश गाडे

कापसासारखा उडून जाणारा उत्साह सांभाळून ठेवण्याचा निकराचा प्रयत्न करीत आशुतोष एस्प्लनेडवर आला. ऑक्टरलानी मॉन्युमेंटच्या सावलीत काही बेकार, काही बूट-पॉलीशवाले अन् दोन-चार भेळवाले विसावले होते. कलकत्त्याला सारंच मोठ्या प्रमाणावर असतं. शहर मोठं, लोक जास्त. मॉन्युमेंटच्या तोटक्या छायेत आडोसा धरून लोक दाटीवाटीनं बसले होते. कुणी उशाला हात घेऊन बसला होता, तर कुणी 'जासूसी पंजा' वाचत बसला होता. शहरातल्या साऱ्या भकास चेहऱ्यांचं तिथं प्रदर्शन मांडलं होतं अन् उन्हाच्या पार्श्वभूमीवर ते अधिकच उदासवाणं वाटत होतं. फक्त प्रेक्षक तेवढे नव्हते ! वेळ दुपारची होती आणि लंचला बाहेर पडलेले साहेब 'शहाजहान' 'ब्ल्यू फॉक्स' किंवा 'प्रिन्स'मध्ये, कारकून 'कोलिकाता मिष्टान्न' किंवा अशाच कुठल्यातरी हॉटेलात अन् चपराशी फुटपाथवर दुकानं मांडून बसलेल्या चायवाल्यांकडे गेलें होते. ऑफिसं सुनसान होती, हॉटेलं गजबजलेली. अन् ऑक्टरलानी मॉन्यूमेंट मोठ्या आशेनं संध्याकाळी फिरायला येणाऱ्या श्रीमंत लोकांची अन् प्रणयीजनांची वाट पाहत होतं. थंडगार रात्रीत पिलांना कुशीत घेऊन उबदार सूर्याची वाट पाहणाऱ्या कुत्रीसारखं.

आशुतोषनं कसंतरी बुड टेकविण्याइतपत जागा मिळविली. अन् वणवण करून थकलेले पाय जुळवून त्यानं गुडघ्यात डोकं खुपसलं. शरीर अन् मन पार थकून गेलं होतं. कुठंतरी लवंडून दोन तास तरी चांगली झोप काढावी असं वाटत होतं. पण जागाच नव्हती. बागेत

झोपणं मना होतं. अन् फुटपाथवर पोलीस झोपू देत नव्हते. एस्प्लनेडच्या विस्तृत मैदानावर जागा भरपूर होती पण नको असलेलं उन्हाचं छतही होतं. अन् ऑक्टर-लानी मॉन्युमेंटच्या तोटक्या छायेत लोकांनी नुसती गर्दी करून सोडली होती.

कुठुन आले एवढे लोक ? त्याच्या डोळ्यासमोर लोकांचे थवेच्या थवे दिसायला लागले. स्टार्च केलेलं धोतर अन् बंगाली शर्ट घालणारे, पूर्णपणे विलायती पोषाख करणारे बंगाली लोक. गुडघ्यापर्यंत धोतर नेसणारे अन् वर मळकट कुडता घालणारे पुरभय्ये. तंग प्यांटी अन् चित्रविचित्र डिझाईनचे मनिले घालणारे, रात्री देखील गॉगल लाऊन वावरणारे देशी अन् विदेशी तरुण. लाल किनारीच्या सफेत साड्या नेसणाऱ्या, हातापायाचे तळवे रंगविणाऱ्या वंग स्त्रिया अन् तीन-चतुर्थांश शरीर उघडं टाकणाऱ्या गौरांगना. किती लोक, किती तऱ्हेतऱ्हेचे लोक ! कलकत्ता म्हणजे अजायबघर होतं की काय ? या शहराला स्वतःचा रंग नव्हता, रूप नव्हतं की आकार नव्हता ! कलकत्ता हे शहर होतं की मानवी मुंग्यांचं वारूळ होतं ? त्याला काही समजेना.

त्याला आपलं घर आठवलं. दोन खोल्यांचं घर. समोरच्या खोलीत येणारा तुटपुंजा उजेड अन् स्वयंपाकघरात ठाण मांडून बसलेला कायमचा अंधार. आता तर त्याच्या घरासमोर एक मोठी इमारत उभी रहाणार होती. अन् त्या इमारतीत म्हणे सरकणारे जिने असतील. त्यानं सरकणारा जिना फक्त एकदा पाहिला होता, चित्रपटात. त्या इमारतीचं बांधकाम सुरू झालं होतं. तिच्या मागच्या भागाची भिंत दररोज काही फुटांनी वाढत होती. अन् थोड्याच दिवसात त्याच्या बिऱ्हा-डाच्या समोरच्या खोलीत देखील स्वयंपाकघरातल्यासारखा कायमचा अंधार पसरवून देणार होती.

आशुतोषला एकदम घाबरल्यासारखं झालं. यावर काहीच इलाज नाही का ? खरोखरच ती भिंत पूर्णपणे अंधार करेल का समोरच्या खोलीत ? मग तर पूर्ण आपलं घरच काळोखात बुडून जाईल ! नुसता अंधारच राहील तिथे. अन् अंधारात वावरणारे आपण. वडील, आई अन् कुमुद, कुसुम. कुमुद, कुसुमची आठवण झाल्याबरोबर त्याला ' संदेश 'ची आठवण झाली. त्या छोट्या बहिणी सकाळ-पास्नं त्याच्यामागे लागल्या होत्या, खाऊ घेऊन ये म्हणून.

त्याचा हात अभावितपणं खिशाकडे गेला. दोन रुपयांची एक चुरगळलेली नोट अन् काही चिल्लर पैसे. त्याला वाटलं, ठीक आहे. आपण सप्लाय डिपार्टमेंटच्या ऑफीसपर्यंत चालत जाऊ अन् इंटरव्ह्यू आटोपल्यावर चालतच घरी निघून येऊ. वाचतील थोडे पैसे, त्यात कुमुद, कुसुमसाठी मिठाई नेता येईल.

तो स्तब्ध बसला. पण त्याच्या डोक्यात चालणारे विचार स्वस्थ बसले नव्हते. एखाद्या भुंग्यासारखं त्याचं डोकं पोखरून काढीत होते. आपल्या दोन्ही कानशिला-जवळ हळूहळू वेदना सुरू होत असल्याची जाणीव त्याला होत होती. त्यानं दोन्ही

हातानं आपलं डोकं गच्च दाबून धरलं. त्याच्या नजरेसमोरून दिवसाचा चित्रपट सरकू लागला.

आज तो फार खूष होता. त्याला काल दोन इंटरव्ह्यू कॉल्स मिळाले होते. एक 'मॅक्नील पिटर्सन'चा अन् दुसरा सरकारी सप्लाय डिपार्टमेंटचा. त्याच्या वडिलांनाही बरं वाटलं होतं. त्यानं अडगळीत पडलेलं आपलं मॅट्रीकचं सर्टीफिकेट उत्साहानं बाहेर काढलं होतं अन् त्याच्यावरची धूळ झटकून एका छोटेखानी फाईलमध्ये ठेवून दिलं होतं. शाळेत मिळालेली अनेक प्रमाणपत्रंही त्यानं फाईल्स-मध्ये व्यवस्थित लावून ठेवली होती. उद्या दोन इंटरव्ह्यू होते ना! दोन पैकी एकात तरी जमेलच. त्यानं मोठ्या अभिमानानं आपलं फर्स्ट क्लास मॅट्रीकचं सर्टीफिकेट कुरवाळलं होतं.

आज सकाळी उठल्याबरोबर त्यानं स्नान केलं होतं, कालीची पूजा केली होती अन् जनरल नॉलेजचं पुस्तक वाचीत तो बसून राहिला होता.

वडील ऑफिसमध्ये जायच्यावेळी तो त्यांच्या पाया पडला होता. अन् नंतर ठेवणीतले कपडे घालून आईला नमस्कार करून इंटरव्ह्यूसाठी बाहेर पडला होता.

त्याला सकाळच्या इंटरव्ह्यूची आठवण झाली अन् त्यानं दात पिसले. हराम-खोर साले—

'नाव?'

'आशुतोष सान्याल.'

'शिक्षण?'

'मॅट्रीक्युलेट.'

'विषय?'

'कम्पलसरी इंग्रजी, बंगाली...'

ती प्रश्नांची सरबत्ती त्याला आठवली अन् तो शहारून गेला.

अर्धा तास त्या मॅनेजरनं त्याला तंग केलं होतं अन् शेवटी विचारलं होतं.

'प्रिव्हीयस एक्सपिरिअन्स?'

'नो सर. बट् विथ युवर काईंड गायडन्स.'

'सॉरी.'

त्या एकाच शब्दानं तो जे समजायचं ते समजला होता अन् मॅनेजरच्या केबिन-मधून बाहेर पडला होता. मोठ्या हॉलमधून बाहेर पडताना त्याला सारखं वाटत होतं, कोपऱ्यात बसलेली गौरवर्ण टायपिस्ट आपल्याला हसते आहे!

तो पोर्चमध्ये आला होता नि घाम पुसून तिथल्या कठड्यावर बसला होता.

लगेच दरवानानं त्याच्याकडे पाहून भिवई उंचाविली होती.

'कुछ नही, जरा इंटरव्यू के लिए आया था!'

'हो गया?'

'हां.'

'तो जरा बाजूमे बैठो, यह जाने आने की जगह है !'

आशुतोषच्या सर्व लक्षात आलं होतं. तो सिलेक्ट झाला नाही, हे भय्यानं त्याच्या चर्येवरनंच ओळखलं होतं. अन् आता त्याला आशुतोषची अडचण वाटू लागली होती.

आशुतोष मग मनात विस्तव बाळगून बाहेर पडला होता. म्हणे, एक्सपिरिअन्स आहे का ? साला हा साहेब आईच्या पोटातनं कोणता एक्सपिरिअन्स घेऊन बाहेर पडला होता ? आपली हुशारी अन् बुद्धीमत्ता केवळ अनुभव नाही म्हणून नाकारायला कोणतं जस्टिफिकेशन होतं ? तो नुसता उकळून निघाला होता. अन् त्याचभरात एक सिगरेट विकत घेऊन तिचे दमदार झुरके मारीत चालत राहीला होता —ऑक्टरलानी मॉन्युमेंटच्या दिशेनं.

आशुतोषला हे सगळं आठवलं. एका इंटरव्ह्यूच्या आठवणीनं दुसऱ्या इंटरव्ह्यूची आठवण झाली अन् त्यानं घाईघाईनं शेजारच्या माणसाला विचारलं, 'क्या बजा भई ?'

अन् तो विलक्षण ओशाळला. त्याच्या शेजारच्या माणसाजवळ घड्याळ नव्हतं.

मग त्या माणसानं बाजूच्या माणसाला विचारून सांगितलं, 'पौने दो.'

आशुतोष घाईघाईनं उठला. तीन वाजता त्याचा दुसरा इंटरव्ह्यू होता.

सप्लाय डिपार्टमेंटच्या ऑफीसात तो पोचला तेव्हा पावणेतीन वाजले होते. इंटरव्ह्यू कोणत्या ठिकाणी आहे हे विचारण्याची त्याला आवश्यकताच पडली नाही. कारण त्याच्याचसारखे आणखी पन्नास उमेदवार तिथं होते. त्यांनी रांग लावली होती. त्या रांगेत सर्वात शेवटी तो उभा राहिला.

एक एक उमेदवार आत जात होता अन् पडेल चेहऱ्यानं बाहेर येत होता. इतर त्याच्याभोवती कोंडाळं करीत होते अन् त्याला काय विचारण्यात आलं ते माहिती करून घेत होते.

तो मख्खासारखा सर्वात शेवटी उभा होता. त्याच्यासमोर अजून पंधराजण उभे होते. प्रत्येकाला निदान पाच मिनिटं तरी लागत होती. एक—सव्वा तास होता अजून त्याचा नंबर यायला.

त्यानं दोन्ही हात छातीवर स्वस्तिकाकार जुळविले अन् तो भिंतीवरची चित्रं निरखू लागला. महात्मा गांधी, पंडित नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल यांची. त्याला वाटलं, ह्यांचं एक ठीक आहे. महापुरुषच आहेत हे. पण आपल्यासारखं इंटरव्ह्यूसाठी ताटकळत बसावं लागलं असेल का कधीतरी यांना ? आरामात तसबिरीत बसायचं अन् येणाऱ्या जाणाऱ्याकडे पहात राहायचं ! त्यानं मान झटकली अन् डोक्यातले विचारही झटकून टाकण्याचा प्रयत्न केला.

थोड्या वेळानं त्याचा नंबर आला.

पुन्हा तेच प्रश्न. तीच कंटाळवाणी चौकशी अन् चांभारचौकश्या. पेरूचे पंतप्रधान कोण अन् मलेशियाचे कोण ? व्हॉट इज अवर अॅटॉमिक पॉलिसी ? सप्लाय खात्या-

तील कारकुनाला ह्या गोष्टींची माहिती असणं फार आवश्यक होतं.

त्यानं त्या साऱ्या प्रश्नांची व्यवस्थित उत्तरं दिली. अन् इंटरव्ह्यू घेणाऱ्या लोकांचे खुललेले चेहरे पाहून तो आतल्या आत मोहरून गेला.

'ऑल राईट मि. सान्याल, वुई विल लेट यू नो.'

'थँक यू सर, थँक यू व्हेरी मच.' असं म्हणून नि मोठ्या आदबीनं मान तुकवून तो केबिनच्याबाहेर पडला.

त्याला फार बरं वाटत होतं. सरकार म्हणजे काही मॅक्नील पिटर्सन नव्हतं, आपलेच शिफारशीचे तट्टू लावून घ्यायला. इथं गुणांची परीक्षा होती. मेरिटवर इंटरव्ह्यू अवलंबून होता. इंटरव्ह्यूमध्ये निवड झालेल्यांना वेटींग लिस्टवर घेण्यात येणार होतं अन् मग नेमणुका होणार होत्या. नो ट्रेसपासींग.

ह्या विचारात मग्न असतानाच व्हरांड्यावर चाललेल्या एका हळू आवाजातल्या संभाषणानं तो हादरून गेला.

'तुझ्या कॅंडीडेटची झाली का निवड ?'

'झाली बाबा एकदाची ! साल्या एकूण जागा सहा तर आहेत. साहेबाचेच चार लोक आहेत. साल्यानं प्रत्येकाजवळनं आठ-आठशे उकळले. धनबादला त्याच्या हाताखाली होतो. तेव्हाची आठवण देऊन दोनशे रुपयात काम भागवलं माझ्या मेव्हण्याचं. इंटरव्ह्यू कालच झाला ! आज फक्त एखादा मासा गळाला लावून पाहायचा होता त्याला.'

आशुतोषनं हे सगळं ऐकलं अन् तो सुन्न झाला. क्षणभर त्याला काय करावं हेच सुचेना. मग झपाट्यानं तो त्या बिल्डिंगबाहेर पडला.

रस्त्यात रहदारी सुरू होती. गर्दी, वाहनांची, माणसांची अन् इमारतींची.

आशुतोष आंतर्बाह्य पेटून निघाला होता. साले इंटरव्ह्यूला बोलावतात म्हणे ! त्याच्या तोंडात एक बीभत्स शिवी आली अन् ती त्यानं मोठ्यानं उच्चारून टाकली.

तो तापून गेला होता. त्या संभाषणानं जणू त्याला उभं पेटवून दिलं होतं. निराशेनं अन् वैतागानं तो काऊन गेला होता. सारखा मुठी आवळत होता अन् खालचा ओठ दाताखाली रगडून काढीत होता.

त्याच्या मनात एक विचार विजेसारखा चमकला अन् तो दचकला. त्यानं थोडा वेळ विचार केला अन् तो सप्लाय डिपार्टमेंटच्या ऑफिसकडे परत वळला.

अगदी रुबाबानं त्यानं बिल्डिंगमध्ये प्रवेश केला. तो इंटरव्ह्यूच्या चेंबरकडे जाऊ लागला.

इंटरव्ह्यू आता संपले होते. त्यानं इकडे तिकडे पाहिलं. आसपास कुणीच नव्हतं. व्हरांड्याच्या अगदी टोकाच्या खोलीला चपराशी टाळं ठोकीत होता.

तो झटकन् केबिनमध्ये शिरला. आत कुणीच नव्हतं. त्यानं शांतपणं खिशातली काडेपेटी काढली अन् काडी जाळून शेजारच्या फायलींच्या ढिगाला लावून दिली.

□ □

चित्तरंजन घोटीकर

# फ्लाइंग राणी

“ वकील साऽऽऽऽऽऽऽब...”

तार-षड्जावरील रस्त्यावरून फेकलेली खणखणीत हाळी...पाच वर्षं सतत कानावर पडल्यानं सुपरिचित...

म्हणजे तुकाराम – तुक्या – पुन्हा आलाय तर...

येऊ दे.. वकिलाकडे समाजातील कुठल्या स्तरातील अशिलानं यावं यावर कसलं बंधन ? साऱ्या समाजाकरता तर वकील आहेत.

तुकारामही अशाच एका स्तरातला होता....

माझ्या कपाळावर अनिच्छेची आठी...जिभेवरून ओठापर्यंत घरंगळत शब्द आले, ' तुक्या, चालता हो.. काळं कर तोंड...ऑफिसात पाऊल तर टाक, हातकड्या घालून तुला दोन वर्षं तुरुंगात खडी फोडायला लावण्याचं सामर्थ्य आहे माझ्यात...याद राख, माझ्याशी गाठ आहे....'

पोलिसच्या हातानं रहदारी थबकावी तसे शब्द थबकले.



ऑफीसमध्ये घुसून तुक्या खर्चीवर फतकल मारून ऐसपैस बसला. पायजमा, चटेरीपटेरी बनियन, पिचकारलेले केस, लालभडक डोळे, पोलादी दंड, काळे-ठिक्कर पडलेले ओठ, ओठात चारमिनार...अजस्त्र, राक्षसी व्यक्तिमत्व...

पाचएक वर्षं तुकाराम माझं कायमचं गिऱ्हाइक...वर्षानुवर्षं पाकेटमारीचा रतीब...सराईत पिकपॉकेट...दादा...निष्पाप, निरपराध, सरळमार्गी जीवांना, कारकुनांना लुटतोय...पापभीरू गरीबांचं जीवन उध्वस्त करतोय...मध्यम-वर्गीयांच्या उपासमारीवर, तळतळाटावर, शिव्याशापावर जिवाची मुंबई करतोय बेरड, निर्दय, गेंड्याच्या कातडीचा...पण सहृदयतेचाही बिंदू असलेला...प्रसंगी डोळे पाणावणारा...

मी वकील...माझ्या आर्थिक सुबत्तेत तुक्याच्या आर्थिक संचयाचा एखाद-दुसरा थेंब...श्रमिकांना, जीवनाची भ्रांत पडलेल्यांना धुऊन काढून त्यानं जम-विलेल्या 'माये'चा एक छोटासा, किरकोळ प्रवाह...राहून-राहून खूप वाटायचं,

तुक्याला दम भरावा, 'पिक् पॉकेटिंग सोड, नाहीतर दुसऱ्या वकिलाकडे जा... पायरीही चढू नकोस माझी'...वकील असलो तरी खटकायचं, तुक्यानं दिलेली फी कुणातरी भाबड्या जीवाच्या तोंडातून ओढलेला अन्नाचा एक घासच ना? प्रेताच्या टाळूवरील लोणी खाण्यात कसली नीती? 'पाकेटमाराचं वकिलपत्र घेणारे वकिलही हरामजादेच,' हे शाप, तळतळाटच ना भोगायचे?

चार-पाच वेळा तुकारामला शिक्षेच्या कचाट्यातून मी शिताफीनं सोडविलंच. दोन-तीन वेळा दोन महिन्याची नि दंडाची शिक्षा...पण जळूप्रमाणे पाकेटमारी त्याला चिकटलीच...त्याच्या रक्तात भिनलीच...सुटत नाही...सुटणारही नाही....

चार महिन्यापूर्वी त्याला पिक्पॉकेटिंगच्या केसमधून सोडविलं नि बजावलं, आता बस्...तुझ्या हरामीतली एक दमडीही नकोय...तुझं तूच बघ...बदलायचं नसेल तर दुसरा वकील गाठ...'

हजारो प्रवृत्तींच्या समाजात गुन्हेगारी चालणारच...औषधींबरोबरच जंगलात विषारी वनस्पती असायच्याच...सुष्टांबरोबर दुष्टही...पाच बोटं कुठे सारखी असतात? गुन्हेगारीच्या तव्यावर तर अक्कलहुषारीच्या कणकेत कायदेपांडित्याचं तूप मिसळून वकिलांनी आपली पोळी भाजायची...गुन्हेगारीला प्रवृत्त करू नये, दुष्ट प्रवृत्तींना प्रोत्साहन देऊ नये...पण आरोपीला नीती-अनीतीचे धडे शिकविण्याचा उपद्व्यापही करण्याचं वकिलाचं काम नाही. फी मिळतेय तोपर्यंत निश्चित रहावं...गुन्हेगार आपलं पाहील...केस संपली की दोघांचे मार्ग भिन्न... कोर्ट, कायदे गुन्हेगारांना त्यांचं स्थान दाखवतील.

तरीही वाटलं, तुक्याला धक्की मारून हुसकावून लावावं...वकील म्हणून मी हे करू शकत होतो.

तुकारामनं ठरलेली फी मला दिली होती. दोन तीन वेळा हातोहात बनवलंही होतं. जिभेवर साखर पेरून, डोळ्यात अजीजी आणून म्हणायचा, 'तूर्त एवढेच घ्या...ॲडव्हान्स...केसमधून एकदा सुटू दे, उरलेले दोन तासात हजर करतो...' पण अनुभव यायचा, सहा महिने, वर्ष उलटलं, तरी त्याचे दोन तास संपायचेच नाहीत...'फिर्यादीला आरोप संशयातीतपणे सिद्ध करता आलेला नाही...सबब सबळ पुराव्याच्या अभावी आरोपीला सोडून देण्यात येत आहे...,' मॅजिस्ट्रेटचं वाक्य संपायचीच खोटी, तुकाराम अदृश्य व्हायचा तो सापळ्यात पुन्हा अडकल्यावरच सहा महिन्यानी उगवायचा.

त्याच्याकडून या धंद्यातलं बरंच कळलं होतं. तुकारामच्या 'धंद्याचं' जाळं मोठं...मुंबई ते घाटकोपर...चर्चगेट ते अंधेरी...बेसावध पॅसेंजर्स त्याच्या हातातले... पाच-पंचवीस पोरांचा पोशिंदा...उत्तम शिक्षण दिलेल्या पोरांकरवी अक्कलहुषारीनं, कौशल्यानं, प्रसंगी चाकू दाखवून पिक्पॉकेटिंग करायचा...पोरांवर

सुपरव्हिजन करायचा...बघता बघता पाकिटं उडवायचा...जादुगार...त्याच्या 'अॅकेडेमीत' अनेक कोवळ्या पोरांनी 'पिक्पॉकेट'ची डिग्री मिळविली होती. पोरांना त्यांच्या श्रमाचं, साहसाचं मोल द्यायचा...खुषीनं वर बक्षिसही...पोरांचं कौतुक करायचा...ब्लेड, चलाखी मुख्य आयुधं...

हे विश्वच नमुनेदार, चमत्कारिक, वेगळं...त्यातील माणसं, प्रवृत्ती, त्याचं रंगरूप, रीतीभाती, संकेत, डावपेच, मनोव्यापार, नीती-अनीतीच्या कल्पना, सारंच जगावेगळं...या विश्वातून तुकारामसारख्यांना बाहेर खेचायचा यत्न शहाण्यानं करणंच वेडेपणा...वकिलानं फी खिशात टाकावी नि कुणातरी दीन-दुबळ्याच्या पोटचा घास गडप केल्याच्या भावनेनं हळहळावं...बस्, इतकंच...

पोलिसच्या गोळीनं आयुष्यातून उठल्याशिवाय तुकारामचं जबर व्यसन सुटायचं नाही...जित्याची खोड मेल्याशिवाय...तुकारामच मिस्किलपणे, आत्मप्रौढीनं सांगायचा, 'साहेब, आमच्यासारख्यांना पोलिसांजवळ गोळ्याच नाहीत ... आमच्या हप्त्यांवर तर...अहो, कुंपणच शेत खातंय...वाटमारी सुटण्याकरता जन्माला येत नसते...सारेच कुठे वाल्याकोळ्याचे वाल्मिकी बनतात?'

त्याचा पाढा मला आता धडधडीत पाठ झालाय.

मी मुग्ध...त्याला घालवण्याकरता काय करावं?

"साहेब..." तुकारामची नांदी.

माझा पुस्तक वाचण्याचा बहाणा...

"साहेब, मी तुकाराम–तुक्या–आलोय..."

"तुकाराम, मागेच बजावलं होतं, माझी पायरी चढू नकोस ... काय काम आहे?"

"दुसरं काय असणार? आताच जामिनावर सोडलंय कोर्टानं ... आता केस चालणार ... चार – दोन महिने बघायला नको...केसला भीत नाही...आमच्या वाट्याला अशी वादळं येणारच...पण..."

"पण काय? माझ्याकडे का आलास? दुसऱ्या वकिलाकडे जा..."

"असं कधी झालंय साहेब? तुमच्याशिवाय..."

"माझ्यापेक्षा खूप हुशार वकील पडलेत..."

"पुढे पाहू दुसऱ्या वकिलाचं...या खेपेस..."

तुकाराम गळी पडू पाहात होता. जळूसारखा चिकटू पाहात होता. खुर्चीवरून उठून पायाशी चक्क धरणं धरून बसला होता.

आता मात्र ठरवलं, डाव उलटवायचा...तुकारामला माझीच आवश्यकता आहे ना? भरमसाठ फी आकारायची...आकडा ऐकूनच दुसऱ्या वकिलाकडे जाईल...

"कितीचं पाकीट उडवलंस?"

"हजार, साहेब..."

" सापडलास कसा ?"

" पार्सिदर भलताच सावध निघाला...आरडा-ओरडा केला...डब्यातच पाच पंचवीसजणांनी आडवा पाडून कुदकलं...बेदम मारलं...पोलिसांनी बंदुकीच्या दस्त्यानी टक्कुरच फोडलं...मरायचीच वेळ होती...जामिनावर सुटलोय आताच..."

" हजार रुपये पडतील याखेपेस...जेवढयाचं पाकीट मारलंस तेवढेच ओकावे लागतील...नाहीपेक्षा..."

" साहेब, इतकी अवकृपा यावेळी ?"

" काहीही बोलायला वेळ नाही मला...खूप केसीस पडल्या आहेत...उशीरही झालाय...घरी गेलं पाहिजे..."

" इतका राग माझ्यावर ? पाचशेवर भागवा साहेब..."

" जाऊ शकतोस..."

" कितीदा बजावलं होतं हरामच्या पैशावर जगू नकोस म्हणून ?"

" साहेब, समजत का नाही मला ? पण आता कुठली नोकरी ? कोण देणार ? आता माघार घेतली तर संसार उजाड होईल...बायको-पोरं उघड्यावर पडतील आणि साहेब, हरामाच्या पैशाशिवाय कुणाचं चाललंय आजकाल ? जनतेचे पोशिंदेच खाबू, हरामजादे बनलेत...राजा तशी प्रजा ... गिरणीतल्या पावणेदोनशेत घास मिळेना पोटभर म्हणून तर...देहच सडलाय...सारं अभाळंच फाटलंय. मलमपट्टी, ठिगळ कुठेकुठे, कोण लावणार ? पाचशेत जमवा, साहेब..."

" तुला आच लागायला पाहिजे. गरीबाचा खिसा खाली झाल्यावर हृदय कसं फाटतं, जळतं...गुरूवारी दत्ताला हार घालतोस...शनिवारी मारुतीला जातोस, उपास करतोस...सारी नाटकं...दांभिक..."

" नाटक नाही साहेब...या धंद्यात बरकत आहे तीही परमेश्वराच्याच कृपेनं... नाहीतर केसमधून सुटतोय कसा ...आताही सुटणार आहेच...तुमचीही बालिश्टरी आहेच...आठशे साहेब ?"

" निघतो मी...हजाराच्या खाली बोलूसुद्धा नकोस..."

" बघा आठशेवर तोडा एवढा घुस्सा ?"

मी उठलो. तुकाराम पाय सोडायला तयार नव्हता.

" ठरलं साहेब...हजार तर हजार..."

" सारे ॲडव्हान्स..."

" असं नका अडवू साहेब...कधी बुडविलंय ?"

" तीन केसीसची बाकी दिलीस ? दोन तास कधी उगवलेत ? तोंड काळं केल्यावर आज उगवतोयस..."

" त्याची भरपाई करतो साहेब याखेपेस—या धंद्यात पैसा खेळत राहातो... पण धोकंही फार...पोरांना वाटा द्यावा लागतो...वर बक्षिसीही...नाहीतर पोरं

जातात...त्यांच्या जिवावर तर खेळ चालतो...त्यांना खूष ठेवलंच पाहिजे... शिवाय संसार...हप्त्यातही मोप जातं..."

"वकिलाशिवाय सर्वांना खूष ठेवायचं? अडचणी तुझ्याजवळच ठेव...बोल, आहेत हजार?"

"कबूल केलंय हां...शब्दाचं इमान ठेवणारा आहे...धंदा हरामाचा असला तरी तुमच्याशी बेइमानी केली तर सात पिढ्या नरकात जातील....पाचशे घ्या हे आता..."

"परत घे नि निघ..."

"अंहं...सुटणार आहेच...तुम्ही असल्यावर हायकोर्टही सोडील...केस संपू द्या एकदा...मॅजिस्ट्रेटनं म्हणायचाच अवकाश, 'पुराव्याच्या अभावी...,' उरलेले पाचशे उभे करतो दोन तासात बघा...विश्वास बाळगा..."

"उचल नि दुसरा वकील पकड..."

"असं काय करता साहेब? तीन महिने तरी चालेलच केस...मोप वेळ आहे... पैसा खेळ राहातो...सकाळी, दुपारी, सांच्याला, रात्री दोन गाड्या गाठल्या की लक्ष्मी चालत येते बघा..."

"माझी लक्ष्मी आताच हवीय...चलतो मी..."

"परवा देतो साहेब...कस्टडीत गेलो तर साराच खेळ खल्लास होईल...अड-कून चालणार नाही...तुम्ही उभे राहिलात तरच मॅजिस्ट्रेटसाहेब सोडतील... वजन आहे तुमच्या शब्दाला, बघितलंय मी...तुम्ही नाहीत म्हणजे माझा चेहरा बघितल्यावर काडशाच काढतील माझा मॅजिस्ट्रेटसाहेब..."

माझी बेफाम स्तुती...शब्दाशब्दात आर्जवं...वाणीत मार्दव...बेरड गुन्हेगाराचा निर्घृणपणा फेकून देऊन धारण केलेला सोज्वळ मुखवटा...

तरीही हृदयात खोलवर कुठेतरी पश्चात्तापाचा ओलावा...पैशाच्या लालसेच्या शेवाळानं ग्रासलेला...जित्याची खोड...

हा मायेचा, सहृदयपणाचा कणच माझं आशास्थान...

"दोन दिवसात उरलेले पाचशे देशील?"

"नाही दिले तर जबान कापून ठेवीन...सोन्याचं घड्याळ ठेवून घेता?"

तुकाराम गेला. महिन्यात फिरकला नाही...

केस बोर्डावर लागल्यावर आदल्या दिवशी मी त्याला निरोप पाठविला. दुपारीच धावत आला.

"जबान कापून ठेवणार होतास ना? घड्याळ गहाण ठेवायला निघाला होतास? इमानाच्या बाता झोकतोस?"

तुकारामचे डोळे पाणावले. मुग्ध...

मी कठोर...

"उद्या केस लागलीय...रात्री आठपर्यंतच वाट पाहीन...बाकी आणली नाहीस तर वकिलपत्र रद्द झालंय समज. . .पुन्हा पायरी चढलास तर याद राख. . ."

"आठ दिवसात एकही पाकीट भेटलं नाही, साहेब. . .गाड्यांवर हल्ली कडक पहारा असतो. . .पोरंही हात हलवीत परत येतात रात्री. . .उपाशी राहिलीत. . ."

"महिन्यात काय केलंस ? जबान कापून ठेवण्याची भाषा बोलतोस. . .निमक-हराम. . .डाके घालावेत, पैसा गडप करावा. . .कोर्टात सुटावं. . .वकिलाच्या जिवा-वर उड्या. . .बुद्धी–अक्कलहुशारी विकत घ्यायला पैशाचं मोल मोजावं लागतं, समजलास ?. . .आठच्या पुढे माझी पायरी चढण्याची तसदी घेऊ नकोस. . ."

"साहेब, आजचीच माझी पहेचान ? निमकहराम असेल तर जीभ झडेल माझी. . ."

"वेळ नाही. . .आठच्या पुढे दुसरं वकिलपत्र भर. . .जाऊ शकतोस. . .ऊठ. . ."

"आठची मुदत नक्की ?"

"हं. . ."

"साडेनऊपर्यंत ? थांबाच साहेब. . ."

"आठनंतर एक मिनिटही नाही. . .चल निघ. . ."

तुकारामला हुसकावून लावलं.

रात्री साडेनऊला कॉलबेल कर्कशपणे खणखणली.

"वकीलसाऽऽऽब. . .मी तुक्या. . ."

नखशिखांत नटलेला. . .कॉर्ड्यूरॉयची निळी जर्द टाइट पँट. . .भरदार छातीवर नि पिळदार दंडावर गच्च बसलेलं लोकरीचं फुलाफुलांचं बनियन. . .डोळ्यावर गॉगल. . .पानानं रंगलेली जिवणी, ओठ. . .तोंडात फिल्टर्ड विल्स. . .शरीराच्या अणुरेणुतून सेंटचा घमघमाट. . .थोडा तारेत. . .

"किती वाजलेत ?"

"साडेनऊ, साहेब. . ."

"पैसेका क्या सवाल है वकीलसाब ? रंडीबी कमाती है. . .ये लेव. . .लेकीन वकीलसाब, कल छूटनाही है. . ."

तुकारामनं खिशातून मोठ्या दिमाखात कोऱ्या–करकरीत नोटा खसकन काढल्या नि मुठीनं चोळामोळा करून माझ्या हातात कोंबल्या. शंभरच्या पाच. . .

सेंटचा घमघमाट. . .

त्याच्या विलासी, खानदानी, बेछूट आकृतीकडे अवाक् होऊन मी बघतच राहिलो. विस्फारित डोळ्यांनी. . .माझ्या नजरेत चांदण्यात प्रथमच ताजमहाल पाहाणाऱ्याची उत्कंठा. . .

"क्या देखते हो वकीलसाब ? कुत्ताबी नही पूछते पैसेको. . .पैसेकी माँ. . ."

"तुकाराम, कुणाच्या घरात बरळतोयस ?"

" माफ कीजिये, वकीलसाव. . .सकाळीच हय्या दम भरला पोरांना, सातच्या आत नाही हजार आणलेत तर. . ."

" तुकाराम, दुसरा वकील. . .निघ. . ."

" क्या साव बोलते हो ? आपके ऐसा वकील दुनियामे नही. . .करावंच लागतं असं. . .पोट जाळणार कसं त्याशिवाय ? पोरांबरोबरच बायको-मुलांचाही पोशिंदा आहे. . ."

आयुष्यातल्या साऱ्या समस्या, जबाबदाऱ्या जाणीवेनं, बेदरकारपणे, हसतखेळत झेलणाऱ्या या वाटमाऱ्याबद्दलच्या आदरानं क्षणभर माझं मन भरून आलं. पण क्षणभरच. . .

" पाचशे कुठून मिळविलेस ?"

" इसमे क्या है साहेब ? मारुतीला साकडं घातलं, पाचशे देऊ शकलो नाही तर जबान काढून तुमच्या हातात ठेवीन. . .आजचीच का पहेचान ? पेशाब करतो साहेब पैशावर. . .पोरांनी दुपारीच बातमी आणली, फ्लाइंग राणीला मारवाड्याचं लग्नाचं मोठं वऱ्हाड रिज़र् बोगीतून सुरतला जातंय. . .जाम दम मारला पोरांना, अंडी न घालताच फ्लाइंग राणी गेली तर खिमाच करीन एकेकाचा. . .पोरांनी जय्यत तयारीनं डाका घातला राणीवर. . .वॉच ठेवून होतो राणीवर आणि पोलिसांवर. . .राणी धूर सोडीत गेली. . .हजाराचा लग्गा. . .अडीचशे पोरांना वाटले. . .दीडशे बायकोला दिले. . .पाचशे तुमची बाकी. . .लेव. . .पैसा-पैसा क्या करते हो वकीलसाब ? लक्ष्मी चंचल आहे साहेब. . .आज आहे, उद्या नाही. . . परवा आहे, आन्. . .एक खरं, पैशाशिवाय कुत्रासुद्धा विचारीत नाही माणसाला. . ."

" उरलेले शंभर ?"

" वाटली आणि गोलपीठा रातको. . .कल ठीक आठ बजे जरूर आउंगा. . . समालना वकीलसाब. . .छूटनाही है. . .मंगता है तो मॅजिस्ट्रेटसाबकोही. . .लेकीन पहिले बोलना. . ."

दुसऱ्या दिवशी तुकारामदादाला शिक्षा झाली. . .सहा महिने सक्तमजुरी. . . हजार रुपये दंड. . .फिर्यादीनं सज्जड पुरावा सादर केला. . .पाच-पंचवीस साक्षीदारही. . .पूर्वीचे ' दाखले ' त्याच्या चारित्र्यावर खूप प्रकाशझोत टाकून गेले.

" क्या हरामी किया वकीलसाब ? पहेचान रखो. . .छे महिनेके बाद जरूर मिलूंगा. . ." खून चढल्याप्रमाणे भर कोर्टात तुकाराम गरजला.






**लेखांक : सव्वीस**

पेतांसारख्या आत्मभ्रष्ट माणसाच्या राजवटीमध्ये लाव्हलसारख्या कारस्थानी व्यक्तीला मन:पूत वागायला मिळणे अगदी स्वाभाविक होते.

परिस्थितिशरण नेतृत्वाखाली अशांचीच संगत सोयीची वाटू लागते.

लाव्हलने सार्वजनिक जीवनामध्ये प्रवेश केला तेव्हा तो निर्धन होता. राजकारणाचा विंचू डसताच त्याच्या मनामध्ये वैयक्तिक महत्वाकांक्षेचे विष भिनू लागले आणि अल्पावधीतच क्लेमौन्त–फेरान्द या गावात त्याच्या वैभवाच्या पताका फडकू लागल्या प्रथम त्याने स्वतःचे वृत्तपत्र सुरू केले, त्यातून भलेमोठे मुद्रणालय उभे राहिले आणि नंतर त्याच्या स्वतःच्या मालकीचे नभोवाणी-केंद्रही आकाराला आले. तेव्हापासून राजकीय सत्तास्थान हस्तगत करण्यासाठी तो धडपडत होता.

पेताँसारखा शरीराबरोबर मनानेही वृद्ध झालेला सेनानी प्रधानमंत्रीपदावर आरूढ झाल्यानंतर लाव्हल याला हवी होती ती संधी मिळाली. आपल्याला मंत्रिमंडळामध्ये स्थान मिळाले पाहिजे असा त्याचा पेताँकडे तगादा सुरू झाला. कारण एकदा मंत्रिमंडळामध्ये प्रवेश मिळाला की लाव्हल याला आपली कावेबाज पावले उघड टाकता येणार होती. पेताँने त्याला न्यायखाते द्यायची तयारी दर्शविली. परंतु असले निरुपद्रवी खाते स्वीकारणे लाव्हल यास पसंत नव्हते. आपल्या महत्वाकांक्षेला साजेसे खाते त्याला हवे होते. लाव्हलचा डोळा होता परराष्ट्रमंत्रीपदावर पण बोदोंकडून ते खाते काढून घ्यायला पेताँची तयारी नव्हती. शेवटी त्या दोघात तडजोड होऊन लाव्हलने परराष्ट्रखात्यात सहमंत्री म्हणून काम करावे असे ठरले.

पेताँचा हा निर्णय बोदोंला आवडला नाही. तशी त्याने तक्रार करताच पेताँ म्हणाला "लाव्हल बाहेर राहण्यापेक्षा मंत्रीमंडळामध्ये असला म्हणजे त्याच्या कारस्थानांना थोडा तरी आळा बसेल. मात्र त्याला तू परराष्ट्र खात्यामध्ये फारशी ढवळाढवळ करायला वाव देऊ नकोस."

पेताँ किंवा बोदों यांचे आपल्यासंबंधी काय मत आहे हे जाणून घ्यायची लाव्हल याला गरज वाटत नाही. पेताँला मोठेपणा दिला की प्रजासत्ताक उधळून लावायची आपली महत्वाकांक्षा सिद्धीला जाईल हे त्याला पक्के ठाऊक होते. पेताँच्या प्रभावळीतील एकेकाला गाठून तो आपले मत पटवून देण्याचा प्रयत्न करू लागला. एके दिवशी त्याने बोदों आणि बुथिलिए यांना म्हटले, "सध्याची परिस्थिती अशी आहे की मार्शल पेताँ यांना सर्वाधिकार देणं आवश्यक आहे. आणीबाणीच्या परिस्थितीतही प्रधान मंत्र्याला मंजूर संसदेच्या तंत्रानं वागावं लागावं ही गोष्ट मला बिलकूल मंजूर नाही म्हणून सध्याच्या घटनेत बरीच दुरुस्ती केली पाहिजे."

लाव्हलच्या या सूचनेमागचा सूक्ष्म अर्थ ओळखण्याइतके बोदों आणि बुथिलिए चाणाक्ष होते. पेताँच्या हाती सर्वाधिकार सोपविले की प्रत्यक्षात लाव्हलचीच अधिसत्ता सुरू होईल हे त्यांना ठाऊक होते. म्हणून ते म्हणाले, "संसद कायमची विसर्जित करायला लोक संमती देणार नाही. त्याऐवजी सध्याची आणीबाणीची परिस्थिती कायम असेपर्यंत प्रधानमंत्र्याला खास अधिकार असावेत असं संसदे-

कडून मंजूर करून घ्यावं. म्हणजे लोकांचाही रोष होणार नाही आणि आपलंही काम भागेल."

"हे एवढं पुरेसं ठरणार नाही." लाव्हलने आपली नाराजी व्यक्त केली. परंतु त्यावेळी त्याने ताणून धरले नाही. आणखी आठ-दहा दिवसांच्या आतच परिस्थिती आपल्याला पाहिजे तशी वळण घेईल याबद्दल तो निश्चित होता.

एकोणतीस जूनला पेताँ सरकार बोर्दोमधून बाहेर पडल्यानंतर लाव्हलने ते क्लेमोन्त–फेरान्द या गावी आणले. तेथे पेताँच्या कचेरीत बोदों आणि बुथिलिए बसलेले असताना लाव्हलने तो विषय काढला. तो म्हणाला, "मला वाटतं आपण सध्याची राज्यघटना रद्द केल्याशिवाय आपल्याला पाहिजे तसा राज्यकारभार करता येणार नाही. प्रत्येक गोष्टीसाठी संसदेची मंजूरी मिळण्याची वाट पाहत बसलो तर दिवसेंदिवस चिघळणारी परिस्थिती सावरणं आपल्याला कठीण जाईल. प्रधानमंत्री हाच देशाचा सर्वाधिकारी झाला पाहिजे."

या सूचनेने पेताँ सुखावला. त्याने बोदों आणि बुथिलिए यांच्याकडे उत्सुकतेने पाहिले. परंतु त्यांनी लाव्हलची सूचना उचलून धरली नाही हे पाहून पेताँच्या चेहेऱ्यावर नाराजी पसरली. बोदों आणि बुथिलिए म्हणाले. "आपण सहा महिन्यां-पुरती संसद बरखास्त ठेवावी. तोपर्यंत परिस्थिती सहज निवळेल. सहा महिन्यांच्या मुदतीचं आश्वासन दिलं तर संसद–सदस्यांकडून विरोध होणार नाही."

संसद-सदस्यांचा विरोध आपल्याला परवडणार नाही हे ओळखून पेताँ म्हणाला, "सहा महिन्यांपुरती संसद बरखास्त ठेवण्याची सूचना बरी आहे."

लाव्हल फणकारला, "अशा अर्धवट उपाययोजनेनं काय होणार आहे? फ्रान्स-मध्ये प्रजासत्ताक राजवट असावी ही गोष्ट हिटलरला मंजूर नाही हे मला पक्कं माहित आहे. म्हणून जर्मनीशी तह करायचा असेल तर अगोदर फ्रेंच संसदेची बैठक बोलावून, सध्याच्या काळात अनुरूप अशी राज्यघटना तयार करण्याचा पेताँला प्रधानमंत्री या नात्यानं अधिकार मिळाला पाहिजे."

"संसद-सदस्य आपण होऊन या आत्मघाताला तयार होणार नाहीत." बोदों उत्तरला.

पेताँचे मन लंबकाप्रमाणे या टोकाकडून त्या टोकाकडे फिरत होते. आपल्याला सर्वाधिकार मिळावेत असे त्याला वाटत असल्यामुळे लाव्हलचे बोलणे त्याला पसंत असे तर संसद-सदस्यांच्या विरोधाची बोदों व्यक्त करीत असलेली भीतीही त्याला खरी वाटे. त्यामुळे त्याच्या मनाचा निश्चित निर्णय होत नव्हता. त्यामुळे काही तरी सबब सांगायची म्हणून तो म्हणाला, "लेब्रन हा राष्ट्राध्यक्ष आहे. त्यामुळे त्याची मंजूरी घेतल्याशिवाय आपल्याला घटना रद्द करण्याच्या बाबतीत काहीही करता येणार नाही."

गेल्या काही दिवसातील घटनांमुळे आणि विशेषतः फ्रान्सला जर्मनीच्या उद्दाम

अटी बिनतक्रार मान्य करून युद्धविराम करावा लागल्यामुळे लेब्रनच्या अंगातील सारे त्राण नाहीसे झाले आहे हे लाव्हल याला माहीत होते. त्यामुळे पेतॉंने लेब्रनच्या मंजुरीचा प्रश्न काढताच तो बेफिकीरीच्या स्वरात उद्गारला, "लेब्रनची काळजी तुम्ही करू नका. लेब्रन आपण होऊन निवृत्त होईल अशी व्यवस्था करण्याची जिम्मेदारी माझी."

लाव्हल नुसते एवढे बोलूनच थांबला नाही. तो तडक लेब्रनच्या निवासस्थानी गेला. लेब्रन आणि लाव्हल यांच्यात काय बोलणे झाले हे पेतॉं किंवा बोदो यांना कळू शकले नाही, पण तासाभरात परत आलेल्या लाव्हलने त्यांना सांगितले, "सध्याची घटना बदलयला लेब्रनची संमती आहे. मी आताच त्याला विचारून आलेलो आहे"

घटना बदलायला लेब्रनची आडकाठी नाही हे कळल्यावर पेतॉंला हायसे वाटले. तो लाव्हलला म्हणाला, "सध्याची प्रजासत्ताक राज्यघटना कशी रद्द करता येईल यासंबंधीची योजना तू मला एक-दोन दिवसात कळव."

फ्रेंच सरकार पॅरिसमधून बाहेर पडल्यावरही बुलिट हा अमेरिकन राजदूत तेथेच रहात होता. फ्रेंच सरकार बोर्दोहून क्लेमॉन्त-फेरान्द येथे गेल्यानंतर आता आपण पॅरिसमध्ये राहण्यात काही स्वारस्य नाही असे बुलिट याला वाटले आणि म्हणून तो क्लेमॉन्त-फेरान्द येथे येऊन दाखल झाला. त्याने तातडीने तेथे यायला कारणही तसेच घडले होते. पेतॉं वेगान्द, दार्ला आणि लाव्हल यांच्या हातात फ्रान्सची सारी सूत्रे एकवटली असून प्रजासत्ताक रद्द करून, हिटलरला पाहिजे तशी एकाधिकारी राजवट घोषित करायला हे चौघे तयार झाले आहेत याची कुणकुण बुलिट याला पॅरिसमध्ये लागली होती आणि या बातमीची शहानिशा करण्यासाठी तो तातडीने पेतॉं सरकारच्या या हंगामी राजधानीत येऊन पोहोचला होता.

क्लेमॉन्त-फेरान्द येथे आल्यानंतर बुलिटने प्रथम राष्ट्राध्यक्ष लेब्रन याची भेट घेतली. फ्रान्सचा लष्करी पराभव झाला असला तरी त्याने हिटलरच्या तंत्राने वागण्याचे काहीच कारण नाही असे बुलिट म्हणताच लेब्रन चिडला. तो म्हणाला, "आमचा पराभव होत असताना अमेरिकेनं आम्हाला मुळीच मदत केलेली नाही. अशा परिस्थितीत, आम्ही कसं वागावं हे सांगायचा अमेरिकेला काय अधिकार आहे? जी गोष्ट अमेरिकेची तीच ब्रिटनची. ब्रिटननं सुरुवातीला फ्रान्समध्ये दहा डिव्हिजन सैन्य पाठविलं. परंतु सोम नदीच्या तीरावर फ्रेंच लष्कराचा पराभव होताच, ब्रिटननं आपलं सारं सैन्य काढून घेतलं. आम्हाला भ्याड म्हणणाऱ्या ब्रिटनला हे शोभतं का? म्हणून म्हणतो की आज जी आमची अवस्था झालेली आहे तीच उद्या ब्रिटनचीही होणार आहे."

शांत स्वभावाचा माणूस म्हणून लेब्रन बुलिटला परिचित होता. त्याने एवढ्या

वैतागाने बोलावे यावरून फ्रेंच नेतृत्वाला निराशेने किती ग्रासले आहे हे बुलिटला कळले. काहीशा कडवट मन:स्थितीतच तो लेब्रनच्या कचेरीतून बाहेर पडला.

नंतर बुलिट पेताँला भेटायला गेला. त्या दोघांच्या गप्पा तीन तास चालू होत्या. लेब्रनच्या मानाने पेताँ खूपच शांत होता. हिटलरपुढे नमते घेऊन फ्रान्स वाचविण्याची कल्पना अव्यवहार्य आहे हे पेताँला समजावून देण्याचा बुलिट परोपरीने प्रयत्न करीत होता. पेताँ उत्तरला, "फ्रान्सच्या नशिबी काय लिहिलेलं आहे हे आम्हाला माहित का नाही ? जर्मनीचा एक प्रांत म्हणून फ्रान्सनं राहिलं पाहिजे ही हिटलरची मनीषा आहे; तसं झाल्याशिवाय त्याला चैन पडणार नाही हे मी जाणतो."

गप्पांच्या ओघात त्या दोघांमध्ये फ्रान्सच्या संभाव्य घटना-दुरुस्तीसंबंधी चर्चा झाली. फ्रान्सने लोकशाहीला फाटा देऊ नये असे बुलिटने सांगताच पेताँ उद्गारला, "खरं सांगू, संसदीय लोकशाहीसंबंधी मला कधीच जिव्हाळा वाटलेला नाही. माझं मत किती बरोबर आहे हे आता इतरांनाही पटू लागलेलं आहे. फ्रान्सला युद्धात ढकलायला लोकप्रतिनिधीच कारणीभूत झाले. फ्रान्सची पुरेशी लष्करी तयारी होऊ शकली नाही तीही आपल्याला सर्व काही समजतं असं मानणाऱ्या राजकारणी लोकांमुळेच. देश वाचवायचा असेल तर राजकारणात लुडबूड करणाऱ्यांना राज्यकारभारात हस्तक्षेप करायला मज्जाव केला पाहिजे. ते व्हावं यासाठी फ्रान्सची सध्याची राज्यघटना बदलल्याशिवाय गत्यंतर नाही."

बुलिटचा निरोप घेताना पेताँ म्हणाला, "आम्ही शरणागती पत्करली म्हणून ब्रिटन आज आमच्यावर दोषारोप करीत आहे. पण उद्या हिटलर ब्रिटनवर चालून गेला की त्याचीही तीच गत होणार आहे."

नेमके हेच शब्द बुलिटला दार्ला याच्याकडूनही ऐकावे लागले. दार्ला म्हणाला, "येत्या चार-पाच आठवड्यात ब्रिटनचा पराभव होईल याबद्दल मला खात्री आहे. आयर्लंड ब्रिटनविरोधी असल्यामुळे ते जिंकून घेणं हिटलरला सोपं जाईल. त्याप्रमाणे ग्लासगो, लिव्हरपूल, कार्डिफ आणि ब्रिस्टल ही ब्रिटनची चार बंदरं जर्मन नौदलानं आपल्या ताब्यात घेतली की ब्रिटनचा गुदमरून जीव जाईल. त्यातून ब्रिटनवर जर्मन विमानांचे बाँबहल्ले सुरू झाले की ब्रिटिश नागरिक घाबरून जाऊन, शरणागती स्वीकारण्याबाबत आपल्या सरकारवर दडपण आणतील."

"तुम्ही आपल्या नौदलाचं काय करणार आहात," बुलिटने विचारले.

"मी आमचं नौदल ब्रिटनकडे मुळीच धाडणार नाही. कारण नंतर ब्रिटन त्यातलं एकदेखील जहाज आम्हाला परत करणार नाही. बरं समजा, हे महायुद्ध ब्रिटननं जिंकलं तर आज जर्मनी जसा वागत आहेत तसंच ब्रिटनही वागू लागेल."

बुलिटने प्रतिकार केला. "ब्रिटन हे लोकसत्ताक राष्ट्र आहे. ते हुकूमशाही राष्ट्राइतकं क्रूर होणार नाही."

दार्ला उत्तरला, " मला नाही तसं वाटत."

बुलिट म्हणाला, " जोपर्यंत फ्रान्समध्ये लोकशाही जिवंत आहे तोपर्यंत ब्रिटनला फ्रान्ससंबंधी आपुलकीच वाटेल."

त्यावरही दार्लाचे उत्तर तयार होते. त्याने सांगितले, " फ्रान्समधली संसदीय लोकशाही सडलेली आहे. त्यामुळे फ्रान्सला बलिष्ठ व्हायचं असेल तर त्याने सध्याची राज्यघटना फेकून द्यायला हवी."

जनरल वेगान्दच्या भेटीतही बुलिटला हेच ऐकावे लागले. त्यानंतर त्याने वॉशिंग्टनला तार धाडली– " फ्रेंच नेतृत्वाचे धैर्य एवढे हरपले आहे की नाझी जर्मनीचा एक प्रांत म्हणून फ्रान्सने रहावे अशी जर हिटलरने अट घातली तर तीही या नेतृत्वाकडून मान्य केली जाईल. त्यासाठी प्रजासत्ताक राज्यघटना रद्द-बातल ठरवायलाही पेताँ सरकार कमी करणार नाही."

क्लेमॉन्त-फेरान्द हे गाव राजधानीच्या दृष्टीने गैरसोयीचे आहे हे तेथे आल्यापासून सर्वांना जाणवत होते. त्यामुळे आता कोठें जायचे हा प्रश्न पुढे आला आणि त्यासंबंधी विचार होऊन पेताँ याचे सरकार एक जुलै रोजी व्हिशी येथे येऊन दाखल झाले. व्हिशी हे गाव गरम झऱ्यांसाठी प्रसिद्ध असून या झऱ्यांमधील पाणी बाटल्यांमध्ये बंद करून साऱ्या फ्रान्सभर विकले जाते. त्यामुळे हौशी प्रवाशांची तेथे नेहमी जत्रा उसळलेली असते. साहजिकच आलिशान निवासगृहे आणि श्रीमंती उपाहारगृहे यांची संख्या व्हिशी येथे मुबलक आहे. विलासी फ्रेंच नागरिकांचे हे प्रिय ठिकाण, तिसऱ्या प्रजासत्ताकाची दफनभूमी म्हणून निवडण्यात पेताँ सरकारने औचित्य दाखविले असेच म्हटले पाहिजे.

फ्रेंच सरकार बोर्दो येथे होते तेव्हा युद्धविराम करण्यापूर्वी सरकारने उत्तर आफ्रिकेचा आसरा घ्यावा अशी सूचना पुढे आली होती. त्यासाठी बोर्दो बंदरामध्ये ' मासिलिया ' हे जहाज आणून उभे करण्यात आले होते. आयत्यावेळी पेताँ याने राष्ट्राध्यक्ष लेब्रन याला उत्तर आफ्रिकेमध्ये जायची मना केली. परंतु मान्देल, दलादिए, कांपिशी आणि देल्बो या कट्टर प्रजासत्ताकवादी मंत्र्यांना बोर्दोतून बाहेर पडण्याची आणि ' मासिलिया 'तून मोरोशेच्या कासाब्लान्का बंदरापर्यंत जायची दार्ला याने मुभा दिली होती. या मंत्र्यांबरोबर काही संसद-सदस्यही फ्रान्समधून बाहेर पडले होते. या सर्वांना देश सोडून जायला परवानगी देण्यामागे दार्लाचा डाव होता. फ्रान्समधील प्रजासत्ताक राजवट कायम राहिली पाहिजे असा आवाज उठविणाऱ्या प्रतिनिधींना एकदा देशाबाहेर घालविले की एकाधिकार राजवटीच्या पुरस्कर्त्यांचा मार्ग मोकळा होणार होता.

दार्ला याने या सर्वांना फ्रान्सबाहेर धाडले हे खरे, पण त्यांनी मोरोशेमध्ये स्वतंत्र फ्रेंच सरकार स्थापन करू नये यासाठी या सर्वांना कासाब्लान्का बंदरात ' मासिलिया' हे जहाज पोचल्यावर शहरात जाऊ देण्यात आले नाही. ' मासिलिया '

वरच त्यांची नजरकैद सुरू झाली. त्यामुळे फ्रान्समधील प्रजासत्ताक राजवट वाचविण्यासाठी व्हिशीला परतण्याचा त्यांचा मार्गच बंद झाला.

कासाब्लान्का येथे पोचलेल्या फ्रेंच मंत्र्यांनी व्हिशी सरकारचे नेतृत्व झुगारून देऊन उत्तर आफ्रिकेमध्ये स्वतंत्र फ्रेंच सरकार स्थापन करावे अशी चर्चिलची इच्छा होती. या नव्या फ्रेंच सरकारला ब्रिटन सर्वतोपरी सहाय्य करील असे अभिवचन देण्यासाठी त्याने लॉर्ड गोर्ट आणि डफ–कूपर या आपल्या दोघा सहकाऱ्यांना मोरोक्कोची राजधानी राबात येथे धाडले. परंतु मोरोक्को अल्जेरिया आणि टयुनिशिया येथील फ्रेंच अधिकारी पेताँ सरकारच्या तंत्रानुसार वागत असल्यामुळे त्यांनी गोर्ट आणि डफ–कूपर यांना मान्देल प्रभृतींची भेट घेऊ दिली नाही. कासाब्लान्काजवळ उभ्या असलेल्या आपल्या जहाजांनी 'मासिलिया' ताब्यात घेऊन मान्देल प्रभृतींची सुटका करावी असाही चर्चिलचा मनसुबा होता. परंतु 'मासिलिया' हे जहाज मोरोक्कोच्या जलकक्षेत असल्यामुळे ब्रिटिश जहाजांना त्याला हात लावणे शक्य झाले नाही.

मान्देल याला कसेही करून बदनाम करायचे असा पेताँ सरकारचा निश्चय झाला होता. त्यामुळे त्याच्यावर ब्रिटिश अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असा आरोप ठेवण्यात आला आणि त्याला अटक केली. मान्देलबरोबर कासाब्लान्का येथे गेलेले मंत्री आणि संसदसदस्य प्रजासत्ताकवादी आहेत हे माहित असल्यामुळे पेताँ सरकारने त्यांना देशद्रोही ठरविले. हा आरोप खोटा आहे हे दाखवून देण्यासाठी या सर्वांनी 'आम्हाला मायदेशी यायचे आहे' असे पेताँला कळविले. त्याप्रमाणे पेताँने त्याला मार्सेय बंदरापर्यंत आणून तेथेच डांबून ठेवले.

या प्रजासत्ताकवादी गटाचा मान्देल हा नेता असल्यामुळे त्याच्यावर लष्करी न्यायालयात खटला भरण्यात आला. परंतु या खटल्यातून तो सुटला तेव्हा जर्मन सरकारला खूष करण्यासाठी पेताँने मान्देल याला जर्मन सेनाधिकाऱ्यांच्या स्वाधीन केले. त्यामुळे त्याला जर्मनीच्या छळ-छावणीत दोन वर्षे खितपत पडावे लागले. तेथून तो सुटल्यावर पेताँच्या हस्तकांनी त्याचा खून केला. मान्देल ज्यू असल्यामुळे हिटलरला खूष करण्यासाठी पेताँने आपल्या या सहकाऱ्याला यमसदनाला पाठविले. पेताँ याने पुढे रेनॉ, दलादिए, ब्लूम आणि जनरल गामेलिन यांनाही अशाच प्रथम कारावासाच्या शिक्षा सुनावल्या आणि नंतर त्यांना जर्मन अधिकाऱ्यांच्या हाती सोपविले.

फ्रेंच सरकार व्हिशी येथे आल्यानंतर सारी सत्ता पेताँ, वेगान्द, दार्ला आणि लाव्हल या चौघांच्या हाती केंद्रित झाली होती. जो जसे मनात येईल तसे वागत होता. हिटलरची मेहेरबानी संपादन करण्यासाठी त्यांच्यात चढाओढच लागली होती. प्रजासत्ताक उलथून पाडण्याच्या आपल्या बेताला जे विरोध करीत आहेत त्यांना नष्ट करण्यासाठी लाव्हलच्या कपट–नीतीला तर यावेळी चांगलाच बहर

आला होता. देशशत्रूपुढे लोटांगण आणि देशबांधवांचा विश्वासघात हाच व्हिशी सरकारचा स्थायीभाव झालेला होता.

पेताँ सरकारने एकदा का जर्मनीशी शांतता–करार केला की अगोदर कोणी कितीही आश्वासने दिलेली असली तरी फ्रेंच नौदल जर्मनीच्या कह्यात जाईल या विचाराने चर्चिलने सत्तावीस जूनला एक योजना पक्की केली. फ्रेंच नौदल आपल्या ताब्यात घेणे आणि तसे करणे जमले नाही तर ते बुडवून टाकणे या उद्देशाने आखलेल्या या योजनेला 'ऑपरेशन कॅरापुल्ट' असे सांकेतिक नाव देण्यात आले होते. तीन जुलैला ही योजना कार्यवाहीत येणार होती.

फ्रेंच नौदल मुख्यत: तीन ठिकाणी विभागलेले होते. काही फ्रेंच जहाजे पोर्टसमथ आणि प्लायमथ या ब्रिटिश बंदरात उभी होती तर काही इजिप्तमधील अॅलेक्झांड्रिया येथील ब्रिटिश तळावर होती. ही जहाजे ताब्यात घेणे सोपे होते. परंतु अल्जेरियाच्या किनाऱ्यावरील मेर्स–एल–केबिर येथे जे फ्रेंच नौदल उभे होते त्यात 'डंकर्क' आणि '–स्टासबर्ग' या अत्याधुनिक नौका होत्या. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत मेर्स-एल- केबिर येथील फ्रेंच नौदल शत्रूच्या हाती पडता कामा नये याविषयी चर्चिल विशेष दक्ष होता. कारण हे नौदल ब्रिटनच्या ताब्यात आले किंवा ते न जमले तर नष्ट करता आले तरच भूमध्य समुद्र आणि अॅटलांटिक महासागर यावरील वाहतुक ब्रिटनला सुरक्षित ठेवता येणार होती. त्याचप्रमाणे जर्मनीच्या ब्रिटनवरील नाविक आक्रमणाला तोंड देता यावे यासाठीही हे नौदल ब्रिटिश आरमाराला महत्त्वाचे वाटत होते. याउलट जर का हे नौदल जर्मनीच्या हाती पडले तर ब्रिटनच्या अस्तित्वाला धोका निर्माण करणे हिटलरला शक्य होणार होते. त्यामुळे फ्रेंच सरकारच्या टीकेची पर्वा न करता एक जुलैला रात्री अडीच वाजता चर्चिलने आपल्या नौदल प्रमुखाला आदेश दिला–" तीन जुलैला 'ऑपरेशन कॅरापुल्ट' साठी सिद्ध रहा.'

ब्रिटिश बंदरात आणि अॅलेक्झांड्रिया येथल्या तळावर उभी असलेली फ्रेंच जहाजे ताब्यात घ्यायला ब्रिटिश अधिकाऱ्यांना फारसा त्रास पडला नाही. परंतु 'ऑपरेशन कॅरापुल्ट' पार पाडण्याची मुख्य जबाबदारी होती. जिब्रॉल्टर येथील ब्रिटिश नौदल–अधिकारी व्हाईस–अॅडमिरल सोमेरव्हिल याची. कारण त्यालाच मेर्स-एल–केबिर येथल्या फ्रेंच जहाजांचा ताबा घ्यायचा होता.

मेर्स-एल-केबिर येथे उभ्या असलेल्या या फ्रेंच नौदलाचा प्रमुख अॅडमिरल गेन्सोल हाही दार्लाप्रमाणेच कट्टर ब्रिटन-विरोधी होता. त्यामुळे तीन जुलैला सकाळी व्हाईस अॅडमिरल सोमेरव्हिल याचा मदतनीस कॅप्टन हॉलंड गेन्सोलला भेटायला गेला तेव्हा त्याने आपला प्रतिनिधी म्हणून एका कनिष्ठ अधिकाऱ्याला कॅप्टन हॉलंड याच्याशी बोलणी करण्यासाठी धाडले. कॅप्टन हॉलंडने सोमेरव्हिलच्या सहीचा खलिता त्या अधिकाऱ्याच्या स्वाधीन केला. त्या खलित्यात म्हटले होते–' मेर्स-एल–

केबिर येथे उभ्या असलेल्या फ्रेंच नौकांनी ताबडतोब ब्रिटिश किंवा अमेरिकन बंदरांच्या रोखाने वाटचाल सुरू करावी. तसे करायला आतापासून सहा तासांचा अवधी देण्यात येत आहे. तेवढ्या कालावधीत आमची मागणी मान्य झाली नाही तर तळावरच्या साऱ्या फ्रेंच नौका आम्ही बुडवून टाकू.'

या निर्वाणीच्या खलित्याची मुदत दुपारी चार वाजता संपत होती. म्हणून गेन्सोलने कॅप्टन हॉलंड याला बोलावून घेतले आणि वेळ काढण्यासाठी त्याच्याशी वाटाघाटी सुरू केल्या. पाच वाजायला आले तरी हॉलंड परत आलेला नाही हे पाहून सोमेरव्हिल याने गेन्सोलकडे आणखी एक पत्र पाठविले—"साडेपाच वाजेपर्यंत आमची मागणी मान्य झाली नाही तर आम्हाला योग्य ती कारवाई करावी लागेल."

गेन्सोलने हे पत्र कॅप्टन हॉलंड याला दाखवताच तो काहीही न बोलता तेथून बाहेर पडला. कॅप्टन हॉलंडबरोबर गेन्सोल याच्याकडून काहीही निरोप न आल्यामुळे पावणेसहा वाजता ब्रिटिश जहाजांवरून मेर्स-एल-केबिरच्या तळावर जोरदार हल्ला सुरू झाला आणि अल्पावधीतच फ्रान्सची तीन मोठी जहाजे बुडाली आणि जवळजवळ तेराशे नाविक ठार झाले. याशिवाय उरलेली लहान जहाजेही निकामी झाली.

मेर्स-एल-केबिर येथील आपले नौदल ब्रिटनने नष्ट करून टाकले आहे हे कळताच फ्रान्समधील जनमत खवळले. पेताँ आणि दार्लां यांना हेच हवे होते. लोकांना खूष करण्यासाठी ते दोघे ब्रिटनविरुद्ध युद्ध पुकारण्याची भाषा बोलू लागले.


# शिलंगणाचं सोनं

## आवृत्ती : तिसरी

**ब. मो. पुरंदरे**

**किंमत : तीन रुपये**

**राजहंस प्रकाशन**

लोकमत पेताँ सरकारच्या बाजूचे झालेले आहे ही संधी साधून लाव्हलने प्रजासत्ताकाची घटना रद्द करून, पेताँची सर्वाधिकारी म्हणून नेमणूक करण्यासंबंधीचा आपला प्रस्ताव संसदेपुढे मांडण्याचे ठरविले. 'मासिलिया 'वर स्थानबद्ध करून ठेवलेल्या संसद-सदस्यांशिवाय इतर संसद-सदस्यांना त्याने व्हिशीला बोलावून घेतले आणि 'संसदीय लोकशाहीमुळे आपण युद्ध हरलो' हा आपला सिद्धांत त्यांना पटवून द्यायचा प्रयत्न आरंभिला.

नऊ जुलैला व्हिशी येथे प्रतिनिधिसभा आणि सिनेट यांच्या वेगवेगळ्या बैठकी घेऊन त्यात लाव्हलने पेताँच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करणारा ठराव मंजूर करून घेतला. सान्या देशाचा पेताँवर विश्वास आहे हे त्याला यामुळे दाखविता आले.

दुसऱ्या दिवशी म्हणजे दहा जुलैला प्रतिनिधीसभा आणि सिनेट यांची संयुक्त बैठक भरली. लाव्हल बोलायला उभा राहिला. तो म्हणाला, "युद्धाची कोणतीही तयारी न करता युद्ध पुकारणे हा आपल्या प्रजासत्ताक सरकारच्या हातून फार मोठा गुन्हा घडलेला आहे. (टाळ्यांचा कडकडाट) आपण कशासाठी लढत आहोत, कोणासाठी लढत आहोत हेच आपल्या सरकारला माहीत नव्हते (सभासदांचे आवाज—आपण इंग्लंडसाठी लढत होतो.) फ्रान्सच्या आतापर्यंतच्या इतिहासात आपला एवढा दारुण पराभव कधीही झालेला नव्हता. लोकशाहीविरुद्ध हुकमशाही असा हा लढा आहे असं आपलं सरकार सांगत होतं. आपल्याला नाझीवादाचा पराभव करायचा आहे. फॅसिझम गाडून टाकायचा आहे असे आपले नेते ओरडून सांगत होते. पण प्रत्यक्षात काय झालं? लोकशाही काहीही करू शकत नाही हे आता आपल्याला अनुभवानं कळून चुकलं आहे. मी इथं सांगू इच्छितो की आमच्या सरकारचा इंग्लंडवर कितीही राग असला तरी आम्हाला इंग्लंडविरुद्ध युद्ध पुकारायचं नाही. परंतु त्याचबरोबर आम्ही इंग्लंडशी नमतं घेणार नाही. जशास तसं या न्यायानं आम्ही वागणार आहोत. (टाळ्यांचा प्रचंड कडकडाट). इंग्लंडनंच आपल्याला युद्धात खेचलं; परंतु त्यानंतर आपल्याला इंग्लंडकडून काहीही मदत मिळालेली नाही. उलट नुकतंच मेर्स-एल-केबिर इथं काय घडलं ते ध्यानात घ्या मेर्स-एल-केबिर इथं जे घडलं ते युद्ध नव्हतं तर मित्रानं पाठीमागून वार करून खून करावा असा तो प्रकार होता. हे सारं लक्षात घेऊन ज्या लोकशाहीमुळे आपली एवढी अप्रतिष्ठा झाली ती नष्ट करून परिस्थितीला अनुरूप अशी नवी राज्यघटना तयार करण्याचा अधिकार प्रधानमंत्री पेताँ यांना देण्यात यावा अशी माझी या सभागृहाला विनंती आहे."

लोकप्रतिनिधी आपल्या हातांनी प्रजासत्ताक राजवटीवर वार करतील अशी कोणालाही कल्पना नव्हती. पण तसे घडले. ५६९ विरुद्ध ८० मतांनी लाव्हलचा प्रस्ताव फ्रेंच संसदेने संमत केला.

लाव्हलला कृतकृत्य झाल्यासारखे वाटत होते. लोकप्रतिनिधींचा निरोप घेताना तो म्हणाला, " फ्रान्सच्यावतीनं मी तुमचे आभार मानतो."

४ सप्टेंबर १८७० रोजी घोषित करण्यात आलेले तिसरे फ्रेंच प्रजासत्ताक १० जुलै १९४० रोजी मरण पावले–नव्हे त्याने आत्महत्त्या केली.

आता फक्त त्याचा दफनविधी व्हायचा होता. ते कार्य पेताँने पार पाडले.

११ जुलैला त्याने जाहीर केले– ' मी, फिलिप पेताँ, फ्रान्सचा सर्वाधिकारी झालेलो असून प्रजासत्ताक घटना रद्द ठरविली आहे. कायदे करण्याचे आणि त्यांची, कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार मी माझ्याकडे घेतले आहेत.'

१२ जुलैला त्याने आणखी एक घोषणा केली– ' माझा वारस म्हणून मी लाव्हल याची नेमणूक करीत आहे.'

१३ जुलैला पेताँने लेब्रनची भेट घेतली. पेताँ त्याला म्हणाला, "संसदेचा निर्णय आपल्याला कळला असेलच. फ्रान्समध्ये नवी राजवट सुरू झालेली आहे आणि मी तिचा प्रमुख आहे."

लेब्रन उत्तरला, "ठीक आहे. आतापर्यंत संसदेचे सर्व निर्णय मी मानले. हा निर्णयही मला मान्य आहे."

लेब्रनने आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा पेताँच्या हाती सुपूर्त केला. तिसऱ्या प्रजासत्ताकाचा हा शेवटचा अध्यक्ष तिसऱ्या प्रजासत्ताकाबरोबरच इतिहासात विरून गेला.

१८९० मधील फ्रान्सचा प्रधानमंत्री फ्रेसिने म्हणाला होता, ' आपण हे लक्षात ठेवलं पाहिजे की इतरांच्या मेहेरबानीवर आपण आपलं स्वातंत्र्य जपू शकत नाही. प्रत्येक राष्ट्राला स्वतःच्या हिमतीवरच अवलंबून रहावं लागतं."

१९४० सालचा फ्रान्स पन्नास वर्षांपूर्वीच्या आपल्या प्रधानमंत्र्याचे हे बोल विसरला होता आणि त्यामुळेच दुर्दैवाचे दशावतार पाहण्याचे त्याच्या नशिबी आले होते.

पराजित मनोवृत्तीचे नेतृत्व देशाला कोणत्या अवस्थेप्रत नेते याचा वस्तुपाठच होता.

## पूर्वार्ध समाप्त

श्रीकांत आंबेकर

दूरचे तारे । लेखांक सहा

# लुकलुकणाऱ्या ताऱ्याकडे

अंतरिक्षात जाऊ इच्छिणाऱ्या मानवाच्या मार्गात एक का दोन–अनेक अडचणी ठाण मांडून बसल्या आहेत. पृथ्वीचे गुरुत्वाकर्षण आहे. वातावरणाचा अडथळा आहे. वजनविरहित अवस्था आहे. किरणोत्सर्गाची उपस्थिती आहेत. पण या अडचणी तशा काहीच नाहीत. याहूनही अधिक अडचणी दुसऱ्या ताऱ्यांकडे जाताना येणार आहेत. तरीही ताऱ्यांकडे झेपावण्याची स्वप्ने माणसाने अजूनही सोडलेली नाहीत.

ताऱ्यांकडे जाणाऱ्या मार्गात आडव्या येणाऱ्या गोष्टीत प्रमुख गोष्ट म्हणजे त्यांची विलक्षण अतरे ! शास्त्रज्ञमंडळींनी यासंबंधात घोषित केलेले आकडे अक्षरशः छाती दडपून टाकणारेच आहेत. सारेच मुळी अगदी प्रऽऽऽचंड ! अर्थात हा जादा प्रचडपणा आजकालचा आहे. फार पूर्वी म्हणजे पुरातन काळात असे काही नव्हते. तारे लहानच होते. जवळही होते. सूर्यदेखील आताइतका प्रचंड कधीच नव्हता वा कोटी मैलात मोजण्याइतका दूरही नव्हता. त्या काळातच अंतरिक्षमोहीमा निघाल्या असत्या तर किती छान झाले असते ! अडचणी मुळी राहिल्याच नसत्या कसल्या ! ! पण दैवात नव्हते त्याला काय करणार ?

सूर्य भलताच लहान आहे याबाबत ह्या काळात दुमत नव्हते. तज्ज्ञ लोक आणि प्रगाढ पंडित घसा खरडून खरडून वाद घालायचे तो त्याचा आकार जात्याच्या तळीएवढा आहे का रथाच्या चाकाएवढा आहे या मुद्यावरच ! त्यांच्यामध्येही काही पुरोगामी होतेच. त्यांना, सूर्याला एवढे लहान म्हणावे हे पटेना. सूर्य आणखी मोठा असणार–थोडा मोठा तर नक्कीच-असा त्यांचा दावा होता. पण किती मोठा ? तसा फाऽरच ! एवढासा दिसणारा सूर्य प्रत्यक्षात मात्र तब्बल अथेन्स शहराएवढा मोठा आहे असे त्यांचे प्रामाणिक मत आहे. त्यानंतर मात्र एक व्यक्ती अशी निघाली की जिच्या डोक्याचा स्क्रू लहानपणीच खेळताना कुठेतरी पडून गेला होता. तिथे जरा आगाऊ धैर्यानेच ' सूर्य चांगला पेलोपोनेसस द्वीपकल्पाएवढा मोठा



आहे' ही कल्पना प्रसृत केली' अर्थातच त्या काळातील विद्वानांनी त्याची 'खंय् खुळं बोलतंय!' म्हणून चांगलीच फर्ये फर्ये उडवली हे सांगायला नकोच. क्षुद्र ताऱ्यांच्या आकारासंबंधी विचार करण्याचे कारण नव्हते म्हणून ते वाचले!

नेमकी हीच गोष्ट ताऱ्यांच्या अंतराची! हा प्रश्न तसा सोपा होता. कारण एक निश्चितपणे माहीत होते. काय? तर ऑलिंपस पर्वतावर समस्त देवदेवता वास करतात. या ऑलिंपस पर्वताच्या अत्युच्च शिखराची उंची समुद्र-सपाटीपासून केवळ तीन किलो-मीटर्स एवढीच आहे. आता कितीही झालं तरी देवदेवतांच्या निवासावर भिरभिरणे सूर्य, चंद्र आणि तारे यांच्यासारख्या सामान्यांना शक्यच नसल्याने सारी आकाशस्थ मंडळी अडीच–पावणेतीन किलोमीटर उंचीवर लोंबकळत असणार हे स्पष्टच होते. त्यात वाद कसला घालणार डोंबलाचा? तर काळ एकूण असा होता. छान! अवकाशमोहिमांच्या दृष्टीने तर फारच छान!

पण आज? तेही बघू यात. हे चित्र पाहिलतंच. तेही चित्र पाहू या–

...एक वर्ग चालू होता. शिक्षक शिकवित होते भूगोल. मध्येच त्यांनी खडूचा तुकडा मोडून हातात धरला. म्हणाले, 'ही आहे पृथ्वी.' मग एक मीटर लांब असणारा काळा कुळकुळीत फळा न कुरकुरता सूर्य बनला.

'आपल्या मोजपट्टीनुसार एक मीटर म्हणजे १५० दशलक्ष किलोमीटर्स आहेत.' ते म्हणाले, 'आता प्रश्न असा की सगळ्यात जवळचा तारा या मोजपट्टीनुसार कुठे असेल?'

हात्तीच्या! सोप्पा प्रश्न!! पटापट हात वर झाले. उत्तरामागून उत्तरे येऊ लागली. कुणी म्हणालं, 'शेजारच्या वर्गात?'

'चूक! चूक!!' शिक्षकांनी घोषित केलं.

'मग सर, आपल्या शाळेच्या ग्राउंडवर?'

'समोरच्या रस्त्यावर?'

'नाही सर. पुढल्या शिवाजी चौकात!'

'आपल्या अलका टॉकीजजवळ, सर!'

'नाहीच मुळ्ळी ! सर, संगमापाशी असेल नाही का हो ?'

धबधब्यासारखी उत्तरे कोसळत होती. पण एकानेही सरांचे समाधान होत नव्हते. हळूहळू विद्यार्थी दबत चालले. तेवढ्यात,

'अशोकच्या घराजवळ, सर ?'

–विनयने गावाबाहेर, चांगले सात-आठ मैल दूर असलेल्या अशोकच्या घराचा हवाला देऊन पाहिला. पण तेही उत्तर साफ चूक होते. कारण 'सर्वांत जवळचा तारा प्रस्तुत वर्गापासून तीनशे (३००) किलोमीटर्स दूर असेल' हे त्या प्रश्नाचे खरे उत्तर होते.

तर परिस्थिती एकूण अशी आहे. सध्या माणूस फक्त चंद्रापर्यंत जाऊन पोचला आहे. नजीकच्या भविष्यकाळात तो मंगळावरही यशस्वीरीत्या पाऊल रोवील. पण अनुभवाच्या एवढ्याच भांडवलावर ताऱ्यांकडे जाण्याची स्वप्ने पहाणं जरा विचित्रच आहे. हे, हे म्हणजे अगदी, नुकतेच कुठे 'एक पाय नाचीव रे गोविंदाऽएऽऽपलला बग लबाड'च्या तालावर एक पाय नाचवता नाचवता पलनाऱ्या लबाडाने पुण्याहून मुंबईला चालत जाण्याचा हट्ट धरण्याइतकेच हास्यास्पद आहे.

विश्वातला सर्वात वेगवान प्रवासी आहे प्रकाश. पण एका ताऱ्याकडून दुसऱ्या ताऱ्याकडे जाताना त्याच्याही नाकी नऊ येतात तिथे क्षुद्र मानवाची काय कथा ?

मित्र तारा इथून चार प्रकाशवर्षे दूर म्हणजे $३८\times१०^{१२}$ किलोमीटर्स दूर आहे. सर्वात तेजस्वी दिसणारा व्याधाचा तारा नऊ प्रकाशवर्षे अंतरावर आहे. ब्रह्महृदय नावाच्या नक्षत्रमंडळातील कॅपेला तारा सुमारे ४४ प्रकाशवर्षे लांब आहे. अँटारस ताऱ्याचा आज इथे पोचणारा प्रकाश तर 'मुक्काम पोस्टा'पासून फार पूर्वी, गुरू गोविंदसिंगाच्या खुनाच्या काळात निघालेला आहे. तर आज दिसणाऱ्या डेनेब ताऱ्याचा प्रकाश, ज्ञानेश्वरांनी कुठलातरी 'तिमिर जावो' अशी सदिच्छा प्रकट करायच्या शंभर वर्षे आधीपासूनच तिमिर दूर करायला बाहेर पडला होता. आपल्या उपविश्वाचा दीर्घतम व्यास एक लाख प्रकाशवर्षे असून रूंदी तीस हजार प्रकाशवर्षे आहे. आपल्या अगदी जवळचे उपविश्व केवळ सतरा लाख प्रकाशवर्षे दूर आहे.

हे आकडे नुसते घाबरवून टाकायला सोडलेले नाहीत. त्या मागे दूरच्या ताऱ्यांकडे जाणाऱ्या मार्गात येणाऱ्या दोन महत्वाच्या अडचणी लपलेल्या आहेत. या पहा :

१. अग्नियानाचा वेग प्रकाशगतीहून अधिक वाढविता येणे मुळीच शक्य नाही.

२. मानवाचे आयुष्य फारच लहान आहे. इतके लहान की कुणालाही 'याची देही' दूऽऽरच्या ताऱ्यापर्यंत पोहोचता येणे अशक्यच !

अपूर्व बुद्धिमत्तेच्या आइन्स्टाईनने यापैकी दुसऱ्या बंधनातून काही अंशी मुक्त होण्याचा मार्ग दाखवून दिला आहे. त्याच्या सापेक्षतेच्या सिद्धान्तानुसार अग्नि-

यानाची गती जितकी जास्त असेल तितका त्यातील काळ, अर्थात वेळ पृथ्वीवरील काळाहून मंद गतीने चालेल. त्यामुळेच पृथ्वीवरील घड्याळानुसार ज्या प्रवासाला शंभर वर्षं लागणार असतील तो प्रवास, अगदी प्रकाशगतीने जाणाऱ्या अग्नियानाच्या प्रवाशांच्या दृष्टीने केवळ एक तासात संपेल.

म्हणजे, प्रश्न मानवाच्या आयुष्याचा नाही आहे. प्रश्न आहे, सध्याच्या अग्नियानाच्या मंदगतीत कशी काय वाढ करायची हा ! अन् या मंदगतीचा दोष जातो रासायनिक इंधनाच्या अकार्यक्षमतेकडे ! असे शोधून काढण्यात आले आहे की, एक टन वजनाच्या यानाचा वेग प्रकाशगतीइतका वाढविण्यासाठी तब्बल १,०००,०००,००० टन एवढे सर्वोत्कृष्ट रासायनिक इंधन वापरावे लागेल.

साहजिकच भावी काळातल्या अडचणीचे नाव इथे जाहीर होतं. इंधन ! शास्त्रज्ञांनीही आता रासायनिक इंधनातून लक्ष काढून नवे नवे मार्ग चोखाळायचा सपाटा चालविला आहे. त्यांच्याकडे लेसरपासून सौर-बॅटरीपर्यंत आणि आण्विक परिचालकापासून थेट फोटॉन अग्नियानापर्यंत नानाविध योजनाही तयार आहेत. यामध्ये भरीला भर म्हणून गेल्या काही वर्षांपासून 'प्रतिद्रव्य' या नावाचा गजर कानावर पडत आहे. तेव्हा त्याचा अल्पसा विचार करणे अपरिहार्यच आहे.

(क्रमशः)


# अग्निपुत्र

वसन्त पोतदार

प्रसिद्धीकाल : १९७० अखेर

प्रसिद्धीकाल : १९७१ मध्य

रा. म. शास्त्री

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

राजहंस प्रकाशन

## बिहारची शोकान्तिका

पृष्ठ २० वरून

हेच कारण त्यांना दिले. या गटाचा कम्युनिस्टविरोध हा खरा कम्युस्टिविरोध नसून पुरोगामी कार्यक्रमाला असलेला आपला विरोध झाकण्यासाठी कम्युनिस्ट विरोधाचा हा बुरखा त्यांनी घेतला आहे. शेतमजुरांबाबत पक्षाची आश्वासने अंमलात आणण्यास या गटाचा विरोध आहे. दरोगा रॉय सरकारने या दिशेने जी काही थोडी पावले टाकली त्यांना उघड विरोध केल्यास लोकांचा रोष झाला असता म्हणून रॉय सरकार कम्युनिस्टांच्या तंत्राने चालत आहे अशी सोयीस्कर भूमिका घेऊन या गटाने जमीन सुधारणा कार्यक्रमास विरोध केला.

तसे पाहिले तर दरोगा रॉय सरकारने प्रत्यक्षात नवे असे काहीच केले नाही. तीन एकरापर्यंतच्या बागायती व पाच एकरापर्यंतच्या जिरायती जमिनीवरील शेतसारा रद्द करण्यात रॉय सरकारने पहिल्या संयुक्त आघाडीच्या सरकारचे आश्वासनच तेवढे पुरे केले. यामुळे उत्पन्नात येणारी तूट भरून काढण्यासाठी बड्या जमीनदारांच्या जमिनीवर कर बसवावा अशी योजना होती पण ती हाती घेण्याचा प्रयत्न करण्याएवढे विधानसभेत आपले बळ नाही अशी स्वच्छच कबूली दरोगाप्रसाद रॉय यांनी दिली होती.

कमाल जमीनधारणा कायदा आणि कुळांना कायम हक्क देणारा कायदा १९६७ पूर्वीच्या कॉंग्रेस सरकारने पास केले होते पण ते कागदावरच पडून होते. त्यांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न रॉय यांनी केला. किंवा प्रयत्न केला असे म्हणण्यापेक्षा देखावा केला असे म्हणणे अधिक बरोबर होईल. तुमच्याकडे किती जमीन आहे ते कळवा अशा नोटीसेस जमीनदारांना पाठविण्यात आल्या. ही माहिती मिळाल्यानंतर जादा जमीन किती उपलब्ध आहे याची छाननी करून तिचे फेरवाटप करावयाचे हा यामागे उद्देश असल्याचे सांगण्यात आले पण शेतमजुरीसाठी आपण काही तरी करीत असल्याचे दाखविण्याचा हा केवळ देखावा होता. जादा जमीन फारच थोडी उपलब्ध होणार हे उघड होते कारण कायद्यातून पळवाट काढण्यासाठी बड्या जमीनदारांनी आपल्या जमिनीची वाटणी कुटुंबियांमध्ये आधीच करून टाकलेली होती.

कुळांना जमिनीवरून सक्तीने काढून टाकण्यात येऊ नये अशी तरतूद करणारा कायदा १९६७ पूर्वीच्या कॉंग्रेस सरकारने केला होता. या कायद्यानुसार कुळांनी कूळ म्हणून आपली नोंद करून घ्यावयाची होती. त्यानुसार फारच थोड्या कुळांना अशी नोंद करता आली आणि ज्यांची केली त्यांच्याविरुद्ध जमीनदार कोर्टात गेले. जमीनदारांनी असे साठ हजार दावे केले असून आतापर्यंत लागलेल्या निकालात बहुसंख्य दाव्यांचे निकाल त्यांच्या बाजूने लागले आहेत.

दरोगा रॉय सरकारने जमीन सुधारणाच्या बाबतीत विशेष काहीच केले नसले तरी हे एकदा चक्र सुरू झाले की आपले हितसंबंध सुरक्षित राहणार नाहीत म्हणून आतापासूनच त्याला विरोध करावयाचा आणि आपला प्रतिगामीपणा उघडा पडू नये यासाठी दरोगा सरकार कम्युनिस्टांच्या आहारी चालले आहे अशी आवई उठवावयाची असे तंत्र प्रदेश काँग्रेसमधील या विरोधी गटाने अवलंबले होते. कम्युनिस्ट विरोधाच्या त्यांच्या बाह्य आवेशाने न फसता या गटाचे हे ,खरे अंत:स्वरूप ओळखले पाहिजे.

दरोगाप्रसाद रॉय यांचे मंत्रिमंडळ गडगडल्यानंतर इंदिरा गटाच्या काँग्रेसने वास्तविक विरोधी पक्षांना सरळ त्यांचे सरकार स्थापण्याची संधी द्यायला हवी होती. पण भोळा पाशवान शास्त्री यांच्या नेतृत्वाखाली पुन: आपले सरकार स्थापण्याचा अयशस्वी प्रयत्न त्यांनी केला. भोळा पाशवान पूर्वी काँग्रेसमध्येच होते पण मुख्यमंत्री होण्याची संधी मिळत आहे असे दिसताच त्यांचा गट काँग्रेसमधून फुटला. विरोधी पक्षाने त्यांना मुख्यमंत्रिपद दिले. त्यांचे मंत्रिमंडळ थोडे दिवस अधिकारावर होते. दरोगाप्रसाद रॉय यांच्या नेतृत्वाविरुद्ध पक्षात असंतोष आहे असे दिसताच या शास्त्रींना पुन: मुख्यमंत्रिपदाची स्वप्ने दिसू लागली. लोक-तांत्रिक काँग्रेस हा आपला पक्ष त्यांनी इंदिरा गटाच्या काँग्रेसमध्ये विलीन करून टाकला. अशा संधिसाधू नेत्यास इंदिरा गटाच्या काँग्रेसने जवळ करावयास नको होते. आयाराम-गयारामचे राजकाण अजून संपलेले नाही याचेच हे निदर्शक आहे.

बिहारमध्ये आता संयुक्त समाजवादी पक्षाचे नेते कर्पूरी ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त विधायक दलाचे सरकार अधिकारावर येत आहे. दरोगाप्रसाद रॉय यांच्या सरकारला ज्या छोटचा पक्षांनी प्रथम पाठिंबा दिला व नंतर फुटून निघून ते सरकार पाडले त्याच छोटय़ा पक्षांवर कर्पूर ठाकूर यांनाही आपल्या सरकारचे बहुमत टिकविण्यासाठी अवलंबून रहावे लागणार आहे. हे बिनभरवशाचे संधीसाधू पक्ष कधी उलटतील याचा नेम नाही. दुसऱ्या बाजूने अधिक आमिषे दाखविताच ते पुन: तिकडे वळतील अशा परिस्थितीत ठाकूर सरकार कितपत टिकाव धरेल व व टिकाव धरला तरी आपला कार्यक्रम ठामपणे अंमलात आणू शकेल का याची शंका आहे. कारण हे संयुक्त विधायक दल म्हणजे 'आवळचा भोपळयां'ची मोट आहे. सिंडिकेट काँग्रेस, जनसंघ आणि संयुक्त समाजवादी हे या आघाडीचे मुख्य आधार. त्यांच्यात इंदिरा काँग्रेसच्या विरोधाशिवाय समान असे काही नाही. अशा आघाडचा समान कार्यक्रम तयार करतात पण तो कागदावरच राहतो. पूर्वीच्या आघाडचांबाबत आलेला हा अनुभव या आघाडीच्या बाबतीतही येईल. अशाच पद्धतीने राजकारण चालले तर बिहारमधील अस्थिरता कधी दूर होणार नाही.

इंदिरा काँग्रेस, उजवे कम्युनिस्ट, प्रजासमाजवादी आणि संयुक्तसमाजवादी हे पक्ष एकत्र आले तर छोटचा पक्षाच्या पाठिंब्यावर अवलंबून न राहता बिहारला

स्थिर सरकार लाभले असते. इंदिरागटाचे फुटलेले पाच सभासद वगळले तरी इंदिरा कॉंग्रेस ७०, संयुक्त समाजवादी ५३, कम्युनिस्ट २५ व प्रजासमाजवादी १७ असे या चार पक्षांचे मिळून १६५ सभासद होऊन त्यांचे निर्विवाद बहुमत होते. तिन्ही डाव्या गटाचे मिळून ९५ सभासद असून इंदिरा गटाच्या कॉंग्रेसपेक्षा त्यांची संख्या २५ ने जास्त आहे. म्हणजे डाव्या गटांचा प्रभाव असलेले हे सरकार झाले असते. इंदिरा गट अल्पसंख्य असल्याने त्याच्या धोरणावर आपला प्रभाव या गटांना पाडता आला असता. पण इंदिरा गटाच्या कॉंग्रेसशी कोणत्याही परिस्थितीत सहकार्य करावयाचे नाही हे आपले धोरण सोडावयास संयुक्त समाजवादी पक्ष जोपर्यंत तयार नाही तोपर्यंत असे सरकार स्थापन होणे शक्य नाही.

छोटया संधिसाधू पक्षांनी मोठया पक्षांना आपल्या तालाप्रमाणे नाचवावे, मोठया पक्षांच्या नेत्यांनी ते अगतिकपणे मान्य करावे, ही बिहारमधील आजच्या राजकारणाची शोकांतिका आहे. ¤ ¤ ¤

## अव्हरो : राजकीय व तांत्रिक बाजू... पृष्ठ ६ वरून

निशी (४४,५०० पौंड) उड्डाण केले तर ३,००० पौंड वजन कमी करून (४१, ५०० पौंड) उतरण्यासाठी दोन तास उड्डाण होणे आवश्यक असते.

अव्हरो विमानाचे इंजिन उत्तम प्रतीचे आहे. विमानही चांगले आहे. आजपर्यंत या विमानाला अपघात न होण्याचे महत्त्वाचे कारण हे उत्तम प्रतीचे इंजिन हेच होय. पण वेळीप्रसंगी एक इंजिन नादुरुस्त झाले आणि एकाच इंजिनावर अवलंबून रहाणे भाग पडले तर मात्र गंभीर अवस्था निर्माण होण्याची शक्यता आहे व अव्हरोतील या अडचणी दूर होणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

अव्हरो विमानांची चाचणी उड्डाणे झाली त्यावेळचा एक महत्त्वाचा भाग पहाण्यासारखा आहे. एक इंजिन बंद करून विमान चालविले असता विमान वर जाण्याची (Climb) जी प्रक्रिया आहे ती १०० फूट पुढे जाण्यामागे २·२ फूट वर जाणे. (Climb) 'इंटर नॅशनल सिव्हील एव्हिएशन ऑर्गनायझेशन'ने याबाबत जी मर्यादा घातली आहे ती प्रत्येक १०० फूट रन मागे १·६ फूट क्लाइंब. परवाच्या उड्डाणाच्या वेळी विमानांनी ही मर्यादा प्रत्येक १०० फूटामागे १·८ ते २ फूट क्लाइंब एवढी गाठली. म्हणजे आय् सी. ए. ओ. ने ठरविलेल्या मर्यादेपेक्षा अधिक पण प्रत्यक्षात विमानाकडून अपेक्षित असलेल्या प्रत्येक १०० फूट रन मागे २·२ फूट क्लाइंब (अर्थातच एक इंजिन बंद ठेऊन) यापेक्षा कमी त्यामुळे व्यवस्थापकांचे विमाने उड्डाणयोग्य असल्याचे म्हणणे व वैमानिकांचे विमानाच्या असुरक्षिततेसंबंधीचे म्हणणे यात तथ्य दिसून येते. तेव्हा हा प्रश्न असाच टांगळत ठेवण्याऐवजी सरकारने स्क्वाड्रन लीडर पी. अशोक यांनी चाचणी उड्डाणांचा जो अहवाल सादर केला आहे तो प्रकाशित करणे आणि विमानात खरोखरीच काही दोष असल्यास ते काढून टाकणे हाच खरा हा प्रश्न मिटविण्याचा व प्रवाशांचे समाधान करण्याचा मार्ग होय. ¤ ¤ ¤

मुंबईकर

## चित्रपट

समाधानकारक

# घरकुल

'घरकुल' मराठी चित्रपटांच्या चौकटीत बसत नाही. त्यात तमाशा नाही. अरुण सरनाईक आणि जयश्री गडकर आहेत. पण अरुण सरनाईकच्या गळ्यात ढोलकी नाही आणि जयश्री गडकरच्या पायात घुंगरू नाहीत. उलट अरुण सरनाईक हा कोणत्या तरी कार्यालयात बडा अधिकारी आहे. त्याची गाडी आहे, घरी टेलिफोन आहे. जयश्री गडकर ही सुखाची साय चढलेली त्याची बायको आहे. त्यांना दोन छानशा मुली आहेत. त्या मुली त्यांना पप्पा, मम्मी वगैरे म्हणतात. शिवाजी पार्क, हिंदू कॉलनी वगैरे सारख्या ठिकाणी असावा असा त्यांचा ब्लॉक आहे. सारे काही सुखात चालले आहे.

पण एके दिवशी त्या मुलींपैकी नंदाच्या प्रियकराच्या, मंगेशच्या रूपाने त्यांच्या सुखासमाधानाला कीड लागते. म्हणजे तसा त्यात मंगेशचा दोष काहीच नसतो. उलट नंदाप्रमाणेच तिच्या आईलाही हा मंगेश आवडतो. जावयाच्या रूपाने आपल्या घरात मुलगाच येणार आहे असे तिला वाटत असते. पण नेमके हेच नंदाच्या वडिलांना पसंत नसते, नव्हे त्यांचा या विवाहाला कडक विरोध असतो. कारण ?

कारण हा मंगेश त्यांच्याच एका दुसऱ्या बाईपासून झालेला मुलगा असतो. आईचा आग्रह, वडिलांचा विरोध. घरात पेच, तणतणाट निर्माण होतो. शेवटी वडील आईजवळ आपली चूक कबूल करतात, क्षमा मागतात व साऱ्या प्रकरणावर पडदा टाकू बघतात. पण आता आई बिघडते. ती नंदा-मंगेश भेट बंद करतेच; पण त्याचबरोबर मंगेशचे जीवनही बरबाद करू पाहते. तणाव वाढत जातात. वडिलांच्या हृदयात कालवाकालव

होत असते, आईचा जळफळाट होत असतो, नंदाला मंगेशचा विरह सहन होत नाही आणि मंगेशला आपले जन्मरहस्य कळल्यामुळे तो पिसाट बनतो आणि रंजना, तिला घरात हा काय गोंधळ चालला आहे हेच कळत नाही. शेवटी वडिलांना ताण सहन होत नाही. मंगशचे अधिकृत पितृत्व स्वीकारण्याचे ते ठरवतात, आई भडकते, नंदाला प्रियकराच्या जागी भाऊ दिसू लागतो आणि मंगेश, तो घर मिळाल्याने आनंदी होतो.

पण आईच्या रागाचे काय ? मंगेश तेवढा समंजस असतो. उच्च शिक्षणासाठी कॅनडाला जाण्याची आलेली संधी तो उचलतो व निघून जातो. उठलेले वादळ शमते व पप्पा, मम्मी, नंदा, रंजना यांचे घरकुल पुन्हा सुखासमाधानाने नांदू लागते.

पाहिलंत, कथाही वेगळी आहे. सहसा मराठी व हिंदीसुद्धा चित्रपटात आढळणार नाही अशी. कथालेखक आहेत ग. वा. बेहेरे, त्याच्यावरून पटकथा तयार केली व संवाद लिहिले शं. ना. नवरे यांनी. संगीत दिले निर्माते सी. रामचंद्र यांनी. म्हणजे ही सुद्धा सारी मराठीत नवी व वेगळीच माणसे. जयश्री गडकर, अरुण सरनाईक व शरद तळवळकर यांचेखेरीज प्रमुख भूमिकात आहेत श्री. लीलाधर मयेकर, नयनतारा, रंजिता ही माणसेदेखील नवीच.

यामुळे ' घरकुल 'ला ताजेपण, वेगळेपण आले आहे. मराठीतल्या त्याच त्याच कृत्रिम वातावरणापासून हा चित्रपट अलिप्त आहे. आणि तरी त्याला हिंदी चित्रपटाचाही स्पर्श झालेला नाही. स्पर्श झालाच असला तर तो मराठी नाटकाचा आहे. आणि त्याचे मुख्य कारण आहेत शं ना. नवरे. त्यांच्या नाटकातून त्यांचे संवाद असतात, तसेच या चित्रपटात ते आहेत. त्यामुळे मराठी चित्रपटात नेहमी सगळी माणसे जशी वाङ्मयीन भाषा बोलतात, तशी घरकुलमधील माणसे बोलत नाहीत. चित्रपटाच्या पूर्वार्धात तर हे चांगल्या प्रकारे जाणवते व बरे वाटते. अखेरीस साऱ्या गोष्टी आटोपत्या घेऊन गोड शेवट करताना मात्र शं. ना. नवरे घसरतात व त्यांची पात्रे काहीतरी भव्य, दिव्य बोलू लागतात, जसे द्रौपदीने नव्हती का कृष्णाच्या हाताची जखम बांधण्यासाठी आपल्या पातळाची पट्टी फाडली वगैरे वगैरे.

शं. ना. नवरे आणखी एका ठिकाणी फसले आहेत. या चित्रपटात आईची व्यक्तिरेखा ही अत्यंत महत्त्वाची. तिच्यामुळेच तर उत्तरार्धात चित्रपट घडत जातो, पण रहस्यभेद झाल्यानंतरची आईची भूमिका नवरे यांनी योग्यरीत्या स्पष्ट केली नाही. यामुळे तिचा राग हा त्राग्यासारखा वाटतो, काही वेळा तर ती खलनायिकेसारखी वाटते. वास्तविक मंगेशचा स्वीकार न करण्यात तिचीही बाजू आहे. आणि पश्चात्तापदग्ध वडिलांविषयी नवरे जशी सहानुभूती निर्माण करतात, तशीच आईविषयीही सहानुभूती निर्माण व्हायला हरकत नाही. पण नवरे यांनी तसे केले नाही. त्यामुळे आईच्या विरोधातून निर्माण झालेले नाट्य बरेचसे कृत्रिम व अवास्तव वाटते. त्यात आणखी भर पडली आहे मंगेशच्या स्वभावातली अकस्मात बदलाची.

जन्मरहस्य कळताक्षणी मंगेश पिसाट बनतो. अशा प्रकारचा धक्का सहन न होणे हे अगदी स्वाभाविक आहे. पण तरी कर्दमात राहूनही आदर्श, अभ्यासू असलेला मुलगा हा धक्का बसून पिसाट होणे विसंगत वाटते. ' ग्रँड रिडक्शन सेल ' या नाटकामधील सुखी कुटुंबातील हीरो पोरगा लोकांना आवडल्यामुळे तर नवरे यांना हा मोह झाला नाही ना ? आणि या पिसाटपणापुरती तरी लीलाधर मयेकर यांनी ' ग्रँड रिडक्शन ' मधील आपल्या कामाचीच पुन्हा नक्कल केली व हा बदल अधिक भडक केला. याउलट जयश्री गडकर यांनी आपल्या सुजाण कामातून व्यक्तिरेखेतील कच्चा दुवा अधिक अस्पष्ट केला.

पण एकूण या चित्रपटाचा दर्जा खूपच समाधानकारक आहे. मराठी चित्रपटातला हा बदल स्वागतार्ह आहे. राजा ठाकूर यांनी कल्पकतेने टिपलेले काही प्रसंग त्यांच्या दिग्दर्शन कौशल्याची साक्ष देतात. त्यांनी कॅमेऱ्याचा योग्य वापर करून घेतला नसता तर नायकिणीच्या भूमिकेतील रंजिताला पडद्यावर पाहवलेच नसते. मात्र चित्रपटावर राजा ठाकूर यांच्याऐवजी शं. ना. नवरे यांचाच ठसा जास्त उमटलेला दिसतो.

अरुण सरनाईक, जयश्री गडकर यांनी कामे खरोखरच चांगली केली आहेत. साधारणपणे अशा वेगळ्या वळणाच्या चित्रपटात जुने कलावंत म्हणजे अडचण होऊन बसते. पण या वेगळ्या ढंगाला या दोन्ही कलावंतांनी व्यवस्थित आत्मसात करून घेतले आहे. त्यामुळे भूमिकात तडफदारपणा असूनही लीलाधर मयेकर, नयनतारा यांच्याऐवजी सरनाईक-गडकर यांचाच प्रभाव जास्त जाणवतो.

सी. रामचंद्र यांनी गाण्यांना दिलेल्या सुरेल चाली हे या चित्रपटाचे आणखी एक आकर्षण. ' पप्पा सांगा कुणाचे ' या गाण्याचा ठेका फारच छान आहे आणि ते गाणे म्हणण्यासाठी नेहमीपेक्षा वेगळ्या गायक-गायिकांची ( अरुण सरनाईक, राणी वर्मा व प्रमिला दातार) निवड ही खासच प्रशंसनीय.

पृष्ठ ३ वरून

बऱ्याचशा प्राध्यापकांना व प्राचार्यांना या विषयाची बरोबर व पुरेशी माहिती नव्हती. वारणानगरच्या शासनाच्या शिबीरात शासनानें सहभागाचे तत्त्व स्वतःहून स्वीकारले आणि आता नवा मॉडेल ॲक्टही येणार आहे याची सहसा कुणालाही गंधवार्ता दिसली नाही. ' कशाला हवा सहभाग, म्हणजे बाहेर विद्यार्थ्यांनी चालविलेला गोंधळ आतही आणायचा म्हणता ' असे कोणी म्हणे. तर दुसरे कोणी चिंताग्रस्त चेहेऱ्याने असेही विचारीत की, ' खरोखरीच विद्यार्थी आता त्यांचे कोर्सेस ठरविणार की काय ? उद्या पेपर सोपे काढा असाही ठराव करून घेतील. हे सर्व थांबायचे कुठे ?'

हे सर्व प्रश्न ऐकून समाज ज्यांना शिक्षणतज्ञ समजतो त्यांच्या ज्ञानाचे व शिक्षणविषयक कल्पनांचे दर्शन झाले. हे बरेच झाले. या परिसंवादानंतर एक दिवसाचा आम्ही सेमिनार घेणार आहोत त्याचीही उपयुक्तता पटली.

या कार्यक्रमासाठी वक्ते म्हणून सुप्रसिद्ध विचारवंत श्री. गोवर्धन पारिख व प्रा. मे. पुं. रेगे यांना बोलाविले होते. आयत्यावेळेच्या अडचणींमुळे ते येऊ शकले नाहीत. या कार्यक्रमात प्रा. रा. म. बापट हे अध्यक्ष होते. तेरा विद्यार्थी प्रतिनिधी बोलले. प्रथम युक्रांदचे महाराष्ट्राचे कार्यवाह ज्योतीप्रकाश सराफ यांनी प्रास्ताविकात या परिसंवादामागील दृष्टीकोन सांगितला. ' आता नवीन येणाऱ्या कायद्याप्रमाणे कौन्सिलच्या दोन जागा विद्यार्थ्यांना मिळणार असल्यामुळे आता ह्या प्रश्नास अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. या विषयी सखोल विचार न झाल्यास ही चांगली गोष्ट विकृतही होण्याची शक्यता आहे ' असे सांगून ते म्हणाले, ' हा प्रश्न सर्व विद्यार्थी वर्गाचा आहे असे मानतो म्हणून बोलण्यासाठी प्रतिनिधी पाठवा असे आवाहन आम्ही सर्व विद्यार्थी संघटनांना केले होते. असे असताही एका जबाबदार विद्यार्थी संघटनेने इतर सर्वजण या प्रश्नात लक्ष घालीत आहेत असे पाहून आपला एकटयाचा कार्यक्रम अगोदरच उरकून घेतला. '

यानंतर विद्यार्थ्यांची भाषणे सुरू झाली.

प्रथम पुणे विद्यापीठाच्या उर्मिला सप्तर्षि यांनी ' शिक्षणात सामाजिक प्रश्नांची जाणीव नसते. त्यामुळे विद्यार्थी त्याबाबतीत अज्ञानी राहतो व पुढे तो स्वार्थी बनतो. समाजाचे इतर थर तपासून पहाण्याची त्याला दृष्टीच दिली जात नाही. म्हणून शिक्षणात आमूलाग्र बदल झाला पाहिजे. त्यात नव्या काळाला योग्य, देशाचे सध्याचे चित्र पालटण्यास स्फूर्ती येईल अशा तऱ्हेचे शिक्षण मिळाले पाहिजे. हीच सहभाग मागण्यामागील भूमिका आहे. '

नंतर नेस वाडिया कॉलेजचे श्रीहरी अणे यांचे भाषण झाले. अलीकडे विद्यार्थी

वक्त्यांमध्ये यांचे नाव ऐकू येत होते म्हणून भाषण ऐकण्याची बऱ्याच लोकांना उत्सुकता होती. त्यांनी आल्या आल्या ' विद्यार्थी शक्ती नावाची शक्ती अस्तित्वात तरी आहे काय ?' असा सवाल टाकला. पुढे ते म्हणाले, ' कोणा विद्यार्थ्यांना काच फोडायला सांगितले की ते पटकन फोडतात. कारण विध्वंस करणे हे त्याला जास्त आवडते. पण काही बांधायला सांगा मग येतील का बघा विद्यार्थी !'

एवढे बोलून त्यांना पुढे काही म्हणायचे होते की नाही हे माहीत नाही, परन्तु ते भाषण संपवून विझल्यासारखे परतले. या भाषणात नवे काहीच नव्हते. Student Power विषयी योग्य आकलन नव्हते. सहभागाच्या ऐवजी ते 'संघटना' असाच उल्लेख करीत होते. यावरून सभेच्या विषयाविषयीच गैरसमज झाला असावा. काचा फोडा असे सांगा की विद्यार्थी चटकन फोडतील, हे म्हणणे खरे आहे काय ? तसे असते तर काही समाजकंटक संघटनांनी ते कधीच केले नसते का ? असे म्हणणाऱ्यांनी हा प्रयोग करून पाहण्यासारखा आहे.

त्यांना उत्तर देताना विद्यापीठाच्या कु. लीला पवार म्हणाल्या, ' विद्यार्थी हा सुशिक्षित, तरुण, फारसे पाश नसलेला व संवेदनाशील असा वर्ग आहे म्हणून समाजाचे मागासलेपण, अन्याय काढून टाकण्याची जबाबदारी त्याच्यावर पडते. समाज परिवर्तनासाठी योग्य वर्ग म्हणून ती शक्ती जागृत करून आपण तिला योग्य वळण देणे भाग पडते. ' पुढे सध्याच्या अभ्यासक्रमाविषयी त्या म्हणाल्या, ' आम्ही सोशॉलॉजी शिकतो. तीत एकत्र कुटुंब पद्धती, विभक्त कुटुंब पद्धती, त्यांचे फायदे-तोटे हेच शिकविले जाते. चाळीस वर्षांपूर्वीही तेच शिकविले जात होते. एवढ्या काळात भोवतालच्या समाजात काहीच बदल झाला नाही असे या शिक्षण-तज्ञांना म्हणायचे आहे काय ?'

यानंतर विद्यार्थी संघाचे प्रतिनिधी शाम जेधे, शेतकी महाविद्यालयाचे श्री. पालवे, एम्. ई. एस्. महाविद्यालयाचे प्रकाश जावडेकर, बी. एम्. कॉमर्स महाविद्यालयाचे अशोक जोशी, विद्यापीठाचे जयंत एरंडे यांची भाषणे झाली.

आर्म फोर्सेस मेडिकल कॉलेजच्या संदीप पेंडसे यांचे सर्वात तडफदार भाषण झाले. त्यांनी श्रीहरी अणे यांच्या विधानांचा चांगलाच समाचार घेतला.

' जे म्हणतात की, विद्यार्थी शक्ती अस्तित्वात नाही ते एका विशिष्ट गटाचे, विशिष्ट वर्गाचे लोक आहेत, त्यांची मक्तेदारी जाऊ नये म्हणून विद्यार्थी ही काय शक्ती आहे का ? विद्यार्थ्यांनी राजकारणात कशाला पडायचे ? अशा तऱ्हेचे समाजाचे ब्रेनवॉशिंग करीत असतात. '

विद्यार्थी प्रतिनिधींनंतर राष्ट्रसेवादलाचे वासू देशपांडे बोलले. त्यांनी त्यांच्या विद्यार्थीदशेत सहभागाच्यासारखी मागणी केली होती त्याची आठवण सांगितली.

सर्वात शेवटी प्रा. रा. म. बापट यांचे अध्यक्षीय भाषण झाले. त्यांचे भाषण विस्तृत व कमालीचे मुद्देसूद असे झाले. त्यांनी असे विवेचन केले,

विद्यार्थी शक्ती व विद्यार्थी सहभाग ही संकल्पना व आंदोलन यांचा अभ्यास होणे आज आवश्यक बनले आहे. कारण त्यामागील प्रेरणा व तत्त्वज्ञान यांचा विसर पडला आणि विद्यार्थ्यांना शिक्षणक्षेत्रात अधिक प्रतिनिधित्व दिले म्हणजे संपले असे मानूनच या मागणीचा विचार आज शासन किंवा बहुसंख्य विद्यार्थी करीत आहेत. दुर्दैवाने असा अर्धवट व एकांगी विचार झाला. त्यामुळे शिक्षणाची घडी अधिकच विघडेल व त्याची झळ विद्यार्थी, शिक्षक व पालक या सर्वांना लागेल.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अत्यंत प्रगत औद्योगिक देशात व अगदी भिन्न कारणांमुळे आपल्यासारख्या मागासलेल्या विकसनशील देशात विद्यार्थी शक्ती ही भावी काळातील क्रांतिकारी शक्ती ठरण्याचा संभव आहे. आजचे सर्व पक्षोपपक्ष व विचारसरणीमध्ये क्रांती घडविण्याचे सामर्थ्य व विशेषतः शुद्ध नैतिक आकांक्षा क्षीण होत चालल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थी सहभागाचा प्रश्न हा महत्त्वाचा ठरला आहे.

प्रगत औद्योगिक देशात सुबत्ता व ऑटोमेशन, यांच्या युगाला प्रारंभ होत आहे तरी प्रत्यक्षात या सर्व सुबत्तेच्या पोटात कुठेतरी रितेपणा आहे. वस्तुंच्या अधिकाधिक उत्पादनामुळे प्रत्येक मनुष्य हा कष्टकरी प्राणी न राहता आपले सर्वांगीण जीवन घडविणारा सृजनशील, अगदी परिपूर्ण मानव म्हणून जगू शकेल या स्वप्नास आज तडा जात आहे. उलट दिवसेंदिवस 'यशस्वी' आयुष्याची तथाकथित समाजमान्य व्याख्या प्रत्येकजण कानी कपाळी ऐकत आहे व विकत घेत आहे. त्यामुळे आजचे प्रचंड जीवनमान कसेबसे टिकविण्याकरिता, सतत अनेकविध वस्तू वापरण्याकरिता व तडफडण्याकरिता खपणाऱ्या अंधारातील घुशी, उंदीर, मुंग्या यापलीकडे माणसांना किंमत राहिलेली नाही. याला विटलेल्या युवकांमध्ये 'विद्यार्थी शक्ती'ची कल्पना उदयास आली.

या युवकांनी व विचारवंतांनी मर्मालाच हात घातला. यापूर्वीच्या काळातसुद्धा ज्ञानाचा निरर्थक भार वाहणारेच जास्त व ज्ञान म्हणजे करिअर असे मानणारे पढतमूर्खच सर्वत्र होते हे त्यांना मान्य आहे. पण निदान यापूर्वीच्या काळात, काही मूठभर का असेनात अशा व्यक्तींना ज्ञानाचे निव्वळ निसर्गाचे व मानवाचे निरीक्षण करण्यापलीकडे काही कार्य आहे याची जाणीव होई. व असा एकादा सॉक्रेटीस रूसो, मार्क्स किंवा रसेल त्या काळात ज्ञानाचे हे क्रिटीकल अंग जाणीत असे. आपल्याकडेही उपनिषद काळापासून ज्ञानेश्वर-तुकाराम ते थेट रानडे-आगरकर यांजपर्यंत खरे ज्ञान, खरे शिक्षण हे समाजजीवनावरील काजळी झाडून समाजात नवचैतन्य निर्माण करण्याचे साधन आहे असे मानण्याची परंपरा दिसून येते. थोडक्यात यापूर्वी समाजातील अन्याय, विषमता व दैन्य नष्ट करण्याची शक्यता ज्ञानप्रक्रियेत कुठेतरी बीजरूपाने नांदत असे.

पण या विद्यार्थी शक्तीच्या समर्थकांचे म्हणणे असे की, आज माणसांच्या मनांची अहोरात्र कबजा घेणारी टेलिव्हिजन, रेडिओ, चित्रपट, प्रचंड खपाची वर्तमानपत्रे व साप्ताहिके इत्यादी साधने व माध्यमे इतकी विपुल झाली आहेत की आपले जीवन सार्थ बनवावयाचे आहे म्हणजे काय हे कोणालाच कळेनासे झाले आहे व माणसे संवेदना शून्य होत आहेत.'

दुर्दैवाने किंवा सुदैवाने मानवाच्या संचितज्ञानाची कक्षा वाढत आहे आणि आपले जीवन समृद्ध करायचें असेल तर प्रत्येक पिढीला हे ज्ञानकण गोळा करावेच लागतील यात शंकाच नाही. यामुळे प्रत्येक ज्ञानशाखेत अधिकाधिक विशेषीकरण व एकांगीपणा येणार आहे व तो अपरिहार्य आहे याविषयी या विद्यार्थ्यांचे दुमत नाही. प्रश्न असा आहे की, हे तांत्रिक कौशल्य मिळविण्याकरिता माणसांच्या जीवनातला जवळजवळ एक तृतीयांश भाग आत्ताच लागू लागला आहे. आणि पुढे तो कमी होणार नसून वाढणार आहे. अशा परिस्थितीत तांत्रिक ज्ञानाच्या जोडीला माणूसकीचा डोळा जर त्या काळात आपण प्रत्येक विद्यार्थ्याला दिला नाही तर अशा नागरिकांचे ज्ञानाचे ओझे त्याच्यावर व समाजावर भस्मासुराप्रमाणे उलटेल आणि म्हणून १९६० च्या नंतर युरोपात व अन्यत्र विद्यार्थी चळवळ निर्माण झाली. दुर्दैवाने सनातन्यांपासून साम्यवाद्यांपर्यंत, तत्त्वज्ञानाच्याशाखेपासून काव्य व शिल्पचित्रादि कलांपर्यंत त्यांना कुठेही हा क्रांतिकारक विचार पुढे रेटण्याची शक्ती आढळली नाही. वाईट इतकेच की क्रांतिकारकांची क्रांती हीसुद्धा आजच्या प्रस्थापित बाजारी जीवन व ज्ञानप्रक्रियेची अत्यावश्यक गरज बनली आहे व तिचाही उपयोग आजचा आहे हा गाडा सुरळीत चालावा म्हणून लागणाऱ्या वंगणाप्रमाणे होत आहे. निव्वळ बंडखोरी किंवा सहजस्फूर्त उठाव किंवा उत्कट उत्साह म्हणजे जशी क्रांती नव्हे तसेच जगाच्या अंतापर्यंत शास्त्रशुद्ध क्रांतिकरता संघटना बांधीत बांधीत आजच्या युगाचे आव्हान विसरणारे पक्ष व विचारसरण्या म्हणजेही क्रांती नव्हे हे विद्यार्थी शक्तीने जाणले आहे. लेनिन व माओचे नाव उच्चारणारी मंडळी आज भांडवलशाहीची जपमाळ ओढीत आहेत. म्हणून आज जर क्रांतीची नैतिक प्रेरणा जागृत करायची असेल तर ते विद्यार्थीच करतील, हे प्रगत देशातील विद्यार्थ्यांचे म्हणणे.

आपल्याकडे तर सारा अंधारच आहे. येथे प्रबोधनच झाले का नाही याची शंका आहे. झाले असले तर ते अधिकृत ज्ञानपीठांबाहेर झाले. विद्यापीठांनी विद्येचाच भार वाहिला. ज्ञानाचा डोळसपणा क्वचितच कोणाला दिला. इथला विद्यार्थी सर्जनशील नागरिक बनला नाही तरी निदान त्याला पायावर उभे राहून दोन घास मिळविता येतील वा आपल्या आईवडिलांचे पांग फेडता येतील अशीही शिदोरी दिली जात नाही. त्यामुळे आपले सर्व विद्यार्थी दोन गटात विभागले गेले आहेत. काही मूठभर विद्यार्थी निदान आपल्या शिक्षणाकरिता आपले पालक मरमर मर-

तात म्हणून बाकीच्या जगापासून कोंडून घेऊन अभ्यास तरी करतात. एस्. एस्. सी. ला, एम्. ए. ला किंवा आय. ए. एस्. ला पहिले येतात आणि एकदाचे यशस्वी जनावर म्हणून जगायला मोकळे होतात. हे परवडले. बाकी सर्व विद्यार्थी मांज्या तुटलेल्या पतंगाप्रमाणे भरकटलेले असतात व हुल्लडबाजी करतात. त्यांच्या हुल्लड-बाजीचे कौतुक करण्याची प्रथा शिक्षणाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक आणि रोटरी क्लब, सनातनी पक्ष व सारे क्रांतिकारी समाजवादी व कम्युनिस्ट पक्षोपपक्षात पडत आहे. कारण विद्यार्थ्यांचा नवसमाज निर्मिण्याची नैतिक शक्ती जागृत करण्याची जरूरी कोणाला वाटत नाही. किंवा ती नकोच आहे. कारण अन्यायाविरुद्ध लढू शकणारी कार्यशक्ती निर्माण करणारे ज्ञान ते खरे ज्ञान, हा विचारच नको आहे.

आणि म्हणूनच सहभाग म्हणजे प्रतिनिधित्व हा खोटा विचार रडतखडत का होईना सर्वचजण मान्य करीत आहेत कारण त्यात त्यांची सोय आहे. कारण फार तर खेळ किंवा करमणूक विभाग किंवा विद्यार्थी कल्याण असल्या गोष्टीत प्रतिनिधित्व दिले की एकदाची ब्याद टळली असा तो हिशोब आहे. म्हणून इथे हे ठासून सांगितले पाहिजे की, समजा उद्या जरी कुलगुरूपद, कार्यकारिणी, ॲकॅडेमिक कौन्सिल, विधिसभा किंवा अभ्यासक्रम आखणारी मंडळे येथे विद्यार्थ्यांना शंभर किंवा ऐंशीटक्के प्रतिनिधित्व मिळाले म्हणजे विद्यार्थी सहभागाची कल्पना अगदी पराकोटीस नेली असे मानणे चुकीचे ठरेल. विद्यार्थ्यांना सहभाग पाहिजे तो ज्ञान-प्रक्रिया सकस, डोळस व समाजाच्या डोळयात अंजन घालणारी अशी बनवावयाची आहे म्हणून हवा आहे. तसे होणार नसेल तर त्यातून प्रतिनिधित्वाच्या नावाखाली विद्यार्थ्यांची हुल्लडबाजीच वाढेल.

हे सर्व विसरून आज शासन व विद्यापीठे विद्यार्थ्यांना प्रतिनिधित्व देण्याचे नाटक करीत असतील तर तो क्रांतिविरोधी एक धूर्त राजकीय डावपेच आहे असे मानावे लागेल.

जातिभेद, दारिद्र्य नष्ट करण्याकरिता समाजात आंदोलने करू शकतील अशी लोकशाही समाजव्यवस्था निर्माण करणारे ज्ञान देणे म्हणजेच खरे ज्ञान व तेच खरे शिक्षण.

शेवटी युक्रांदचे पुणे शाखेचे कार्यवाह श्री. अरुण शेंडगे यांनी आभार मानले. युवक क्रांती दलातर्फे या विषयावर लवकरच एक दिवसाचे सेमिनार भरविण्यात येणार आहे. त्यात विद्यार्थी व प्राध्यापक आपले निबंध वाचतील व त्यावर विस्तृत चर्चा होईल.

□ □ □

सौ. तारा पंडित

# विनोदी कथा जर्मनीच्या

¤ एकदा एक चर्च रस्त्याच्या फारच मधे येते असे लोकांना वाटले. वाहनांना व पायी चालणारांना अडचण होई. म्हणून त्यांनी ठरविले की चर्चची इमारत सर्व लोकांनी मिळून थोडी मागे ढकलावी. एकजण म्हणाला, 'चर्च किती मागे सरकले हे आपणाला कळावे म्हणून मी माझा कोट चर्चच्या मागच्या भागाला ठेवतो.' त्याने तसे केले व पुन्हा समोर येऊन तो लोकांना चर्च ढकलण्यात मदत करू लागला, त्याच वेळी एक चोर चर्चच्या मागच्या बाजूने जात होता. खाली पडलेला कोट दिसताच त्याने तो लांबवला.

थोड्या वेळाने कोटाच्या मालकाने मागच्या बाजूला जाऊन पाहिले तो कोट तेथे नव्हता. तो लोकांना म्हणाला, 'मित्रहो, चर्च बरेच मागे सरकले; माझ्या कोटावर ते आले बरे. कारण मी येथे ठेवलेला कोट आता दिसत नाही.'

¤ रविवारचा दिवस होता. खेड्यातले लोक चर्चमध्ये जात होते. पाद्रीसाहेब पण चर्चकडे चालले होते. इतक्यात, एक काळीशार मोठाड डुकरीण वेगाने पळत येताना दिसली. लोक बाजूला सरकू लागले. पण तिने उडी मारली आणि ती नेमकी पाद्रीसाहेबांच्या दोन्ही पायांमध्ये आली. पाद्रीसाहेब आपोआपच तिच्या पाठीवर बसले गेले आणि तरी ती पळतच राहिली. अशा अवस्थेतच ते चर्चच्या मध्यभागी येऊन पोचले, तेव्हा जोराने ओरडून म्हणाले, 'लोकहो, तुम्ही देवाचे पाय सोडू नका बरे, मला मात्र ह्या सैतानाबरोबरच जाणं भाग आहे."

¤ एका खेड्यातल्या पाद्रीसाहेबांना टेबलावर मूठ आपटून बोलायची खूप संवय होती. प्रार्थना संपली की त्यांचे प्रवचन सुरू होई व ते आवेशात येऊन समोरच्या टेबलावर मुठी आपटून बोलू लागत. गावातल्या व्रात्य मुलांनी एकदा गंमत केली. चर्चमधील टेबलाला खालून अनेक टाचण्या टोचून ठेवल्या. त्यांची बारीक टोके थोडीशी वर आलेली होती. त्यावर टेबलक्लॉथ पूर्ववत अंथरून ठेवला. नेहमीप्रमाणे रविवारी पाद्रीसाहेब आले व प्रार्थना आटोपताच त्यांनी आपले प्रवचन सुरू केले. आवेशात येऊन, टेबलावर मूठ आपटून ते म्हणाले, '...आणि हे सारे जग कोणी निर्माण केले बरे?'

हाताला टाचण्यांची टोके बोचताच हात चोळीत घाईने ते पुढे उद्गारले, 'हे त्या व्रात्य मुलांचेच काम आहे.' ¤ ¤ ¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Biweekly ) : 40 Paise : Regd. No. M-H 649

लालमहाल

प्रतापगड

पन्हाळगड

राजगड

पुरंदर

आग्रा

ब. मो. पुरंदरे

किंमत
प्रत्येकी
रुपये तीन

राजहंस प्रकाशन
पुणे.